


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार २४ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## NEET पेपरफुटीचा मुख्य आरोपी

# संजीव मुखियाला क्लिन चीट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. नीट २०२४ परीक्षा प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणात सीबीआयने महत्त्वाची माहिती दिली. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार मानल्या जाणा-या संजीव कुमार उर्फ संजीव मुखिया याच्याविरोधात प्रश्नपत्रिका चोरी किंवा ती वाटल्याचे कोणतेही पुरावे मिळालेले नाहीत, असे सीबीआयने स्पष्ट केले. त्यामुळे संजीव मुखियाला या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. त्याला या प्रकरणातून जाणीवपूर्वक वाचवले जात आहे किंवा चार्जशीटमधून वगळले गेले, हे आरोप सीबीआयने पूर्णपणे फेटाळून लावले.२०२४ मध्ये बिहार पोलिसांनी नीट परीक्षा प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणाचा पर्दाफाश करत एफआयआर नोंदवला होता. संजीव मुखियाचे नाव यापूर्वीही विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटी आणि चोरीच्या प्रकरणांमध्ये समोर आले होते. याच पार्श्वभूमीच्या आधारे बिहार पोलिसांनी सुरु वातीच्या तपासात त्याला आरोपी केले होते. बिहार पोलिसांकडून तपास हाती घेतल्यानंतर सीबीआयने या संपूर्ण कटाचा सखोल तपास केला. झारखंडमधील हजारीबाग येथील ओएसिस स्कूल परीक्षा




**CBI म्हणाली- संजीव मुखिया यांच्या विरोधात पेपर चोरल्याचे, लीक केल्याचे पुरावे नाहीत; आरोपपत्रात 45 नावे**

केंद्रातून प्रश्नपत्रिकेपर्यंत आरोपी पोहोचले होते. प्रश्नपत्रिका चोरल्यानंतर उत्तरपत्रिका तयार करणा-या गटाने ती सोडवून काही उमेदवारांपर्यंत पोहोचवली. संजीव मुखियाने प्रश्नपत्रिका चोरली, ती लीक केली, उत्तरपत्रिका उमेदवारांपर्यंत पोहोचवली किंवा या संपूर्ण कट रचला असा कोणताही पुरावा तपासात मिळालेला नाही. सीबीआयने सुप्रीम कोर्टात आणि न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातही त्याच्या नावाचा समावेश केलेला नाही. सीबीआयने या प्रकरणात प्रश्नपत्रिका चोरीपासून ते तिचा गैरफायदा घेणा-या उमेदवारांपर्यंत सर्वांची ओळख पटवली आहे. आतापर्यंत पाटण्यातील ४५ आरोपींविरुद्ध चार्जशीट दाखल करण्यात आली असून कोणत्याही दोषीला सोडण्यात आलेले नाही.

***कोण आहे संजीव मुखिया?***

संजीव मुखिया हा मूळचा बिहारमधील नालंदाचा रहिवासी आहे. तो बिहार सरकारमध्ये कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होता. तो गेल्या २० वर्षांपासून स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांमध्ये सक्रिय असलेल्या टोळीचा जुना सदस्य होता. यापूर्वी त्याला पोलिसांनी अटक केली असून त्याने तुरुंगवासही भोगला आहे. त्याचा मुलगाही शिक्षक भरती प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात तुरुंगात गेला आहे. दरम्यान, या तपासादरम्यान संजीव मुखिया फरार होता. नंतर बिहार पोलिसांनी त्याला इतर दुस-या गुन्ह्यांमध्ये अटक केली होती. मात्र, नीट प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणात त्याला सीबीआयकडून निर्दोष घोषित करण्यात आले आहे.

# विद्यार्थिनींवरील लाठीचार्ज वेदनादायी-मुरली मनोहर जोशी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचं गेल्या एका महिन्यापासून आंदोलन सुरू आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीकडून करण्यात आली आहे. पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचंही याच मुद्यांवरून बेमुदत उपोषण सुरू आहे. दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या काक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत आहे. काक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनस्थळी आतापर्यंत अनेक दिग्गज नेत्यांनी भेटी दिल्या आहेत. मात्र, या आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जच्या घटनेवरून देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. काक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनावर आता भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री मुरली मनोहर जोशी यांनी पोस्ट शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेली लाठीचार्जची घटना वेदनादायी असल्याचं म्हणत मुरली मनोहर जोशी यांनी केंद्र सरकारला घरचा आहेर आहे.

**मुरली मनोहर जोशी यांनी काय म्हटलं?**

देशाच्या विविध भागांतून आलेले तरुण विद्यार्थी नवी दिल्लीच्या रस्त्यांवर अनेक दिवसांपासून एकत्र जमलेले आहेत हे पाहणं वेदनादायी आहे. परीक्षांच्या पद्धतीबाबत



त्यांच्या मनात असलेल्या चिंता आणि शंका रास्त आहेत. त्यांचे प्रश्न हे सहानुभूतीने आणि दीर्घकालीन उपाययोजनांच्या दृष्टीकोनातून सोडवले गेले पाहिजेत. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची इच्छाशक्ती दाखवली गेली पाहिजे, असं मुरली मनोहर जोशी यांनी म्हटलं आहे.

विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाकडे फक्त बळाचा वापर करून हाताळायचा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहिलं जाणार नाही, अशी मला आशा आहे. दिल्लीत आंदोलक विद्यार्थिनींवर लाठीचार्ज झालेला पाहून मला अत्यंत वेदना झाल्या. बळाचा असा वापर भारतीय समाजातील एका मोठ्या घटकाला विकसित भारताच्या ध्येयापासून दूर नेईल, अशी प्रतिक्रिया देत मुरली मनोहर जोशी यांनी अप्रत्यक्ष केंद्र सरकारला घरचा आहेर आहे.

# सदोष दारुगोळ्यामुळे 62.10 कोटी रूपयांचे नुकसान

**नवी दिल्ली :** संसदेच्या लोकलेखा समितीने (पीएसी) पुन्हा एकदा संरक्षण मंत्रालयाला फटकारले आहे. अठराव्या लोकसभेतील पीएसीच्या ४९ व्या अहवालामध्ये बडमाल येथील दारुगोळा निर्मिती कारखान्यातून लष्कराला पुरवण्यात आलेल्या सदोष दारुगोळ्याच्या पुरवठ्यामधून झालेले ६२.१० कोटी रुपयांचे नुकसान उघडकीस आणले आहे. सोबतच तोफखान्यासाठीच्या तोफांच्या खरेदीस झालेला अनेक वर्षांचा उशीर हा लष्कराच्या ऑपरेशनल तयारीसाठी मोठा धोका असल्याचेही या अहवालामध्ये नमूक करण्यात आले आहे.



धनुष तोफेसारख्या स्वदेशी प्रकल्पाच्या उत्पादनात येत असलेल्या अडचणींबाबतही समितीने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तसेच इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये सुधारणा, स्किल डेव्हलपमेंट, उत्तम निर्णय प्रक्रिया आणि नियोजित वेळेत उत्पादन अशा पाच प्रमुख शिफारशी केल्या आहेत. या अहवालामधून आत्मनिर्भर भारतासमोरील संरक्षण क्षेत्रातील लक्ष्य गाठण्यासाठी समोर असलेल्या आव्हानांना समोर आणण्यात आले आहे. पीएसीने बडमाल येथील दारुगोळा निर्मिती कारखान्यातून पुरवठा करण्यात आलेल्या सदोष दारुगोळ्याला बदलण्यावर खर्च झालेले ६२.१० कोटी रुपयांचं नुकसान ही गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. अशा त्रुटींमुळे केवळ पैसे वाया जात नाहीत तर लष्कराकडील दारु गोळ्याच्या साठ्याच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होते. दरम्यान असे प्रकार टाळण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने पुरवठा साखळीला कठोर एसओपी आणि कालमर्यादेसोबत मजबूत करावे अशी सूचनाही पीएसीने केली आहे.

# आंदोलनाचा आता देशभरात वणवा

## कॉकरोच जनता पार्टीकडून देशव्यापी आंदोलनाची हाक!

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** गेल्या महिन्याभरापासून दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने आता तीव्र रूप धारण केले आहे. अभिजीत दीपके यांच्या काकरोच जनता पार्टीने शुक्रवारी, २४ जुलै रोजी देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये एक दिवस, एक मागणी याखाली मोठ्या देशव्यापी शांततापूर्ण आंदोलनाची घोषणा केली आहे. नीट पेपरफुटी प्रकरण आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचा निषेध नोंदवत, देशभरातील तरुण व विद्यार्थ्यांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कॉकरोच जनता पार्टीतर्फे करण्यात आले आहे.

'काकरोच जनता पार्टी'ने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर एक पत्र जारी केले आहे. देशभरात पोलिसांच्या दडपशाही आणि कारवाईला बळी पडलेल्या विद्यार्थ्यांना या आंदोलनातून पाठिंबा द्यावा. तसेच




सर्व विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संस्थांनी आपापल्या जिल्ह्यांत स्थानिक प्रशासनाकडून कायदेशीर परवानगी घेउन हे आंदोलन शांततापूर्ण मार्गाने पार पाडावे आणि आंदोलनाच्या ठिकाणी एकत्र आलेल्या नागरिकांसमोर विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे जाहीर वाचन करावे, असे यात म्हटले आहे.

मागण्या व नियम-आंदोलनासाठी आवश्यक असणारी आचारसंहिता, साहित्य आणि प्रशासनाला द्यायच्या निवेदनांचा मसुदा संघटनेच्या वेबसाईटवर आहे. या डिजिटल पत्राच्या शेवटी 'इंकलाब जिंदाबाद' आणि 'भारत माता की जय' या घोषणा देत नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, 'तरुणांच्या भविष्याशी खेळ करणा-या गमावत्यांना सोडले जाणार नाही. प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणांतील दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा देण्यासाठी विशेष फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केली जातील,' अशी घोषणा केली.

# पेपरफुटी प्रकरणी 'फास्ट ट्रॅक कोर्टा'ची स्थापना -पंतप्रधान

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-**नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि शिक्षण क्षेत्रातील अव्यवस्थेविरोधात काक्रोच जनता पार्टीने सुरू केलेल्या आंदोलनाला देशभरातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, ही मागणी सीजेपी आणि विरोधी पक्षांनी लावून धरली आहे. या पार्श्वभूमीवर आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील विद्यार्थ्यांचे हित आणि भविष्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत पेपरफुटी प्रकरणी दोषींना कठोर शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करण्यात येईल अशी घोषणा केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणा-या कुठल्याही व्यक्तीला सोडले जाणार नाही, असा इशाराही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर एक पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली आहे. तसेच तरुणांचे हित आणि भविष्य याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असेल, असेही त्यांनी सांगितले आहे.



याबाबत केलेल्या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिले की, देशातील तरुणांचे हित आणि त्यांचे भविष्य याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा सुनावण्यासाठी आणि खटल्याची त्वरित सुनावणी व्हावी यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना केली जाईल. तसेच या संदर्भात आवश्यक ती पावले उचलण्यात यावीत, असे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत, अशी माहितीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. मोदींनी या पोस्टमध्ये पुढे लिहिले की, विद्यार्थ्यांचे हित सुरक्षित करण्यासाठी सरकारकडून घेण्यात आलेल्या निर्णयांच्या साखळीमधील हे एक महत्त्वपूर्ण पाउल आहे.

# वंचितच्या बंदला राज्यभर प्रतिसाद

## व्यापा-यांनी उस्फुर्तपणे दुकाने बंद ठेवली, मुर्तीजापूरची घटना वगळता बंद शांततेत

**मुंबई/प्रतिनिधी :** नीट पेपरफुटीप्रकरणी विविध मागण्यांसाठी दिल्लीमध्ये जंतरमंतर येथे आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांवर केलेल्या अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने गुरुवारी पुकारलेल्या राज्यव्यापी बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. राज्यातील अनेक शहरांमध्ये वंचितचे कार्यकर्ते व्यापा-यांना दुकाने बंद ठेवण्याची शांततापूर्ण मार्गाने विनंती करताना दिसत होते. वंचितच्या बंदला राज्यव्यापी प्रतिसाद मिळण्याची अलिकडच्या काळातील ही पहलीच घटना आहे. वंचितने केवळ आपल्या संघटनेच्या बळावर बंद यशस्वी केला. या बंदला वंचितचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे राजकीय प्रभावक्षेत्र असलेल्या पश्चिम विदर्भात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. भाकप, माकप, शेकाप हे डावे पक्ष, काही कामगार संघटना तसेच भारतीय बौद्ध महासभा यांचे कार्यकर्ते या बंदमध्ये मोठ्या संख्येने



उतरले होते. अनेक ठिकाणी व्यापारी वर्गांनी उत्फुर्तपणे पेठा बंद ठेवून बंदमध्ये भाग घेतला. कॉंग्रेसने या आंदोलनास पाठिंबा दिला होता. अकोला जिल्ह्यातील मुर्तजापूर येथील काही दुकान तोडफोडीची घटना वगळता बंद राज्यभर शांततेत झाला. नागपूरमध्ये संविधान चौक ते बर्डी मार्गावर मोर्चा काढण्याचा प्रयत्न करणा-या वंचितच्या आंदोलकांना पोलीसांनी ताब्यात घेतले. या मोर्चात पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. धुळे शहरात बंद कडकडीत झाला. पुण्यात भिडे वाडा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा वंचितकडून मोर्चा काढण्यात आला. दिल्ली पोलीस मुर्दाबाद आणि धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो याघोषणा सर्वत्र दिल्या गेल्या. छत्रपती संभाजीनगर मध्ये पैठणगेट, औरंगापुरा येथे व्यापा-यांनी दुकाने बंद ठेवली. कोल्हापूर, सोलापूर, बुलढाणा, नांदेड, नंदुरबार, गडचिरोली येथेही बंदचे पडसाद उमटले.

# जंतर-मंतर परिसरात 1.5 किमीच्या हद्दीत इंटरनेट बंद, जॅमर सुरु!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाला हिंसक वळण मिळाल्यानंतर, केंद्र सरकार... मोठा निर्णय घेतला आ... केंद्रीय गृह मंत्रालयाने ग... वारी मोठा आदेश जा... करत, जंतर-मंतरच्या १.... किलोमीटरच्या परिघात गु... वारी सायंकाळी ४ वाजल्यापासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सर्व मोबाईल इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, सुरक्षा यंत्रणांनी संभाव्य अफवा रोखण्यासाठी आंदोलन स्थळाच्या आसपास 'मोबाईल जॅमर'देखील सुरू केले आहेत.गेल्या काही दिवसांत दिल्लीत झालेल्या ...कमकी आणि ...हिंसाचारानंतर, सरकारने हा ...र्णय घेण्यात आला आहे. ...त्या हिंसाचारात दोन ...सहाय्यक पोलीस आयुक्त ...र्जाच्या अधिका-यांसह किमान सहा पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. दरम्यान, मंगळवारी कॅनाट प्लेस परिसरात आंदोलक गर्दीकडून रॅपिडॲक्शन फोर्सच्या (RAF) एका ४५ वर्षीय




➪(पान २ वर)

# सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांनी संविधानाची प्रस्तावना वाचली

## पोलिसांच्या कारवाईचा निषेध, 'लोकशाही वाचवा'च्या दिल्या घोषणा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** कॉकरोच जनता पार्टीच्या संसद मार्चदरम्यान विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाचे वकील एकत्र आले. त्यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन केले आणि लोकशाही वाचवा अशा घोषणा दिल्या. विद्यार्थी आंदोलनादरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांनी संविधानाची प्रस्तावना वाचली. सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांचा एक गट गुरुवारी न्यायालयाच्या आवारात जमला. 'लोकशाही वाचवा, संविधान वाचवा' या मोहिमेचा भाग म्हणून त्यांनी एकत्रितपणे संविधानाची प्रस्तावना वाचली. राष्ट्रीय राजधानीत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनांच्या आणि प्रशासनाच्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर हे घडले. न्यायालयाच्या दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत वकील एकत्र जमले आणि त्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व यांसारख्या घटनात्मक मूल्यांची पुष्टी करत प्रस्तावना मोठ्याने वाचली. हेही वाचा - जंतर मंतर येथील विद्यार्थी आंदोलनावर बॉम्बे



बार असोसिएशनने चिंता व्यक्त केली, बळाच्या वापराचा निषेध केला; सरकार आणि विद्यार्थ्यांमध्ये अर्थपूर्ण संवादाचे आवाहन केले. ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग आणि डॉ. एस. मुरलीधर यांनी पठणाचे नेतृत्व केले. सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील विकास सिंह हेही उपस्थित होते. सहभागी झालेल्यांमध्ये ज्येष्ठ वकील आनंद ग्रोव्हर, अंजना प्रकाश, संजय घोष, शादन फरासात, अरुंधती काटजू, महालक्ष्मी पावनी, नंदिता राव, पी.व्ही. सुरेंद्रनाथ, मनाली सिंघल, ➪(पान २ वर)

# संसदेबाहेर NDA-इंडिया ब्लॉकचे खासदार आमनेसामने, लोकसभा तहकूब

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गुरुवारी, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी, एनडीए आणि विरोधी पक्ष संसद भवनाबाहेर आमनेसामने आले. कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, कॉंग्रेस खासदार राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासह विरोधी पक्षाच्या खासदारांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली.या आंदोलनात एनडीएचे खासदारही विरोधी पक्षात सामील झाले आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी केली. २१ जुलै रोजी पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर राहुल गांधींनी केलेल्या धरणे आंदोलनाचा एनडीएचे खासदार निषेध करत आहेत. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी इंडिया ब्लॉक करत आहे. आंदोलनादरम्यान प्रियंका गांधी एनडीएच्या खासदारांच्या अगदी जवळ गेल्या, परंतु सुरक्षा कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करून त्यांना रोखले. संसदेच्या आतही हा गदारोळ सुरूच होता. यामुळे, लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले आहे. दुपारी २ वाजता लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर प्रचंड गोंधळ उडाला. सभागृहाचे कामकाज शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. कॉंग्रेसने सरकारसमोर ५ मागण्या ठेवल्या -सिब्बल म्हणाले सरकारने सर्वप्रथम आपल्या नेत्यांसाठी जलदगती न्यायालय स्थापन करावे

**संसदेच्या मकर दारावर सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या खासदारांनी एकमेकांविरोद्ध घोषणा दिल्या**



राज्यसभा खासदार कपिल सिब्बल म्हणाले की, ज्या पक्ष नेत्यांवर पूर्वी गंभीर गुन्ह्यांचे आरोप झाले होते आणि नंतर त्यांना पक्षात पुन्हा सामील करून घेण्यात आले, त्यांच्या विरोधात सरकारने सर्वप्रथम जलदगती न्यायालये स्थापन करावीत. त्यांच्याविरोधात सीबीआय चौकशी का केली जात नाही आणि सुरू असलेली चौकशी का थांबवण्यात आली आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.सिब्बल म्हणाले की, विद्यार्थ्यांचे आंदोलन २८ जूनपासून सुरू असून २५ दिवस उलटून गेले आहेत. या काळात सरकारने ना विद्यार्थ्यांशी संवाद साधला, ना त्यांच्या समस्यांवर कोणतेही निवेदन दिले. ते म्हणाले की, जेव्हा विद्यार्थी उपोषणावर होते, तेव्हा सरकार गप्प राहिले, पण आता तरुणांचा वाढता संताप पाहून सरकार सक्रिय झाले आहे. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. नड्डा म्हणाले, 'विरोधी पक्षाचे वर्तन अत्यंत बेजबाबदार आहे. त्यांना ना चर्चा करायची आहे, ना सभागृहाचे कामकाज चालू द्यायचे आहे.' भाजप खासदार संबित पात्रा यांनी संसद परिसरात सांगितले की, कॉंग्रेस बॅनर घेउन आंदोलन करून सभागृहाचा वेळ वाया घालवत आहे आणि ज्या मुद्द्यांवर चर्चा व्हायला पाहिजे त्यापासून पळ काढत आहे. राज्यसभेचे कामकाजही सकाळी ११ वाजता गदारोळात सुरू झाले. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'पंतप्रधानांचे आजचे वक्तव्य चिथावणीखोर आहे. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे, तरच आम्ही चर्चेसाठी तयार होउ.' पेपरफुटी प्रकरणांसाठी जलदगती न्यायालय स्थापन करण्यासंदर्भात पंतप्रधान मोदींनी केलेल्या ट्विटर प्रतिक्रिया देताना भाजप अध्यक्ष नितीन नवीन म्हणाले की, पंतप्रधानांनी नेहमीच प्रत्येक प्रकरणाच्या चौकशीचे समर्थन केले आहे आणि आजही तेच करत आहेत.



# आजपासून अमरावती शहरात दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्ती

## चालकासह मागील प्रवाशालाही नियम लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात रस्ते अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आज (२४ जुलै)पासून दुचाकी चालकासह मागे बसणाऱ्या व्यक्तीसही आयएसआय (ISI) मानांकन असलेले हेल्मेट घालणे अनिवार्य करण्यात आले आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यान्वये विशेष कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली आहे.



पोलीस आयुक्तालयाच्या आकडेवारीनुसार, सन २०२४ मध्ये ४५४, सन २०२५ मध्ये ४१७, तर १ जानेवारी ते ३० जून २०२६ या कालावधीत २१० रस्ते अपघात झाले आहेत. प्राणघातक अपघातांपैकी सुमारे ६० टक्के अपघात दुचाकीस्वारांचे असून, हेल्मेट न घातल्यामुळे डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १२९ (सुधारित कायदा २०१९) नुसार दुचाकी चालक आणि मागील प्रवाशाला हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे. त्यानुसार अमरावती शहरातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व रस्त्यांवर हा नियम लागू करण्यात आला आहे. वाहतूक विभाग विशेष मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणार असून, वारंवार नियम मोडणाऱ्या चालकांचा ड्रायव्हिंग परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचीही तरतूद आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) संजय खताळे यांनी सर्व नागरिकांना हेल्मेटचा नियमित वापर करून रस्ते सुरक्षा मोहिमेला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा मोटार वाहन कायद्यानुसार कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे राजीनाम्यासाठी डाव्या आघाडीची निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधीः-** दिल्ली येथील विद्यार्थी आंदोलनावर पोलिसांनी अमानुष लाठी चार्ज केला. त्याचे निषेधार्थ डाव्या आघाडीच्या वतीने निदर्शने, महाराष्ट्र बंद या स्वरूपाचे आंदोलन पुकारले आहे. त्याचा भाग म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आयटक, सीटू या कामगार संघटनांसह विविध जन संघटनांच्या सहभागाने २३ जुलैला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ तीव्र निदर्शने करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचे राजीनाम्यासह न्यायालयीन चौकशीची आणि दोषी प्रशासनावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.



सदर आंदोलनाचे नेतृत्व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य अशोक सोनारकर ,जिल्हा सहसचिव डॉ.ओमप्रकाश कुटेमाटे, अमरावती तालुका सचिव निळकंठ ढोके ,शहर सचिव सुनील घटाळे व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव रमेश सोनुले ,राज्य कौन्सिल सदस्य सुभाष पांडे ,राजेंद्र भांबोरे पद्माताई गजभिये यांनी केले. आंदोलनामध्ये जयेंद्र भोगे, जे एम कोठारी, लताताई सोनारकर अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. कैलास चव्हाण ,दिगंबर नगेकर,लक्ष्मण धाकडे ,अशोकराव राऊत ,सचिन लंगोटे ,उषाताई ढवळे, सुनील देशमुख, प्रतिभा मेश्राम, पंजाबराव शिंदे ,अश्विनी लोखंडे, प्रफुल्ल मंदा श्रीधर( महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) दिलीप लाडे ,ज्योती नालट, वर्षा वानखेडे, वर्षा मेश्राम, लक्ष्मी नागदेवते ,लीना गवई ,सुषमा मोहोड,सपना गवई, प्रज्ञा सूर्यवंशी निकिता दुर्योधन, सारिका खरे, जोशना मोहोड , उज्वला इंगोले ,वंदना रवराळे, दीपमाला रंगारी, मनीषा मोरे मालती मोहोड, ललिता शेंडे ,कविता पवार, लता सोनटक्के ,किरण भोगे, मीना मावळे ,ज्ञानेश्वर मेश्राम, उद्धव कणसे ,हर्षराज चौधरी ,सुनील भोवते, चित्राताई बोरकर ,प्रमिला शेंडे, ललिता शेंडे ,मनीष तायडे, प्रतिभा कांबळे, सीमा मेश्राम, सकुरा बानो, आशाताई मेश्राम ,यास्मिन खान, रिजवाना खान, प्रियंका भगत ,अरुण मालवीय ,जया सरोदे, नेहा चुटके ,संगीता पांडे ,शबाना फिरदोस ,सबा यांनी सहभाग नोंदवला.

# १ व १० वरिल उर्वरित

## जंतर-मंतर परिसरात

जवानावर तलवारी आणि काठ्यांनी जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे. एकूण परिस्थितीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव इंटरनेट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**कॅनाट प्लेस सायंकाळी ६:३० वाजताच बंद -** जंतर-मंतरवरील एकूण परिस्थिती लक्षातात घेत 'न्यू दिल्ली म्युनिसिपल काउन्सिल'च्या अध्यक्षांच्या सूचनेनंतर, 'न्यू दिल्ली ट्रेडर्स असोसिएशन'ने मोठा निर्णय घेतला आहे. कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी टाळण्यासाठी सुरक्षेचा उपाय म्हणून गुरु वारी सायंकाळी ६:३० वाजताच कॅनाट प्लेस क्षेत्रातील सर्व दुकाने, रेस्ट?रंट्स आणि कार्यालये बंद ठेवण्याचे आवाहन व्यावसायिकांना करण्यात आले. NIA चौकशीच्या याचिकेवर CJP चे प्रत्युत्तर -दरम्यान, सीजेपी विरुद्ध राष्ट्रीय तपास यंत्रणेमार्फत (NIA) चौकशी करण्याची मागणी करणा-या जनहित याचिकेवर सीजेपी प्रवक्ता सौरव दासने सोशल मीडिया प्लॅटफार्म 'X' वर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. 'दक्षिणपंथी विचारसरणीच्या व्यक्तीकडून करण्यात आलेली ही याचिका अत्यंत संशयास्पद असून, सरकारने आंदोलक तरुण आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी, न्यायालयाच्या माध्यमाने विरोध दडपण्याचा आणि आंदोलनाला बदनाम करण्याचा डाव आखला आहे,' असा आरोप दासने केला.

## सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांनी संविधानाची

संगीता भारती, पी.व्ही. दिनेश, जयंत ठाकूर, तसेच वकील वृंदा ग्रोव्हर आणि बारचे इतर अनेक सदस्य यांचा समावेश होता. या मेळाव्यात सर्वोच्च न्यायालयाच्या बारचे मोठ्या संख्येने तरु ण सदस्य उपस्थित होते. अनेक वकिलांनी भारताचा राष्ट्रध्वज आणि संविधानाच्या प्रती हातात धरल्या होत्या. त्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व यांसारख्या घटनात्मक मूल्यांची पुष्टी करत एकत्रितपणे संविधानाची प्रस्तावना वाचली. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रीय राजधानीत नाट्यमय दृश्ये पाहायला मिळाली आहेत. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी जंतर मंतरवर जमले आणि पोलिसांनी बळाचा वापर केला. सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन, सर्वोच्च न्यायालय ?डव्होकेट्स-ऑन-रेक?र्ड असोसिएशन आणि सुमारे ६५० वकिलांच्या एका गटाने विद्यार्थ्यांवरील पोलीस लाठीचार्ज आणि हिंसाचाराचा निषेध करणारी स्वतंत्र निवेदने जारी केली आणि या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. टॅग्जः भाजप, आरएसएस, केंद्र सरकार, नीट-यूजी, राहुल गांधी, काँग्रेस, सर्वोच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, वकील, प्रस्तावना, विद्यार्थी आंदोलन, शहादत, शहादत. पुढील बातमी: ब?म्बे बार असोसिएशनने जंतर मंतर येथील विद्यार्थी आंदोलनावर चिंता व्यक्तकेली, बळाच्या वापराचा निषेध केला; सरकार आणि विद्यार्थ्यांशी अर्थपूर्ण संवादाचे आवाहन केले. अमीर अहमद २३ जुलै २०२६ दुपारी १२:५७ (२ मिनिटांचे वाचन) ब?म्बे बार असोसिएशनने जंतर मंतर येथील विद्यार्थी आंदोलनावर चिंता व्यक्तकेली, बळाच्या वापराचा निषेध केला; सरकार आणि विद्यार्थ्यांशी अर्थपूर्ण संवादाचे आवाहन केले. ब?म्बे बार असोसिएशनने (बीबीए) जंतर मंतर येथे परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या कथित बळाच्या वापराचा तीव्र निषेध केला आणि त्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. संघटनेने आंदोलकांच्या एका गटाकडून सार्वजनिक आणि खाजगी मालमत्तेचे नुकसान करण्याच्या घटनांचाही तीव्र शब्दांत निषेध केला. बीबीएचे अध्यक्ष ज्येष्ठ वकील नितीन ठक्कर यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांनी देशाच्या शिक्षण व्यवस्थेसंबंधी आणि तरु णांच्या भविष्यासंबंधी अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत, जे गांभीर्याने विचारात घेण्यासारखे आहेत. संघटनेने म्हटले आहे, 'व्हिडिओ आणि बातम्यांनुसार विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला आणि अश्रु धुराचा वापर करण्यात आला. जर हे अहवाल खरे असतील, तर आपल्या घटनात्मक हक्कांचा वापर करणा-या विद्यार्थ्यांविरु द्ध बळाचा वापर करणे हे अत्यंत चिंताजनक आणि कायद्याने चालणा-या समाजात अस्वीकार्य आहे.' बीबीएने म्हटले आहे की, कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणांनी संयम, संतुलन आणि प्रत्येक नागरिकाच्या घटनात्मक हक्कांचा व प्रतिष्ठेचा आदर राखून काम करणे अपेक्षित आहे. संघटनेने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकशाही व्यवस्थेत, शांततापूर्ण सभा घेण्याचा आणि मतभेद व्यक्तकरण्याचा अधिकार हा घटनेच्या कलम १९ अंतर्गत हमी दिलेल्या स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग आहे. शांततापूर्ण आंदोलन हा केवळ एक घटनात्मक अधिकारच नाही, तर लोकशाही व्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य देखील आहे. तथापि, बीबीएने हे देखील स्पष्ट केले की, आंदोलकांच्या कोणत्याही गटाकडून होणारी हिंसा, तोडफोड किंवा सार्वजनिक आणि खाजगी मालमत्तेचे नुकसान कोणत्याही परिस्थितीत अस्वीकार्य आहे. संघटनेने म्हटले आहे की, 'हिंसेचा अवलंब केल्याने कोणत्याही शांततापूर्ण आंदोलनाची वैधता कमी होते आणि कोणत्याही परिस्थितीत त्याचे समर्थन केले जाउ शकत नाही. घटनात्मक अधिकारांचा वापर करताना शांततेने आणि जबाबदारीने वागणे बंधनकारक आहे.' बीबीएने एफआयआर दाखल करून बळाचा वापर आणि दहशत निर्माण करण्यावरही आक्षेप घेतला.

## काँग्रेसच्या आंदोलनाच्या निषेधार्थ

शांततेत निदर्शने करत असताना परिस्थिती लक्षात घेऊन फ्रेजरपुरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी भाजयुमोच्या पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना ताब्यात (डिटेन) घेतले. पोलिसांच्या या कारवाईदरम्यानही कार्यकर्त्यांनी संयम राखत शांततेने सहकार्य केले. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. आंदोलनात भाजपा शहर जिल्हा महामंत्री आकाश पाटील, अश्विन राऊत, शुभ साहू, हरीश साऊरकर, श्रवण मेहरे, निलेश शर्मा, तुषार आंबोरे, राम गुप्ता, उमंग मोंगा, अनिकेत तारवानी, अनिकेत विश्वकर्मा, उमेश बछले, मनीष अडविकर, निलेश डागा, साहिल शर्मा, आदित्य खैरकर, हर्ष पाली, अक्षय वेल्लूरकर, श्रीकांत बिजवे, ऋषिकेश ठेलकर, आकाश गौड, विशाल लोथे, आर्यन तायडे, राम कुंभारकर, अर्णव कडू, सर्वेश थवली, अभी किल्लेकर, सोहम बाहेकर, नील बोजे, श्रीतेज धानोरकर, अनुप बचे, यश अंबालकर यांच्यासह भाजयुमोचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेपरफुटी प्रकरणात तिवस्यात

घेण्यात आली.त्यात बेधुंदकार गोविंद पोल्हाड, सोहंम करतीकर यांनी आपल्या भाषणातून केंद्रासह राज्य सरकार जोरदार प्रहार केला.शेवटी भर पावसात आंदोलकांनी हायवेवर उतरून सरकारविरुद्ध तीव्र घोषणाबाजी करीत संताप व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नावर तिवसा शहरात अभूतपूर्व सर्वपक्षीय एकजूट पाहायला मिळाली.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी,राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार),भारतीय कम्युनिस्ट पक्ष,शिवसेना,प्रहार,किसान मजदूर संघटना, मनसे,भारतीय बौद्ध महासभा,माकप-भाकप यासंह विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी, पालक,शिक्षक, व्यापारी आणि नागरिकांनी बंदमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पक्षीय मतभेद बाजूला ठेवत सर्वांनी कथित पेपरफुटीच्या घटनांचा निषेध व्यक्त केला.यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सह शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. आयोजित निषेध सभेच्या समारोपीय प्रसंगी काही काँग्रेससह आंदोलक कार्यकर्ते यांनी रस्त्यावर उतरून काही काळ चक्कजाम केला असता पोलिस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांना अटक करून सुटका केली. विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग या आंदोलनात पाहायला मिळाला.यावेळी पोलीसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दिल्ली येथील जंतर मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलादरम्यान पोलिस प्रशासनाच्या वतीने हुकूमशाही पद्धतीने झालेला लाठीहल्ला निंदनीय असून या प्रकरणाची जबाबदारी घेत मानवतावादी दृष्टिकोनातून भाजपा च्या खासदार, आमदारांनी राजीनामे द्यावेत असे आवाहन यावेळी या निषेध सभेतून करण्यात आले.

## शालेय गणवेशाचा कंत्राट देण्याच्या

चांदूरकरांसोबत ओळख होती. यामुळे आरोपीने त्यांना शालेय गणवेशाचा मोठा सरकारी कंत्राट मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यासाठी काही रक्कम ॲडव्हान्स द्यावी लागेल, असे सांगून चांदूरकरांचा विश्वास संपादन केला. फिरोज खानवर विश्वास असल्याने चांदूरकर यांनी त्याला १० लाख रुपयांचा चेक आणि १ लाख रुपये रोख दिले. स्टॅम्प पेपरवर करारही करण्यात आला.आरोपींनी हे ११ लाख रुपये आपल्या कंपनीच्या खात्यात जमा करून घेतले. तसेच बनावट चेक आणि करारनामा देऊन चांदूरकरांची फसवणूक केली. मात्र त्यांना गणवेशाचा कंत्राट मिळाला नाही. यामुळे चांदुरकरांना संशय आला आणि त्यांनी आपले पैसे परत मागितले. पैसे परत मागितल्यावर आरोपींनी टाळाटाळ केली. 'पैसे परत देणार नाही, जे करायचे ते कर' असे म्हणत शिवीगाळ केली आणि 'जीवाने मारून टाकू' अशी धमकीही दिली, असे तक्रारीत म्हटले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे त्रासलेल्या चांदूरकर यांनी २२ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी कलम ३१६(२), ३१८(४), ३५१(२)(३)(५) बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक इक्बाल खान करत आहेत.

## कुख्यात बादल लुंडवर एमपीडीए

तडीपारीची कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही त्याच्या गुन्हेगारी कारवाया सुरूच राहिल्या. त्यामुळे राजापेठ पोलिस ठाण्याचे ठाणेदार संदीप चव्हाण यांनी बादल लुंड विरुद्ध एमपीडीए प्रस्ताव तयार केला होता. पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त प्रांजली सोनवणे तसेच गुन्हे शाखेचे निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव तयार करण्यात आला.पोलिस आयुक्तांनी २२ जुलै रोजी या कारवाईचे आदेश पारित केले. त्यानंतर पोलिसांनी आदेश अमलात आणत आरोपी बादल लुंड याला स्थानबद्धतेच्या कालावधी करिता अमरावतीच्या मध्यवर्ती कारागृहात दाखल केले आहे. गुन्हेगारी करणाऱ्यांवर आगामी काळातही अशाच कठोर एमपीडीए अंतर्गत कारवाया सुरूच राहणार असल्याचे संकेत गुन्हे शाखेने दिले आहेत.

## तलवार,कोयता,कट्यारसह

चौकाकडे पायी जात आहे.या वरून पथकाने कार्यवाही करून आरोपीला ताब्यात घेतले.पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्या हातातील प्लास्टिक पिशवीची तपासणी केली असता त्यात १ स्टीलची धारदार तलवार, १ लोखंडी चायना कोयता आणि १ स्टीलचा कट्ट्यार सह एकूण ६ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरुद्ध नागपुरी गेट पोलीस ठाण्यात कलम ४/२५ आर्म्स ॲक्ट सह कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनखाली, उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे सपोआ कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो.नि. अतुल वर, सपोनि. दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात महेश इंगोले, गजानन सोनुने, सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख,मनोज ठोसर, मंगेश परिमल,सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग,अतुल संभे,संजय भारसाकळे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले,चेतन गुल्हाने,संदिप खंडारे,प्रभात पोकळे,राहूल दूधे यांनी केली.

## लैंगिक अत्याचार करणाऱ्याला ४ वर्ष

आरोपीच्या घरी गेली असता तिने हा प्रकार पाहिला. घाबरलेल्या बहिणीने घरी जाऊन आपल्या आजीला संपूर्ण घटना सांगितली. यानंतर पीडितेची आजी व मामा आरोपीच्या घरी गेले. मात्र, त्यांना येताना पाहून आरोपी तेथून फरार झाला. त्या नंतर घाबरलेल्या अवस्थेत पीडितेने आपल्यासोबत घडलेला प्रकार कुटुंबीयांना सांगितला. त्याच रात्री पीडितेच्या आजीने नागपुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.पोलिसांनी आरोपी विरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(३), ३७६(२) तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास महिला पोलीस उपनिरीक्षक जे. आर. बळेगावे यांनी केला. तपासादरम्यान पुरेसे पुरावे मिळाल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक-२ वाय. ए. गोस्वामी यांच्या न्यायालयात झाली. शासनाच्या वतीने अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. दिलीप तिवारी यांनी बाजू मांडत एकूण १० साक्षीदारांची साक्ष नोंदवली. सुनावणी दरम्यान उपलब्ध पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांचा विचार करून न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ७ व ८ अंतर्गत दोषी ठरविले. आरोपीस पॉक्सो कायद्याच्या कलम ८ अंतर्गत चार वर्षे, दोन महिने आणि पंधरा दिवसांचा सश्रम कारावास तसेच ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला.दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला एक महिन्याचा अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागणार आहे.या शिवाय न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७-अ अन्वये पीडितेला योग्य नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. ॲड. दिलीप तिवारी यांनी प्रभावी पणे बाजू मांडली. तर न्यायालयीन कामकाजात विनोद कनोजिया आणि अरुण हटवार यांनी सहकार्य केले.

## वंचितच्या बंदला अमरावतीत

बंदला अनेक सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला. आंदोलनात विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संस्थाही सहभागी झाल्या.आज गुरुवार २३ जुलैच्या सकाळ पासूनच वंचित बहुजन आघाडीसह समविचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून इर्विन चौकातून शहरात रॅली काढली. ही रॅली शहरातील सर्व प्रमुख चौक आणि व्यापारी भागातून गेली. दरम्यान खुले दिसणारे व्यापारी प्रतिष्ठान बंद करण्याची विनंती करण्यात आली. त्यानंतर राजकमल चौक, जयस्तंभ चौक, गांधी चौक, इर्विन चौक, सरोज चौक, अंबापेठ, राजापेठ, श्याम चौक, बापट चौक, जवाहर रोड, गाडगेनगर, चपरासीपुरा, कॅम्प आणि बडनेरा रोड सह इतर प्रमुख भागातून मोर्चा काढण्यात आला.दुपारी १२ नंतर सर्व आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयावर एकत्र झाले आणि तेथे केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.वंचित बहुजन आघाडीच्या आवाहनावर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्येही बंद पाळण्यात आला. समविचारी संघटनांसह मोर्चे आणि रॅली काढण्यात आल्या. व्यापारी प्रतिष्ठान बंद ठेवण्यात आले. आंदोलकांनी राष्ट्रपतींच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. बंदला भारतीय बौद्ध महासभा, रिपाई गवई गट, संयुक्त रिपाई, महिला मुक्ती मोर्चा, लोकशाही जनता पार्टी आणि भीम ब्रिगेड सारख्या संघटनांनी पाठिंबा दिला. शहरातील अनेक शैक्षणिक संस्थांनीही बंदला पाठिंबा देत आपले प्रतिष्ठान बंद ठेवले. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही पाठिंबा दिला होता.

## अकोला कारागृहात न्यायालयीन

चार महिन्यांपूर्वी पत्नी वृषाली निंबोकार यांच्या हत्येप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. अटकेनंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्यानुसार तो अकोला जिल्हा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आला होता. प्राथमिक माहितीनुसार, कारागृह परिसरातील विहिरीत पडल्याने त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कारागृह प्रशासनाने तातडीने आवश्यक प्रक्रिया सुरू केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, संबंधित यंत्रणांकडून पंचनामा आणि अन्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. अनिल आणि वृषाली यांचा विवाह सुमारे तेरा वर्षांपूर्वी झाला होता. त्यांना दोन मुले असून, आई-वडिलांसह दोन एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. कौटुंबिक वाद आणि पत्नीच्या चारित्र्याबाबतच्या संशयातून हत्येची घटना घडल्याचा आरोप त्याच्यावर आहे. या प्रकरणाचा न्यायालयीन खटला सुरू असतानाच त्याचा कारागृहात मृत्यू झाल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. न्यायालयीन बंदी कारागृहातील विहिरीपर्यंत कसा पोहोचला, त्यावेळी सुरक्षा व्यवस्थेची स्थिती काय होती आणि देखरेखीत कोणती त्रुटी राहिली का, याबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. या सर्व बाबींचा तपास चौकशीदरम्यान केला जाणार असल्याचे समजते.

दरम्यान, मृताच्या कुटुंबीयांनी या घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. सध्या उपलब्ध माहितीनुसार आत्महत्येचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असला, तरी अधिकृत चौकशी, शवविच्छेदन अहवाल आणि तपास यंत्रणांच्या निष्कर्षानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## २१४ ग्रॅम एमडी ड्रग्ससह सराईत

त्यामध्ये ४२.८० लाख किमतीचे एमडी ड्रग्स, चारचाकी कार व तीन मोबाईल फोनचा समावेश आहे. गुन्हे शाखा युनिट क्र. १ च्या पथकाला गुप्त माहिती मिळाली होती की, पाटीपूरा येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार सईद खान शरीफ खान (वय ४१, रा. पाटीपूरा, अमरावती) हा त्याच्या एमएच-४०/सीए-२१९१ क्रमांकाच्या लाल रंगाच्या स्विफ्ट कारमधून मेफेड्रोन (एमडी) विक्रीसाठी ताजनगर परिसरात येणार आहे. या माहितीच्या आधारे २२ जुलै रोजी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचून आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे २१४ ग्रॅम (०.२१४ किलो) मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ आढळून आला. चौकशीदरम्यान हा अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगल्याची कबुली आरोपीने दिली. त्यानंतर पोलिसांनी अमली पदार्थासह कार आणि तीन मोबाईल असा एकूण ५० लाख ९९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २१(क), २२(क) व २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीकडून अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीबाबत पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर व ब्राम्हे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक अतुल वर तसेच त्यांच्या पथकाने केली.

## अंजनगाव सुर्जीतील बियाणे

असून तालुकाभरात संतापाची लाट उसळली आहे.तालुका कृषी विभागाकडे आतापर्यंत ३०० हून अधिक शेतकऱ्यांनी लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. यावर्षी तालुक्यात सुमारे ९,९९८ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी करण्यात आली होती. मात्र, अनेक गावांमध्ये २० ते ३० टक्क्यांपेक्षाही कमी उगवण झाल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे मोठे संकट ओढवले आहे.या प्रकरणाची व्याप्ती आता केवळ कृषी विभागापुरती मर्यादित राहिलेली नाही. फसवणूक झाल्याच्या भावनेतून शेतकऱ्यांनी थेट पोलिसांचा दरवाजा ठोठावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात २ आणि रहिमापूर पोलीस ठाण्यात ३ असे एकूण ५ गुन्हे संबंधित बियाणे कंपनी आणि विक्रेत्यांविरोधात दाखल करण्यात आले आहेत. यामुळे संबंधित कंपनीवरील कारवाईला वेग येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलीस विभागाकडून सध्या तक्रारदार शेतकऱ्यांचे जबाब नोंदवून घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. घटनेची सविस्तर माहिती संकलित केली जात असून प्राथमिक चौकशीनंतर संबंधित बियाणे कंपनीच्या मालकांना थेट आरोपी बनवण्याची प्रक्रिया सुरू होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी आतापर्यंत प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारींचा आढावा घेतला, पोलिसांत दाखल झालेल्या गुन्ह्यांची माहिती घेतली, कृषी विभागाने केलेल्या शेत पडताळणी आणि पंचनाम्यांची स्थिती जाणून घेतली. या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर आणि वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने सादर करण्याचे कडक निर्देश त्यांनी कृषी अधिकाऱ्यांना दिले आहेत. तहसीलदारांनी लक्ष घातल्याने प्रशासनाची हालचाल वाढली आहे. या प्रकरणात तक्रारदार शेतकऱ्यांचे बयान नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच कृषी विभागाकडून आवश्यक माहिती मागविण्यात आली आहे. संबंधित कागदपत्रे व तपासातील पुरावे प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार संबंधित सोयाबीन बियाणे कंपनीच्या मालकांचा गुन्ह्यात समावेश करण्यात येईल.'

**-प्रशांत देशमुख, ठाणेदार, रहिमापूर पोलीस स्टेशन**

## सेवानिवृत्त शिक्षिकेच्या बंद घरात

उडाली आहे. मौलाना आझाद कॉलनीतील रहिवासी आणि सेवानिवृत्त शिक्षिका शगुफ्ता यास्मीन मोबीन खान पठाण (वय ६५) सुमारे २ महिन्यांपूर्वी आपल्या घरी कुलूप लावून पुण्याला मुलीकडे गेल्या होत्या. अमरावतीला त्या परतण्याच्या आदल्या दिवशीच अज्ञात चोरांनी त्यांच्या घराला निशाणा बनवून लाखोंचा मुद्देमाल लंपास केला.या घटनेमुळे कुटुंबीयांना धक्का बसला. चोरट्यांनी आधी घराच्या छतावरील मार्गाने घरात प्रवेश केला. त्यानंतर घराच्या दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि संपूर्ण घराची झडती घेतली. विशेषतः कपाटाला लक्ष्य केले, जिथे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम ठेवली होती.माहितीनुसार चोरट्यांनी सुमारे ३० तोळे सोन्याचे दागिने आणि ५० हजार रुपये रोख लंपास केले. चोरी गेलेल्या मालाची एकूण किंमत लाखोंमध्ये असल्याचे सांगण्यात येत आहे.घटनेची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा केला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून फॉरेन्सिक आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.ही घटना उघडकीस आल्यानंतर शेजारी आणि परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी बंद घरांना लक्ष्य करणाऱ्या चोरांपासून सावध राहण्याचे आणि प्रवासाला जाण्यापूर्वी शेजारी व स्थानिक पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.


### जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश -७, यांचे न्यायालय**

[illegible]

Non applicant-

[illegible] Nagar, Amravati

**APPLICATION FOR SUBSTITUTED SERVICE UNDER OPRDER 5 RULE 20-A OF CIVIL PROCEDURE CODE, 1908**

[illegible]

अमरावती
दिनांक: [illegible]

[illegible]

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, २४ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ शेलूबाजारात शिवसेनेचे निषेध आंदोलन

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

*दिल्ली येथे NEET परीक्षेशी संबंधित विविध प्रश्न तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील शेलूबाजार येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने काळ्या फिती बांधून निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात परिसरातील नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला, शेतकरी, व्यापारी तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.*



शेलूबाजार येथील मुख्य चौकात झालेल्या आंदोलनात विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा तीव्र निषेध करण्यात आला. विद्यार्थ्यांना लोकशाही मार्गाने आपले प्रश्न मांडण्याचा घटनात्मक अधिकार असून त्यांच्या आवाजाला दडपण्यासाठी बळाचा वापर करणे अयोग्य असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेऊन संवाद साधावा, अशी मागणीही करण्यात आली. आंदोलनादरम्यान निषेधाच्या घोषणा देत विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांना जाहीर पाठिंबा दर्शविण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख अर्जुन भीमराव पाटील सुर्वे, उपजिल्हाप्रमुख सचिन परळीकर, तालुका संघटक शिवा पाटील सावके, विधानसभा प्रमुख बंडूभाऊ वैद्य, ओम इंगळे आणि ह.भ.प. विष्णूपंत राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आंदोलनात भागवतराव शिंदे, देविदासभाऊ मुखमाले, देविदासभाऊ जाधव, धीरज राऊत, अशोक हांडे सर, संतोष लांभाडे, राम बोते, सुभाषभाऊ शिंदे, नामदेवराव गावंडे, प्रतापराव जायभाये, सतीश गावंडे, बाळकृष्ण रोकडे, पंकज राऊत, महेंद्र ठाकरे, युवराज सुर्वे, विनोद वैद्य, प्रकाश अपूर्वा, संदेश हरणे, भोलेनाथ राऊत, जलील खान, अकिल तेली, विवेक बारड, निलेश बारड, दीपक उपाध्ये, गोवर्धन पाटील, दिलीप राऊत, विठ्ठल खंडारे, समाधान सावके, मोहन सावके, भूषण सुर्वे, हरी चौधरी, अरुण उजवने, रामराव वाघमारे, भीमराव भगत, आशिष सोनोने, रोहित तायडे, विठ्ठल सुर्वे, अंकुश डोफेकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, युवासेना पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, शिवसैनिक, विद्यार्थी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिल्लीतील लाठीचार्जच्या निषेधार्थ

## वंचित बहुजन आघाडीचा कडकडीत बंद विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आंदोलन

■ प्रतिनिधी | रिसोड ■

दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी रिसोड तालुक्यातील केशवनगर येथे गुरुवार, २३ जुलै रोजी वंचित बहुजन आघाडीच्या गोवर्धन सर्कलच्या वतीने कडकडीत बंद व निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी 'भारत माता की जय', 'जय भीम' अशा घोषणांसह विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा तीव्र निषेध व्यक्त केला. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे केंद्र शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात उत्तम



झगडे, डॉ. जावेद शेख, विनोद अंभोरे, दीपक भालेराव, संदीप भालेराव, गौतम भालेराव, अजय भालेराव, प्रशांत भालेराव, अनिल भालेराव, वैभव भालेराव, धवसे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

केशवनगर परिसरात बंदला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संविधानिक मूल्यांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि लोकशाही हक्कांच्या समर्थनार्थ हे आंदोलन शांततापूर्ण वातावरणात पार पडले. आंदोलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाशी ऐक्य व्यक्त करत त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ पातूर कडकडीत बंद

## वंचित बहुजन आघाडी व शिवसेना उभाठाचा संयुक्त मोर्चा; शहरात दिवसभर शुकशुकाट



■ प्रतिनिधी | पातूर ■

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या संयुक्त आवाहनाला गुरुवारी पातूर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील मुख्य बाजारपेठेसह बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने दिवसभर बंद राहिल्याने पातूरमध्ये कडकडीत बंदचे चित्र पाहायला मिळाले.

बंदमुळे सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी दवाखाने, रुग्णालये आणि औषधालयांना बंदमधून वगळण्यात आले होते. त्यामुळे आरोग्य सेवा नियमित सुरू राहिल्या. अत्यावश्यक सेवांवर कोणताही परिणाम झाला नाही. बंदनंतर वंचित बहुजन आघाडी व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी शहरातून भव्य निषेध मोर्चा काढला. मुख्य बाजारपेठेतून निघालेल्या या मोर्चात विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा तीव्र निषेध करण्यात आला. आंदोलकांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवर लाठीमाराचे आदेश देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पातूर शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि संवेदनशील ठिकाणी पोलीस व होमगार्डचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पातूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार आर. टी. जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दिवसभर परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे बंद आणि निषेध मोर्चा कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडला.

बंदला व्यापारी, नागरिक तसेच विविध सामाजिक घटकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे शहरातील दैनंदिन व्यवहार जवळपास ठप्प झाले होते. मुख्य बाजारपेठेत शुकशुकाटाचे वातावरण पाहायला मिळाल्याने आंदोलनाची तीव्रता स्पष्टपणे जाणवली.

# जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र बंदला चांगला प्रतिसाद



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीच्या वाशिम, मालेगाव, रिसोड, मंगरुळपीर, कारंजा, मानोरा या तालुक्यात वंचित बहुजन आघाडीचा महाराष्ट्र बंद अतिशय शांत व संविधानिक मार्गाने यशस्वी झाला. या महाराष्ट्र बंद ला वाशिम येथे रंगनाथ धांडे, जोतीताई इंगळे, सूर्यकांत गायकवाड, रिसोड मध्ये महेश तिडके, प्रदीप खंडारे, सदाभाऊ गायकवाड, गोवर्धन सर्कल मध्ये विनोद अंभोरे, उत्तम झगडे, सोनाजी इंगळे, मालेगाव मधुन अमोल पखाले, संदीप सावळे, मंगरूळनाथ मध्ये समाधान भगत, नरेंद्र राऊत, शंकरदादा तायडे, कारंजा मधुन भारत भगत, दिलीप रोकडे, देवराव कटके, मानोरा तालुका मधुन नंदू गायकवाड, चक्रनारायण यांनी पुढाकार घेऊन बंद यशस्वी केला. त्याच बरोबर सर्व आजी माजी जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, सर्कल पदाधिकारी तथा कार्यकर्ते तसेच सर्व विद्यार्थी, शेतकरी, कर्मचारी, वाहतूक कर्मचारी, आणि व्यापारी वर्ग यांनी चांगला प्रतिसाद दिला. दिनांक २० जुलै रोजी दिल्लीमध्ये जंतर मंतर मैदानावर शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष हल्ल्याच्या आणि लाठीचार्जच्या पार्श्वभूमीवर, सोनम वांगचूक यांच्या बेकायदेशीर अटके विरुद्ध सोनम वांगचूक व विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आणि पोलिसांच्या या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी 'वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड बाळासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २३ जुलै रोजी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिली होती.

# दिल्लीतील जंतर-मंतरवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ बंद

■ प्रतिनिधी | रिसोड ■

दिल्लीतील जंतर-मंतर येथे २० जुलै रोजी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांकडून झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ?ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला रिसोड शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष महेश तिडके यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, दि. २३ जुलै रोजी रिसोड शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. बंदपूर्वी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यापारी, व्यावसायिक तसेच नागरिकांना शांततेच्या मार्गाने बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते. तसेच पोलीस प्रशासनालाही निवेदन देऊन बंद शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शहरातील बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवण्यात आली. मुख्य बाजारपेठांसह विविध भागांत शुकशुकाट दिसून आला.

या आंदोलनाला राष्ट्रीय काँग्रेस, संभाजी ब्रिगेड, भारतीय बौद्ध महासभा, विद्यार्थी कृती समिती तसेच विविध समविचारी सामाजिक संघटनांनी पाठिंबा दर्शविला. सर्व संघटनांच्या प्रतिनिधींनी एकत्र येत तहसीलदार यांना निवेदन सादर करून विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदविला. आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली.

बंददरम्यान शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिस्थितीवर सतत लक्ष ठेवत बंद शांततेत पार पडण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली. त्यामुळे कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही आणि संपूर्ण बंद शांततेत यशस्वीरीत्या पार पडला.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष महेश तिडके, माजी शहराध्यक्ष प्रदीप खंडारे, शहराध्यक्ष सदानंद गायकवाड, प्रकाश गवई, मायाताई अंभोरे, प्रमिलाताई शेवाळे, गोपाल पारिस्कर, गजानन खंडारे, अभिषेक सपकाळ, प्रकाश सभादिंडे, सुजाताताई खरात, संदीप मोरे, संभाजी ब्रिगेडचे अर्जुन पाटील खरात, गोपालभाऊ खडसे, रमेश सदार, भारतीय बौद्ध महासभेचे शालिग्राम पठाडे, माधवराव हिवाळे, देविदास सोनुने, कैलास जुमडे आदींची उपस्थिती होती.


# २.०७ कोटींच्या बायोमायनिंगचा 'कागदी खेळ' की प्रत्यक्ष प्रक्रिया?

## ३७,८०२ की ४२ हजार मेट्रिक टन ? कचऱ्याच्या आकडेवारीवरच प्रश्नचिन्ह ; स्वच्छ भारत मिशनकडून स्वतंत्र चौकशीची मागणी

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पावरील प्रश्नांची मालिका आता अधिकच गंभीर वळणावर पोहोचली आहे. सलग प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनंतर नगर परिषद प्रशासनाने कंत्राटदाराला आवश्यक तांत्रिक कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, याच घडामोडीमुळे, 'प्रत्यक्ष काम आधी झाले की आता कागदपत्रे पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे ? ' नवी चर्चा शहरात सुरू झाली आहे.

### कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू ; पण वाढतच चालले संशयाचे ढग



संग्रहित छायाचित्र

विशेष म्हणजे, प्रशासनाकडूनच कामाशी संबंधित अनेक महत्त्वाची कागदपत्रे अद्याप अपूर्ण असल्याचे सांगितले जात असताना, दुसरीकडे प्रकल्प पूर्ण झाल्याचे दावे करण्यात आले. त्यामुळे 'काम पूर्ण झाले की फक्त कागद पूर्ण झाले?' हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

याचवेळी नगर परिषदेतील सत्ताधारी नगराध्यक्षा, आरोग्य सभापती आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी अद्यापही कोणतीही स्पष्ट सार्वजनिक भूमिका घेतलेली नाही. उलट काही स्तरांवर कंत्राटदाराची बाजू मांडली जात असल्याची चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेला सत्ताधाऱ्यांची मूकसंमती आहे का, असा प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत. या चर्चांची स्वतंत्र पुष्टी झालेली नसली, तरी सार्वजनिक पैशातून राबविण्यात आलेल्या प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींचे मौन नागरिकांच्या शंकांना अधिक खतपाणी घालत असल्याचे बोलले जात आहे.

### ३७,८०२ की ४२ हजार मेट्रिक टन? आकडेवारीच ठरत आहे वादाचा केंद्रबिंदू

या प्रकरणातील सर्वात मोठा संशय आता कचऱ्याच्या प्रमाणावर व्यक्त होत आहे. नगर परिषद प्रशासनाने ३७ हजार ८०२ मेट्रिक टन लिगसी वेस्टवर प्रक्रिया झाल्याचा दावा केला आहे. मात्र, कंत्राटदाराने सादर केलेल्या मागणीत सुमारे ४२ हजार मेट्रिक टन घनकचऱ्यावर प्रक्रिया केल्याचा उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे. कोणताही कंत्राटदार दिलेल्या कामापेक्षा शिल्लक काम करणार का ? हा यक्ष प्रश्न यानिमित्ताने याठिकाणी उपस्थित होत आहे. दोन्ही आकड्यांमध्ये हजारो मेट्रिक टनांचा फरक असल्याने नेमका अधिकृत आकडा कोणता, हा प्रश्न निर्माण झाला आहे. या विसंगतीबाबत अद्याप कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही.

### स्क्रीनिंग किती दिवस? कोणत्या मशिनवर?

३७ हजारांहून अधिक मेट्रिक टन कचऱ्याचे स्क्रीनिंग कोणत्या ट्रॉमल मशीनवर करण्यात आले? त्या मशिनची क्षमता किती होती? प्रतिदिन किती तास काम झाले? एकूण प्रक्रिया किती दिवस चालली? डिझेलचा वापर, मशिन लॉगबुक, ऑपरेटर नोंदी आणि देखभाल अभिलेख उपलब्ध आहेत का? या प्रश्नांचीही उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत.

### 'ब' वर्ग नगर परिषद... मग एवढा कचरा आला कुठून?

घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील जाणकारांच्या मते, 'ब' वर्ग नगर परिषद असलेल्या अकोट शहरात तीन वर्षांच्या कालावधीत निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचा आकडा साधारणतः ३० हजार मेट्रिक टनांच्या आसपास अपेक्षित असतो. अशा परिस्थितीत थेट ३७ हजार ८०२ मेट्रिक टन, तर दुसरीकडे ४२ हजार मेट्रिक टन प्रक्रिया झाल्याचा दावा करण्यात आल्याने कचऱ्याच्या मोजमाप प्रक्रियेबाबतच प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. ही मते अधिकृत निष्कर्ष नसून क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त करण्यात आलेली निरीक्षणे आहेत. त्यामुळे या आकडेवारीची स्वतंत्र तांत्रिक पडताळणी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

### 'फुगीर आकडेवारी'ची चर्चा; स्वतंत्र चौकशीची मागणी

या सर्व घडामोडींमुळे शहरात आता घनकचऱ्याची आकडेवारीच फुगवून दाखविण्यात आली का, अशी चर्चा सुरू झाली आहे. ही चर्चा अथवा आरोप अद्याप कोणत्याही सक्षम चौकशी यंत्रणेने सिद्ध केलेले नाहीत. मात्र, वाढत्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या स्वच्छ भारत मिशनच्या विशेष पथकामार्फत स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिक व काही माजी लोकप्रतिनिधींकडून पुढे येत आहे.

सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पात संशयाला वाव राहू नये, यासाठी सर्व संबंधित कागदपत्रे, तांत्रिक अहवाल आणि अभिलेख पारदर्शकपणे सार्वजनिक करणे, हीच प्रशासनाची खरी कसोटी ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

### मजूर कुठे? पीएफ-ईएसआयसी नोंदी कुठे?

कंत्राटदाराच्या म्हणण्यानुसार बायोमायनिंगचे काम दिवस-रात्र सुरू होते. जर तीन शिफ्टमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर काम झाले असेल तर त्या ठिकाणी कार्यरत मजुरांची नोंद, हजेरीपत्रके, पीएफ, ईएसआयसी, वेतन अभिलेख, सुरक्षा नोंदी आणि इतर कामगारविषयक कागदपत्रे नगर परिषदेसमोर सादर करण्यात आली आहेत का? याबाबत कोणताही अधिकृत खुलासा झालेला नाही.इतक्या मोठ्या प्रकल्पात मनुष्यबळाच्या नोंदीच उपलब्ध नसतील, तर प्रत्यक्ष कामाच्या व्याप्तीची पडताळणी कशाच्या आधारे होणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

### जून २०२५ पर्यंतचे मोजमाप... मग एका वर्षाचा कचरा कुठे गेला?

प्रशासनाच्या माहितीनुसार, संबंधित मोजमाप जून २०२५ पर्यंतच्या लिगसी वेस्टचे आहे. मात्र त्यानंतर जुलै २०२६ पर्यंतच्या जवळपास एका वर्षात शहरातून डंपिंग ग्राऊंडवर मोठ्या प्रमाणात घनकचरा जमा झाला असणे अपेक्षित आहे. स्थानिकांकडून व्यक्त होत असलेल्या निरीक्षणांनुसार, प्रत्यक्ष पाहणीत एवढ्या प्रमाणात अतिरिक्त कचरा दिसून येत नसल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे जून २०२५ नंतर जमा झालेल्या कचऱ्याचे स्वतंत्र मोजमाप करण्यात आले का? तो कुठे आहे?

### आरडीएफ किती निघाला? गेला कुठे?

या प्रक्रियेदरम्यान निर्माण झालेला आरडीएफ (Refuse Derived Fuel) तीन-चार वेगवेगळ्या संस्थांकडे देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, एकूण किती मेट्रिक टन आरडीएफ निर्माण झाला, कोणत्या तारखेला कोणत्या संस्थेकडे पाठविण्यात आला, त्याची स्वीकार पावती, वजनकाट्याच्या नोंदी, वाहतूक अभिलेख आणि अंतिम प्रमाणपत्रे याबाबत अद्याप माहिती सार्वजनिक झालेली नाही. त्याचप्रमाणे बायोमायनिंग प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या लिचेटचे व्यवस्थापन कशा पद्धतीने करण्यात आले, त्याबाबतही अधिकृत तांत्रिक माहिती समोर आलेली नाही. केवळ लिचेट टँक निर्माण करून त्याचा देखावा डंपिंग ग्राऊंडवर उभारणे म्हणजे लिचेट व्यवस्थापन झाले असे होत नाही. त्याची नोंद कोणत्या अभिलेखात आहे? असे प्रश्न आता पुढे येऊ लागले आहेत.

**कायदेशीर सूचना :** या वृत्तातील सर्व मुद्दे उपलब्ध कागदपत्रे, संबंधित विभागाकडून प्राप्त माहिती, स्थानिकांकडून व्यक्त करण्यात आलेली निरीक्षणे व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर आधारित आहेत. यातील कोणताही कथित गैरव्यवहार, अनियमितता किंवा आर्थिक नुकसान सक्षम चौकशी यंत्रणेने अद्याप सिद्ध अथवा पुष्टी केलेले नाही. संबंधित नगर परिषद, अधिकारी, लोकप्रतिनिधी किंवा कंत्राटदार यांची अधिकृत भूमिका प्राप्त झाल्यास तीही त्याच प्राधान्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३७ ■ शुक्रवार, २४ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

## खाकीचां सखा उपक्रमातून नागरिकांशी संवाद

### अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाईचा ठाणेदार पंकज वाघोडे यांचा इशारा

**सेलू जनमाध्यम :** सेलू पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर खाकीचां सखा या उपक्रमांतर्गत पत्रकार आणि शांतता समिती सदस्यांशी संवाद साधला. नागरिकांच्या सहकार्याशिवाय गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण शक्य नसल्याचे सांगत त्यांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला.

बैठकीत शहरातील वाढती अवैध दारू विक्री, त्यातून होणारे अपघात, घरफोडी आणि इतर गुन्ह्यांवर चर्चा झाली. नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता अवैध धंद्यांची माहिती गुप्तपणे पोलिसांना द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल आणि संबंधितांवर तातडीने कारवाई केली जाईल, अशी ग्वाही वाघोडे यांनी दिली.

## लाठीच्या जोरावर विद्यार्थ्यांचा आवाज दाबणार कोण

# वर्धा जिल्हा पेटला; बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद, मोर्चांनी प्रशासनाला घाम फोडला

### जिल्हाभर संताप उसळला; केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, चौकशी व दोषींवर कठोर कारवाईची एकमुखी मागणी









**वर्धा जनमाध्यम :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ गुरुवारी वर्धा जिल्हा संतापाने पेटून उठला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ?ड. प्रकाश आंबेडकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत वर्धा शहरासह देवळी, समुद्रपूर आणि हिंगणघाट येथे बंद, निषेध मोर्चे आणि निदर्शने करण्यात आली. हजारो नागरिक, विद्यार्थी, युवक, सामाजिक, आंबेडकरी, कामगार आणि विविध राजकीय संघटनांचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरल्याने जिल्हाभर आंदोलनाचे तीव्र पडसाद उमटले. शहरातील अनेक व्यापारी प्रतिष्ठाने बंद राहिल्याने बंदला व्यापक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले.

वर्धा शहरात जिल्हाध्यक्ष किशोर खैरकार यांच्या नेतृत्वाखाली बजाज चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. आयटक, आम आदमी पार्टी, विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक व आंबेडकरी संघटनांसह हजारो आंदोलनकर्ते हातात तिरंगा, संविधानाचे संदेश आणि निषेध फलक घेऊन रस्त्यावर उतरले. विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, दिल्ली पोलिस मुर्दाबाद, संविधानाचा विजय असो अशा घोषणांनी शहर दणाणून गेले. मोर्चामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला होता.

जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर शिष्टमंडळाने शासनाच्या नावे निवेदन सादर केले. विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याची उच्चस्तरीय चौकशी करावी, दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

मोर्चाला सोशल निर्माण कोरमचे नीरज गुजर, भीम टायगर सेनेचे विशाल रामटेके, भारतीय बौद्ध महासभेचे विशाल मानकर, भीम आर्मी संविधान रक्षक दलचे आशीष सोनटक्के, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे प्रमोद भोमले, भीमा आर्मीचे प्रदीप कांबळे, काँग्रेसचे सुनील कोल्हे, आरपीआय (आंबेडकर)चे महेंद्र बनेश्वर, एमआयएमचे आसिफ खान यांच्यासह विविध संघटनांनी पाठिंबा दिला. दरम्यान, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानेही जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदन पाठवून नीट परीक्षा पेपरफुटीची न्यायालयीन चौकशी, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा, आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणे, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि परीक्षा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा करण्याची मागणी केली. पक्षाचे जिल्हा सचिव भैय्या देशकर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.

देवळीत इंदिरा गांधी पुतळ्यापासून तहसील कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. सभेत विविध वक्त्यांनी विद्यार्थ्यांवरील बलप्रयोगाचा तीव्र निषेध करत लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवर दडपशाही करणे अस्वीकार्य असल्याचे सांगितले. तहसीलदारांना निवेदन देत दोषींवर कारवाई व केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

समुद्रपूरमध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि युवा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांनी आक्रोश मोर्चा काढला. मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले. आंदोलनकर्त्यांनी राष्ट्रपतींच्या नावे निवेदन देऊन विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याची चौकशी, संबंधितांवर कारवाई आणि नीट पेपरफुटीची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली.

हिंगणघाटमध्येही वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली उपविभागीय महसूल कार्यालयावर मोर्चा धडकला. आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणाऱ्या पोलिसांवर कठोर कारवाई, नीट पेपरफुटीची निष्पक्ष चौकशी आणि केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे निवेदन उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे यांना सादर केले.

जिल्हाभर उसळलेल्या या आंदोलनांमुळे प्रशासन सतर्क झाले होते. सर्व ठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. आंदोलने शांततेत पार पडली असली तरी विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ला, नीट परीक्षा गैरप्रकार आणि लोकशाही अधिकारांच्या संरक्षणाचा मुद्दा आता अधिक तीव्रतेने पुढे आल्याचे या आंदोलनांतून स्पष्ट झाले. विविध संघटनांनीही 'विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील' असा इशारा देत पुढील आंदोलनाची भूमिकाही स्पष्ट केली.

## नागपूरची रेल्वेची प्रतीक्षा अखेर संपली

# खासदार अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश

**वर्धा जनमाध्यम :** अमरावती–नरखेड रेल्वेमार्गावरील प्रवाशांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली असून, अमरावती–नरखेड मेमू रेल्वेगाडी आता नागपूरपर्यंत धावणार आहे. रेल्वे मंत्रालयाने या प्रस्तावाला मंजुरी दिल्याने वरुड, मोर्शी, काटोलसह संपूर्ण संत्रा पट्ट्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयासाठी खासदार अमर काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे नागरिकांनी स्वागत करत त्यांचे आभार मानले आहेत.



या रेल्वेमार्गावर नागपूरसाठी थेट रेल्वे नसल्याने विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी आणि नोकरदारांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. बडनेरा–नरखेड मेमू नरखेडपर्यंतच मर्यादित असल्याने पुढील प्रवासासाठी पर्यायी वाहतुकीवर अवलंबून राहावे लागत होते. ही गैरसोय दूर करण्यासाठी खासदार अमर काळे यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मेमू रेल्वे नागपूरपर्यंत वाढविण्याची मागणी केली होती. या पाठपुराव्याला यश मिळत रेल्वे मंत्रालयाने मेमू सेवा नागपूरपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे बडनेरा, अमरावती, वलगाव, चांदूर बाजार, मोर्शी, वरुड, नरखेड, काटोल, कळमेश्वर आदी स्थानकांवरील हजारो प्रवाशांना थेट नागपूर रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे.

विद्यार्थी आणि उपचारासाठी नागपूरला जाणाऱ्या रुग्णांची मोठी सोय होणार आहे. निर्णयाची माहिती मिळताच वरुड व मोर्शी परिसरातील नागरिकांनी खासदार अमर काळे तसेच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानत, ही रेल्वे सेवा लवकरात लवकर प्रत्यक्ष सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## हिंदी विद्यापीठातील अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप; कर्मचाऱ्याची एफआयआरची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील तांत्रिक सहाय्यक (संगणक) हरीशचंद्र शाह यांनी विद्यापीठातील प्रभारी कुलसचिव, सहाय्यक कुलसचिव आणि एका हिंदी अधिकाऱ्याविरोधात गंभीर आरोप करत रामनगर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. व्हॉट्सॲप हॅकिंग, कथित बेकायदेशीर निलंबन, मानसिक व आर्थिक छळ या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांविरुद्ध एफआयआर नोंदविण्याची मागणी त्यांनी केली आहे.

शाह यांनी तक्रारीत नमूद केले की, याच प्रकरणासंदर्भात त्यांनी १६ मे २०२६ रोजीही पोलिसांकडे तक्रार केली होती. मात्र, अद्याप त्यावर एफआयआर दाखल करण्यात आलेला नाही. तसेच २५ जून २०२६ रोजी व्हॉट्सॲप हॅकिंग प्रकरणी सायबर सेलने गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या तपासाचा निष्कर्ष येण्यापूर्वी त्यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाचीही निष्पक्ष व कायदेशीर चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## पर्यावरण वारीत सहभागी होऊन वारकरी म्हणून पर्यावरणासाठी काम करावे - जिल्हाधिकारी

### पर्यावरणाची वारी व वृक्षदिंडी कार्यक्रम

**वर्धा जनमाध्यम :** पर्यावरण संवर्धन व वृक्ष लागवडीबाबत विद्यार्थ्यांच्या मनावर लहानपणापासूनच संस्कार केले तर भविष्यामध्ये नक्कीच आपण पुढच्या पिढीला योग्य प्रमाणात ऑक्सिजन, चांगले पर्यावरणीय वातावरण देवू शकू. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने दीर्घकाळ टिकणारे तसेच भरपूर ऑक्सिजन देणारे वृक्ष लावले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले.



निसर्ग सेवा समिती व भारत स्काऊट गाईडच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणाची वारी, वृक्षदिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्याच्या समारोपीय कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, बँक ऑफ इंडियाचे विभागीय अंचलीक प्रबंधक निर्मेश जी, जिल्हा शिक्षक व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे, पूर्व ग्रामीण बँकेचे अध्यक्ष विनायक बुचे, सप्त खंजिरी वादक भाऊसाहेब थुटे, अध्यक्ष प्रदीप दाते, माध्यमिक शिक्षणाधिकारी जयश्री घारपळकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती राऊत, उपशिक्षणाधिकारी रुपेश कांबळे, ज्ञानेश्वर पानसरे, नगरसेवक सतीश मिसाळ, नगरसेविका उज्वला पेठे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती

सुरुवातीस नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, विभागीय वन अधिकारी सुहास बढेकर, नगरसेवक सतीश मिसाळ, नगरसेविका उज्वला पेठे, जनहित मंचचे डॉ.राजेश आसमवार, तालुका कृषी अधिकारी संदीप ढोणे, अजय वानखेडे, स्काऊटचे जिल्हा संघटक नितेश झाडे, गाईडचे जिल्हा संघटक वैशाली घोम, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, सप्त खंजिरी वादक भाऊसाहेब धुटे यांच्या उपस्थितीत निसर्ग रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.

निसर्ग वारी शहरातील विविध भागातून फिरविण्यात आली. ऑक्सिजन पार्क येथे वारीचा समारोप झाला. यावेळी मान्यवरांच्याहस्ते ऑक्सिजन पार्क परिसरात विविध प्रजातीच्या १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. विविध शाळांमधून प्रामुख्याने ४०० पेक्षा जास्त स्काऊट गाईड कब बुलबुल मुलं-मुली शिक्षक, पालक पर्यावरण वारी. वृक्षदिंडी सोहळ्यामध्ये सहभागी झाले होते. समारोपीय कार्यक्रमात पर्यावरण संवर्धन व वृक्ष लागवड याविषयी संदेश देणारे पथनाट्य विद्यार्थ्यांनी सादर केले.

एक वृक्ष माऊलीच्या नावाने लावून त्यांचे संवर्धन करण्याची आज काळाची गरज आहे, असे पराग सोमण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आवाहन केले. पर्यावरणाचे संरक्षण करायचे असेल तर आपण सर्वांनी प्रथम वसुंधरेला समजून घेणे गरजेचे आहे, डॉ.मंगेश घोगरे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचलन दामोदर राऊत यांनी केले, असे वर्धा स्काऊट गाईडच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांनी आधुनिक शेती सोबतच सामुहिक शेती देखील करावी-पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

### बोरी कोकाटे येथे बळीराजा सन्मान सोहळा व कार्यशाळा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती सोबतच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत सामूहिक गट शेती तसेच कृषि प्रक्रिया उद्योग सुरु करावेत. यासाठी पोकरा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.



सेलू तालुक्यातील बोरी (कोकाटे) येथे नाविण्यपूर्ण प्रयोग करुन शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यासाठी बळीराजा सन्मान सोहळा व जिल्हास्तरीय कार्यशाळा तसेच पाटबंधारे विभागाच्यावतीने बोर व धाम प्रकल्पावरील कालव्याच्या वितरण प्रणालीच्या दुरुस्ती व नुतणीकरण कामाच्या भूमीपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी पालकमंत्री बोलत होते.

कार्यक्रमाला आमदार डॉ.मनिषा कायंदे, हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती ?ड सुधीर कोठारी, विभागीय कृषि सहसंचालक उमेश घाडगे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर, उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, वर्धा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता नितू चव्हाण, तहसिलदार शंकुतला पाराजे, राजेश सराफ, अशोक कलोडे, अशोक मुडे, सहाय्यक अभियंता सतीश मोवाडे, घोराडच्या माजी सरपंच ज्योती घंगारे आदी उपस्थित होते.

जोपर्यंत शेतकरी स्वत:च्या पायावर उभा राहत नाही, तोपर्यंत आधुनिक भारताचे स्वप्न साकार होऊ शकत नाही. शेतकरी आत्मनिभर व समृध्द व्हावा यासाठी शासनाच्यावतीने किसान सन्मान योजना, बळीराजा पांदन रस्ते योजना, बळीराजा मोफत वीज योजना आदी योजनांसोबतच विविध अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना समृध्द कसे करता येईल यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांनी नाविण्यपूर्ण शेती केल्यामुळे त्यांचा सन्मान राज्यस्तरावर झाला. त्यांचे अनुकरण इतर शेतकऱ्यांनी करुन फळ, भाजीपाला लागवड करावी, असे पालकमंत्री म्हणाले.

**राज्यात प्रथमच दुरुस्तीच्या कामासाठी २८४ कोटी मंजूर**

सेलू तालुक्यातील बोर व धाम प्रकल्पाचे कालवे वितरण प्रणाली ४० वर्ष जुनी असल्याने दोषपूर्ण झाली होती. त्यामुळे कालव्यातून बरेचशे पाणी पाझरामुळे वाया जात होते. यामुळे शेतकऱ्यांच्या बांधावर कमी पाणी पाहोचत असल्याने सिंचन क्षमता कमी झाली होती. बोर प्रकल्पातील कालवा प्रणाली दुरुस्तीसाठी १४८ कोटी व धाम प्रकल्पातील कालवा वितरण प्रणाली दुरुस्तीसाठी १३६ कोटी असे २८४ कोटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालवा दुरुस्तीच्या कामासाठी मंजूर केलेले आहे.

या कामामुळे बोर प्रकल्पातील ७७ गावे व धाम प्रकल्पामुळे ४८ गावांना लाभ मिळणार आहे. बोर प्रकल्पातील १२ हजार १९४ हेक्टर क्षेत्र व धाम प्रकल्पातील ६ हजार ९० हेक्टर क्षेत्र सिंचन पुन:स्थापित होणार असल्याने सेलू, हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना शेत सिंचनासाठी लाभ घेऊन त्यांना सुगीचे दिवस येईल, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

## जीवघेणा ठरत आहे विरूळ-हुसेनपूर पूल

### भगदाड, कठडे नाहीत; वारंवार निवेदनांनंतरही प्रशासनाचे दुर्लक्ष



**विरूळ आकाजी जनमाध्यम :** विरूळ–हुसेनपूर मार्गावरील पूल धोकादायक बनला असून नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विरूळ, हुसेनपूर आणि रसुलाबाद या गावांना जोडणाऱ्या या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची व नागरिकांची ये-जा असते. मात्र, मागील वर्षीच्या मुसळधार पावसात पुलाचा काही भाग वाहून गेल्याने मोठे भगदाड पडले आहे. शिवाय पुलाला संरक्षक कठडे नसल्यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेक वेळा निवेदने देऊन दुरुस्तीची मागणी केली. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्याचे काम यापूर्वी एका कंत्राटदारामार्फत करण्यात आले होते. मात्र, निकृष्ट दर्जाचे व अपूर्ण काम करून काम बंद करण्यात आल्याने पुलाच्या दुरुस्तीचे कामही रखडले आहे.



## ग्रामपंचायत इंझापुर (जा.) येथे मुरुम टाकणेबाबत जाहीरात

| अ. क्र. | ग्रा.पं.चे नांव | योजनेचे नांव व वर्ष | कामाचे नांव | प्राकलन किंमत व तांत्रिक मंजूरी क्र. | निविदा फी | अनामत रक्कम | निविदा स्विकारण्याची तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | इंझापूर(जा.) | सामान्य निधी सन | मुरुम टाकणे बाबत पावसाळी रस्ते दुरुस्ती | दि.२०२६-२७ प्रा.किं. | ५००/- | १०००/- | २३.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | येणाऱ्या मासिक सभेत |

**अटी व शती -**

१) निविदा सिलबंद लिफाफ्यात स्वतः किंवा पोष्टाने दोन लिफाफे पध्दतीने सादर करावी लागेल. प्रत्येक कामाची निविदा स्वतंत्र देण्यात यावी.
२) निविदा सादर करते वेळी २ टक्के सुरक्षा निधी चेक/डी.डी/रोख रकमेत ग्रा.पं.ला जमा करावी लागेल.
३) निविदा शक्यतो त्याच दिवशी उघडण्यात येईल.
४) कोणतेही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार ग्रा.पं.इंझापूर (जा.) यांचेकडे सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.
५) मुदतीनंतर आलेल्या ानिविदा स्विकारण्यात येणार नाही.
६) देयकाची रक्कम धनादेशाद्वारे (चेकद्वारे) देण्यात येईल.
७) वरील सर्व तारखात बदल करण्याचा अधिकार ग्राम पंचायतीला राहील.
८) नियमानुसार मुल्यांकन झाल्यावर नियमानुसार सर्व कपाती ग्राह्य राहील. मटेरियल टेस्ट रिपोर्ट सादर केल्याशिवाय अंतिम देयक देण्यात येणार नाही.
९) ग्रा.पं.वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करावे लागेल.

**स्वा/-**
**सरपंच (प्रशासक)**
**ग्रामपंचायत इंझापुर (जा.)**

**स्वा/-**
**सचिव**
**ग्रामपंचायत इंझापुर (जा.)**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ५० ग्रॅम पावडर खिशात टाकून आयुष्य तुरुंगात घालवेन!



## दडपशाही नव्हे, संवाद हवा; विद्यार्थ्यांसाठी अण्णा मैदानात

**अहिल्यानगर /प्रतिनिधी-** नीट पेपरफुटीवरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी विद्यार्थी आणि विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनावर २० जुलै रोजी पोलिसांनी लाठीचार्ज केला. एकीकडे दिल्लीत सोनम वांगचुक उपोषणाला बसले आहेत. तर दुसरीकडे आता महाराष्ट्रातही अण्णा हजारेंनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. अण्णा हजारे यांनी अहिल्यानगरमध्ये मौन आंदोलनाला सुरुवात केली आहे. दडपशाही नव्हे, तर संवाद हवा, असा संदेश अण्णा हजारे यांनी सरकारला दिला आहे.

नवी दिल्लीच्या जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समाजसेवक अण्णा हजारे यांनी मौन आंदोलनाला सुरुवात केली आहे. त्यांनी सकाळी अहिल्यानगरमधील वाडिया पार्क येथील गांधी स्मारकात आंदोलनाला सुरुवात केली. आंदोलनाआधी त्यांनी सरकारकडून दडपशाही नव्हे, तर संवाद हवा, अशी भूमिका बॅनरच्या मार्फत स्पष्ट केली. सरकारने संवाद साधून प्रश्न सोडवायला हवेत, अशी मागणी देखील त्यांनी केली. लोकशाहीत दडपशाहीऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असे आवाहन देखील केले. यावेळी आंदोलनस्थळाला प्रतीकात्मक स्वरूपात नगरचे जंतर-मंतर नाव दिल्याचे जाहीर केले. अण्णा हजारे यांचे मौन आंदोलन चर्चेत आले आहे. या आंदोलनादरम्यान अण्णा हजारे यांच्या डोळ्यांत अश्रू देखील आले. अण्णा हजारे यांनी आंदोलनाआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक पत्र लिहिले. अण्णा हजारे यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून सरकारच्या दडपशाहीविषयी चिंता व्यक्त केली. अण्णा हजारे यांनी म्हटले की, नीट पेपरफुटी, बेरोजगारी, भरती प्रक्रियांवरून चिंता व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे आंदोलन हे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नव्हे. तर लोकभावनेचा विषय म्हणून पाहिले पाहिजे. सरकारने विद्यार्थी आणि आंदोलकांशी संवाद करावा, असे म्हणत त्यांनी लोकशाही मूल्याची आठवण करून दिली. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाकडे विरोधकांसहित विरोधकांचेही लक्ष असणार आहे.

## खोट्या ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याची मुंबई पोलिसांकडून धमकी; व्हीडीओ सोशल मीडियावर



**मुंबई / प्रतिनिधी-** नीट पेपरफुटीप्रकरणी दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाची धग देशभर पसरत आहे. मुंबईतही विद्यार्थ्यांकडून आंदोलन सुरू आहे. दरम्यान, आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांना ताब्यात घेत पुन्हा आंदोलनासाठी आल्यास खोट्या ड्रग्ज प्रकरणात अडकवून आयुष्यभर तुरुंगात टाकण्याची धमकी मुंबई पोलिसांकडून दिली जात आहे. या घटनेचा कथित व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.


मुंबई काँग्रेसने एक्सवर यासंदर्भात पोस्ट करत या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी केली आहे. काँग्रेसने म्हटले आहे की, जर व्हायरल व्हीडीओतील दावा खरा असेल, तर ही केवळ विद्यार्थ्यांना घाबरवण्याची बाब नसून लोकशाहीतील नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर थेट हल्ला आहे. स्वतःचा आवाज उठवणे हा गुन्हा नाही. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे धमक्यांमधून नव्हे, तर जबाबदारीने आणि उत्तरदायित्वाने दिली पाहिजेत, असे काँग्रेसने म्हटले आहे.

व्हायरल व्हीडीओमध्ये, पोलिसांनी काही विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या गाडीमध्ये एक पोलिस हवालदार विद्यार्थ्यांना पुन्हा आंदोलनात दिसलास तर ५० ग्रॅम पावडर खिशात टाकेल, मग संपूर्ण आयुष्य वाया जाईल, जामीनही मिळणार नाही, अशी धमकी देत आहे. दरम्यान, या व्हायरल व्हीडीओतील दाव्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. तसेच या आरोपांवर मुंबई पोलिसांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

**मुलांची डोकी फुटताना बघून आनंद होत असेल -समीर चौघुले**

दिल्लीत आंदोलनादरम्यान पोलिसांकडून सुरू असलेल्या अमानुष वर्तणुकीचे व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यावर अभिनेते समीर चौघुले यांनी फेसबुकवर एक पोस्ट लिहिली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, आत्ताच एकाची पोस्ट वाचली परीक्षेचा पेपर लीक झाला म्हणून आत्महत्या केलेल्या मुलांना असंच पाहिजे. जे स्वतःचा जीव वाचवू शकत नाहीत, ते डाक्टर होउन उद्या लोकांचे जीव काय वाचवणार? सुन्न झालो! आपण माणसे उरलो नाही, झोम्बी झालो आहोत. हा कोणता उन्माद आपल्या सर्वांच्या डोक्यात भरला आहे? त्या तरुण, कोवळ्या मुलामुलींची डोकी फुटताना बघून जर कोणाला आनंदाच्या उकळ्या फुटत असतील किंवा कोणी त्या क्लिप्स एन्जाय करत असेल, किंवा असंच पाहिजे या मुलांना असा आनंद त्यांना होत असेल, तर हा समाज खूप दुर्धर आजारी पडला आहे. प्रत्येक गोष्ट संवादाने १०० टक्के सोडवता येते. चर्चा व्हायला हवी होती. तरुण, कोवळ्या मुलांवर अत्यंत क्रूरतेने बरसलेल्या लाठ्या खूप व्यथित करतात. कोणत्याही परिस्थितीत आणि कोणत्याही बाजूने हिंसा होता कामा नये. मुलांचे म्हणणे आणि त्यांच्या समस्या यांना अग्रक्रम दिलाच पाहिजे, असे चौघुले यांनी म्हटले आहे.

## खोट्या ड्रग्स केसमध्ये आंदोलकांना अडकवण्याची धमकी देणा-या पोलिसावर कारवाई!



**मुंबई / प्रतिनिधी-**देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणावरून विद्यार्थ्यांचा आणि विरोधकांचा संताप दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या आंदोलनाची झळ महाराष्ट्रातही पोहोचली असून, मुंबईत पार पडलेल्या एका आंदोलनादरम्यान मुंबई पोलिसांनी विद्यार्थ्यांना थेट ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याची धमकी दिल्याचा व्हिडीओ काँग्रेसकडून ट्विट करण्यात आला. या संपूर्ण प्रकाराचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई पोलीस दलात आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत त्या पोलीस कर्मचा-यावर कारवाई करण्यात आली. तसेच, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे.

विद्यार्थी आंदोलकांना खोट्या ड्रग्ज प्रकरणात गोवण्याची धमकी देणा-या एका पोलिसाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई पोलिसांनी कारवाई केली. या पोलिसाबद्दल अधिकची माहिती समोर आली आहे. त्या पोलीस कर्मचा-याचे नाव हवलदार पवन सांगळे (Constable Pawan Sangle) असे आहे. तो कर्मचारी शीव पोलीस ठाण्यात चालक म्हणून कार्यरत आहे. हे प्रकरण गांभीर्याने घेत पोलिसांनी व्हिडिओच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशी पूर्ण होईपर्यंत व्हिडिओमध्ये दिसत असलेल्या पोलीस चालकाला त्याच्या सध्याच्या पदावरून हटवण्यात आले आहे. चौकशी अहवाल मिळाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी म्हटले आहे. मुंबई काँग्रेसच्या अधिकृत 'एक्स' हँडलवरून हा व्हिडिओ शेअर करण्यात आला होता, ज्यामुळे सर्वत्र चर्चा सुरू झाली. गेल्या काही दिवसांपासून, कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि नागरिक शिवाजी पार्क, चेंबूर आणि आझाद मैदान यासह मुंबईच्या अनेक भागांमध्ये आंदोलन करत आहेत. त्यापैकी हा व्हिडीओ आहे. त्यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, मुख्यमंत्री फडणवीसांनी महत्त्वाची माहिती दिली. 'एक व्हिडीओ समोर आला आहे. त्याची चौकशी सुरु आहे. त्याची चौकशी सुरु असताना त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे आणि त्याला त्या पोलिस स्टेशनमधून काढण्यात आले आहे. याबाबतची चौकशी चाललेली आहे,' असे ते म्हणाले.

## 'राज्य सरकारला ही गुंडगिरी मान्य आहे का?-सुप्रिया सुळे

**मुंबई/प्रतिनिधी :**'तुमच्या खिशात ड्रग्जच्या पुड्या टाकेन आणि तुरुंगात पाठवेन', अशी धमकी देणा-या पोलिसाच्या व्हिडीओवरून खासदार सुप्रिया सुळे राज्य सरकारवर संतापल्या. हे कृत्य अतिशय विकृत आणि अत्यंत गंभीर असल्याचे म्हणत सुप्रिया सुळेंनी राज्य सरकारला चार प्रश्न विचारले आहेत.

सुप्रिया सुळे यांनी पोलीस कर्मचा-याचा व्हिडीओ शेअर करत म्हटले आहे की, 'मुंबईत आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आणि हक्कांसाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणा-या तरुण विद्यार्थ्यांवर पोलीस बळाचा वापर केला जात आहे. लाठीहल्ल्यानंतर आता या विद्यार्थ्यांना थेट खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत.''सोशल मीडियावर समोर आलेल्या एका अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक व्हिडिओमध्ये, 'तुमच्या खिशात ड्रग्जच्या पुड्या ठेवून तुरुंगात टाकेन', अशी उघड धमकी मुंबई पोलीस दलातील एक कर्मचारी आंदोलक तरुणांना देताना दिसत आहे', असा संताप सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला.

**पोलीस ड्रग्जची भाषा करताहेत**'हे कृत्य अतिशय विकृत, तितकेच निषेधार्ह आणि खाकी वर्दीला काळीमा फासणारे आहे. ज्या मुंबई पोलिसांवर अंमली पदार्थांचा व्यापार मुळापासून उखडण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे,



तेच पोलीस विद्यार्थ्यांना धमकावण्यासाठी ड्रग्जचा वापर करण्याची भाषा करत असतील, तर हे अत्यंत गंभीर आहे', असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. खासदार सुळे पुढे म्हणाल्या की, 'या घटनेमुळे काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलीस कर्मचा-यांकडे ड्रग्ज येतात कुठून? जर पोलीस खुलेआम विद्यार्थ्यांच्या खिशात ड्रग्ज ठेवण्याची धमकी देत असतील, तर त्यांना ड्रग्जचा स्त्रोत ठाउक आहे. जर हा स्त्रोत माहिती आहे, तर मुंबईतील ड्रग्ज माफियांवर कारवाई का केली जात नाही?''राज्य सरकारला ही गुंडगिरी मान्य आहे का? मुंबई पोलीस दल हे थेट राज्याच्या गृह मंत्रालयाखाली येते. राज्याच्या राजधानीत आणि सरकारच्या नाकाखाली सुरू असलेला हा प्रकार गृह खात्याला मान्य आहे का?', असे प्रश्न सुप्रिया सुळेंनी विचारले आहेत. 'आंदोलक मुलांना अशा प्रकारे बनावट पुराव्यांची आणि ड्रग्जची धमकी देणे हा भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पोलीस कायदा आणि मानवाधिकार कायद्यांनुसार अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. खोटे पुरावे तयार करणे किंवा कोणालातरी खोट्या व गंभीर गुन्ह्यात अडकवण्यासाठी पुरावे रचणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. अंमली पदार्थ बाळगणे, त्याचा व्यापार करणे किंवा कोणाला तरी अडकविण्यासाठी त्याचा गैरवापर करणे हा देखील गुन्हा आहे', असे सुप्रिया सुळेंनी म्हटले आहे.

'हा प्रकार मानवाधिकाराचेही उल्लंघन आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ अंतर्गत नागरिकांना भयमुक्त वातावरणात जगण्याचा आणि आपली मते मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. पोलिसांचे हे कृत्य राष्ट्रीय व राज्य मानवाधिकार आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उघड उल्लंघन आहे', असे सांगत सुळे यांनी पोलिसांबद्दल चिंता व्यक्त केली.

**राज्याच्या गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे** - 'आपल्या हक्कासाठी लढणा-या या देशाच्या तरुण पिढीला गुन्हेगार ठरवण्याचा आणि त्यांच्या खिशात ड्रग्ज टाकून त्यांचे आयुष्य व करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी देण्याचा हा प्रकार अत्यंत भयावह आहे', अशी टीका त्यांनी केली.

## 'नीट' पेपरफुटीविरोधात ठाकरे बंधूंचा एल्गार! २६ जुलैला मुंबईतून आंदोलनाची हाक

**मुंबई/प्रतिनिधी :** कॉक्रोच जनता पार्टीच्या जंतरमंतरवरील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी ठाकरे बंधू मैदानात उतरले आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी २६ जुलै रोजी रविवारी आंदोलनाची हाक दिली आहे. मुंबईत हे आंदोलन होईल. या आंदोलनात महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षही सहभागी होण्याची शक्यता आहे. नीट पेपरफुटी, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याविरोधात या मोर्चात आवाज उठवण्यात येणार आहे. ठाकरे बंधूंनी नुकतीच पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी ही घोषणा केली.



आम्ही २६ तारखेला शक्तिप्रदर्शन मोर्चा या मुलांना घेउन करायचे ठरवले आहे. मुंबईतही ही सर्व मुले एकत्र येत आहेत. आपला राग, रोष व्यक्त करत आहेत. हे केंद्रालाही कळणे गरजेचे आहे. रविवार, २६ जुलै रोजी सकाळी आम्ही मोर्चा काढत आहोत. शिवाजी पार्क ते सिद्धीविनायक मंदिरापर्यंत मोर्चा जाईल, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. तर देवाला साकडे घालणार आहोत. सरकारला सुबुद्धी मिळो असे साकडे घालू. तिथे मोर्चाची सांगता होईल, असे उद्धव ठाकरे म्हणाले.शेतकरी आंदोलनावेळीही ते भेटायला तयार नव्हते. मणिपूरच्यावेळीही तेच झाले. आताही तेच होत आहे. ही कोणती सत्ता? कोणत्या सत्तेचा माज? ही मुले काय मागत होती.. नीटसाठी किती त्रास होतो हे त्या मुलांना विचारा. मी पूर्वीच मोदींना बोललो होतो नीटबाबत. आज शेतकरी आत्महत्या करत आहेत. उद्या मुले आत्महत्या करतील हे सांगितले होते. माझा जुना व्हीडीओ आहे. आज तेच झाले. आज सिस्टिमच्या विरोधातील राग आहे. देशात जे काही सुरू आहे त्याविरोधातील राग आहे. आज प्रत्येक घरातील ज्यांची मुले परीक्षेला बसलेली नाहीत त्या आया आणि वडिलांनाही त्रास होतो, असे राज ठाकरे म्हणाले.

**हा उद्दामपणा कशासाठी? राज ठाकरेंचा सवाल-**मुंबईवरील हल्ल्यानंतर बडे बडे शहरो में ऐसी घटना होती है असे आर. आर. पाटील म्हणाले होते तेव्हा त्यांचा राजीनामा घेतला गेला, याची आठवण मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी करून दिली. त्यामुळे या प्रकरणात तुम्हीच जबाबदारी घेतली पाहिजे. हीच मागणी मुलांची आहे. तिस-यांदा पेपर फुटले होते. आम्ही केंद्रीय पद्धतीने परीक्षा घेउ नका म्हटले होते. पण त्यावेळी सत्तेमुळे त्यांची ऐकण्याची तयारी नव्हती. आजही नाही. प्रधानांच्या राजीनाम्यापुरती गोष्ट मर्यादित राहिली नाही. ती पंतप्रधान आणि गृहखात्यांपर्यंत गेली. मोदींनी आज ट्विट केले. त्याला काही अर्थ नाही. या मुलांना बोलवून चर्चा केली असती. प्रकरण समजून घेतले असते तर एवढे वाढले नसते. सत्तेचा उद्दामपणा कशासाठी आहे, असा सवालही राज ठाकरे यांनी केला.

## उर्जा क्षेत्रातील योगदानाबद्दल महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचा राष्ट्रीय परिषदेत विशेष गौरव



**नागपूर/प्रतिनिधी :** नवीकरणीय उर्जेचा स्वीकार, उर्जा कार्यक्षमता आणि दीर्घकालीन उर्जा सुरक्षेसाठी वीज वितरण क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांचा बुधवारी (दि. २२) विशेष गौरव करण्यात आला. नवी दिल्ली येथे आयोजित टाइम्स नेटवर्क सस्टेनेबिलिटी कान्क्लेव्ह (Times Network Sustainability Conclave) भारत २०३५: एक आत्मनिर्भर राष्ट्र या संकल्पनेवर आधारित या कान्क्लेव्हमध्ये २०३५ पर्यंत भारत हरित बांधिलकी आणि शाश्वत उर्जेच्या बळावर आत्मनिर्भर कसा बनू शकतो यावर विचारमंथन करण्यात आले. या परिषेदत उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांची विशेष मुलाखत घेण्यात आली.

महाराष्ट्राला स्वच्छ आणि हरित उर्जेकडे नेण्यासाठी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना व प्रकल्प राबवले जात आहेत. हरित उर्जा परिवर्तनातून सर्वांना स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासह वीज क्षेत्रातील आमुलाग्र सुधारणांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वेग दिला आहे. उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी उर्जा परिवर्तनासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. तर या आराखड्याच्या अंमलबजावणीला मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सक्रीय वेग दिला आहे.महाराष्ट्राच्या वीज नियोजनात २०३० पर्यंत आणखी ४५ हजार मेगावॉट विजेची क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ३८ हजार मेगावाट वीज ही हरित स्त्रोतांकडून मिळवून एकूण उर्जेतील नवीकरणीय उर्जेचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे ध्येय आहे. त्यास अनुसरून महावितरणने स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी अपारंपरिक उर्जेला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के हरित उर्जेचा समावेश केला आहे. यासोबतच सर्व शेतक-यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर उर्जा निर्मिती प्रकल्पांतून १६ हजार मेगावॅट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या ५ हजार ५०० मेगावाटपेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील १५ लाखांहून अधिक शेतक-यांना सध्या दिवसा वीज पुरवठा मिळत आहे. तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप योजने तून १० लाखांपेक्षा अधिक 'ऑफ-ग्रिड' सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले आहे. तर छतावरील सौर उर्जा प्रकल्पांद्वारे राज्यातील

## दिल्लीत राष्ट्रीय सुरक्षा कायदा लागू

### पोलिसांना दिले गेले थेट ताब्यात घेण्याचे अधिकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राजधानी दिल्लीत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृह मंत्रालय आणि दिल्लीच्या उपराज्यपालांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार दिल्लीचे नवनियुक्त पोलीस आयुक्त अनुराग कुमार यांना कोणत्याही व्यक्तीला थेट ताब्यात घेण्याचे विशेष अधिकार दिले आहेत.बुधवारी दिल्लीच्या अधिकृत राजपत्रात यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. या अधिसूचनेवर १५ जुलैची तारीख देण्यात आली असून, हे विशेष अधिकार १९ जुलै २०२६ ते १८ ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहतील.सार्वजनिक शांतता आणि शहराच्या सुरक्षेसाठी हे पाउल उचलणे गरजेचे असल्याचे मत दिल्लीच्या उपराज्यपालांनी व्यक्त केले आहे. 'राष्ट्रीय सुरक्षा कायद्याच्या कलम ३(३) आणि कलम २(ई) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, उपराज्यपालांनी हे स्पष्ट केले की, दिलेल्या कालावधीत दिल्ली पोलीस आयुक्त कलम ३(२) अंतर्गत स्थानबद्धतेचे आदेश देण्याचे अधिकार वापरू शकतील.'सार्वजनिक शांतता, राष्ट्रीय सुरक्षा किंवा अत्यावश्यक वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात अडथळा आणणा-या संशयित व्यक्तींवर पोलीस आयुक्त या कायद्यान्वये थेट कारवाई करू शकतात. या कायद्यानुसार कोणत्याही व्यक्तीवर आरोप सिद्ध न करता किंवा खटला न चालवता १२ दिवसांपासून ते १२ महिन्यांपर्यंत पोलीस कोठडीत ठेवता येते. सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी किंवा पोलीस प्रमुखांना हे स्थानबद्धतेचे अधिकार दिले जातात.गेल्या वर्षी २६ सप्टेंबर रोजी लेहच्या जिल्हा दंडाधिका-यांच्या आदेशानंतर आंदोलक सोनम वांगचुक यांना एनएसए कायद्यानुसार ताब्यात घेण्यात आले होते. त्यांना तब्बल १७० दिवस स्थानबद्धतेमध्ये ठेवण्यात आले होते. संसदेच्या



पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी काकरोच जनता पार्टीच्या सदस्यांनी संसदेकडे जाण्यासाठी बॅरिकेड्स तोडण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे पोलिसांसोबत तीव्र चकमक उडाली. आंदोलनादरम्यान आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक, काचेच्या बाटल्या फेकून मारणे आणि मारहाण केल्याच्या घटना घडल्या आहेत. दिल्लीतील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि हिंसाचार पसरवणा-यांवर वचक बसवण्यासाठी प्रशासनाने हे कठोर पाउल उचलले आहे.



## बंदला प्रतिसाद; विद्यार्थी उतरले रस्त्यावर

**नांदेड / प्रतिनिधी-**दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ गुरूवारी वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या नांदेड बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बंद दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाही काढण्यात आला. मोर्चात हजारो सामान्य नागरिकांसह विद्यार्थ्याची संख्या लक्षणीय होती

या बंदला काँगेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, उबाठा, मनसे यासह समविचारी पक्षांनी पाठिंबा दिला. दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या उद्देशाने नांदेड आगाराने सायंकाळपर्यंत एसटी बस सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता.नांदेड बंदच्या पार्श्वभूमीवर सकाळी आयटीआय चौक येथे वंचित बहुजन आघाडी, समविचारी पक्ष आणि विविध संघटनांच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. त्यानंतर आयटीआय चौकातून शिवाजीनगर, कला मंदिर मार्गे भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो विद्यार्थी, युवक, सामान्य नागरिक आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान केंद्र सरकार आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्षाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही आंदोलकांनी केली. आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध शैक्षणिक मागण्यांसाठी विद्यार्थी शांततापूर्ण आंदोलन करीत असताना त्यांच्यावर पोलिसांनी लाठीमार केला. या कारवाईत अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेचा निषेध म्हणून महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. या अंतर्गत नांदेडमध्येही बंद पाळण्यात आला. विद्यार्थ्यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर झालेल्या कारवाईचा निषेध नोंदवित दोषींवर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली.दरम्यान पोलिसांच्या सूचनेनुसार नांदेड सर्व एसटी सेवा सायंकाळपर्यंत बंद ठेवण्यात आली. यात नांदेड आगारातून सर्व बस स्थगित करण्यात आल्या.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'कॅग'चा आक्षेप

सरकारची सर्वाधिक चर्चेत राहिलेली आणि 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना ही महायुती राजकीयदृष्टया प्रभावी ठरलेली योजना. विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या या योजनेमुळे लाखो महिलांना थेट आर्थिक मदत मिळाली आणि त्याचा राजकीय फायदा सत्ताधा-यांना झाला; मात्र निवडणुकीनंतर या योजनेची दुसरी बाजू समोर येऊ लागली आहे. नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी (कॅग) या योजनेच्या अंमलबजावणीवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च, लाभार्थीच्या पडताळणीतील त्रुटी आणि राज्याच्या तिजोरीवर पडणारा वाढता भार यामुळे ही योजना आता आर्थिक शाश्वततेच्या कसोटीवर उभी आहे. हे चित्र केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची गरज कोणीही नाकारू शकत नाही. ग्रामीण भागातील अनेक महिलांना स्वतःच्या नावाने उत्पन्न नसते. अशा परिस्थितीत दरमहा मिळणारी आर्थिक मदत त्यांच्यासाठी आधार ठरते. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य, बचत यासाठी या पैशांचा उपयोग होत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र प्रश्न असा आहे, की या योजनांचा उद्देश खरोखर आर्थिक सक्षमीकरण आहे, की निवडणुकीपूर्वी मतदारांवर प्रभाव टाकण्याचे राजकीय साधन? या अनुषंगाने 'कॅग' ने योजनेबाबत केलेली निरीक्षणे धक्कादायक मानली जात आहेत. लाभार्थीची योग्य पडताळणी न करता मोठ्या प्रमाणात नोंदणी करण्यात आल्याने पात्रतेच्या निकषांवर प्रश्न उपस्थित झाले. अनेक लाभार्थींच्या उत्पन्नाची, कर भरण्याची, सरकारी नोकरीची किंवा इतर योजनांमधील लाभांची पुरेशी तपासणी झालेली नव्हती. 'कॅग'च्या निरीक्षणानुसार यामुळे सुमारे ९२ लाख लाभार्थींचा साडेतीन हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार राज्यावर पडल्याचे नमूद करण्यात आले आहे. इतक्या मोठ्या खर्चासाठी आवश्यक आर्थिक नियोजन आणि निधीचे स्रोत याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकारने योजना सुरू करताना जलद अंमलबजावणीवर भर दिला. मात्र त्यासाठी आवश्यक डेटा पडताळणी, तांत्रिक प्रणाली आणि विविध विभागातील माहितीची सांगड घालण्यात अनेक त्रुटी राहिल्या. परिणामी अपात्र लाभार्थीही योजनेत शिरल्या. योजनेच्या सुरुवातीपासूनच अनेक प्रकारच्या तक्रारी समोर आल्या. काही ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे अर्ज भरले गेले. काही प्रकरणांमध्ये उत्पन्नाची चुकीची माहिती देण्यात आली. काही लाभार्थींची नावे एकापेक्षा अधिक ठिकाणी असल्याचे निदर्शनास आले. मृत व्यक्तींच्या नावावर लाभमिळाल्याच्या तक्रारीही काही जिल्ह्यांमध्ये समोर आल्या. सरकारने काही अपात्र लाभार्थींची नावे वगळण्याची प्रक्रिया सुरू केली असली, तरी प्रारंभीच्या त्रुटींमुळे सार्वजनिक निधीचा मोठा गैरवापर झाल्याची टीका कायम आहे. आज देशातील बहुतेक राज्यांच्या डोक्यावर मोठ्या प्रमाणात कर्ज आहे. पायाभूत सुविधा, सिंचन, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, शहरी विकास यासाठी प्रचंड गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत दरमहा हजारो कोटी रुपये थेट रोख मदतीवर खर्च करणे म्हणजे महसुली खर्चात सातत्याने वाढ होणे. महसुली खर्च वाढल्यास भांडवली खर्चासाठी उपलब्ध निधी कमी होतो. म्हणजेच नवीन रस्ते, पूल, मेट्रो, रुग्णालये, शाळा,जलसंधारण प्रकल्प अशा विकासकामांवर परिणाम होऊ शकतो. अर्थतज्ज्ञांच्या मते, सामाजिक योजनांची गरज असली, तरी त्या राज्याच्या उत्पन्नाशी त्या सुसंगत असणे आवश्यक आहे अन्यथा भविष्यात अधिक कर्ज घेण्याची वेळ येते आणि त्यावरील व्याजाचा भारही वाढत जातो. मध्य प्रदेशमधील 'लाडली बहना', कर्नाटकमधील 'गृहलक्ष्मी', तेलंगणामधील 'महिला सहाय्य योजना', पश्चिम बंगालची 'लक्ष्मीर भांडार' अशा अनेक योजनांवर दरवर्षी हजारो कोटी रुपये खर्च होत आहेत. काही राज्यांमध्ये या योजनांमुळे महसुली तूट वाढल्याची नोंद विविध आर्थिक अहवालांमधून करण्यात आली आहे. 'कॅग' ने अशा योजनांचा आढावा घेताना अनेक राज्यांना आर्थिक शिस्त राखण्याचा सल्ला दिला आहे. महसुली उत्पन्नात पुरेशी वाढ न करता कायमस्वरूपी रोख मदतीच्या योजना सुरू ठेवल्यास भविष्यात वित्तीय स्थैर्यावर परिणाम होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. दीर्घकालीन दृष्टीने विचार केला तर केवळ रोख रक्कम देण्यापेक्षा महिलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवणाऱ्या योजनांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, स्वयंरोजगार, सूक्ष्म उद्योग, बचत गट, डिजिटल उद्योजकता, कृषी प्रक्रिया उद्योग, व्याजमुक्त कर्ज, विपणन सुविधा, रोजगार निर्मिती यासारख्या उपक्रमांमध्ये गुंतवणूक केल्यास महिलांचे उत्पन्न कायमस्वरूपी वाढू शकते. त्यामुळे सरकारी मदतीवरील अवलंबित्व कमी होईल. आज जवळपास प्रत्येक निवडणुकीपूर्वी एखादी नवीन रोख मदत योजना जाहीर केली जाते. एक राज्य योजना आणते आणि दुसरे राज्य त्यापेक्षा अधिक रक्कम जाहीर करते. त्या-त्या राज्यातले विरोधी पक्ष तर सत्तेत आल्यास सत्ताधाऱ्यांपेक्षा अधिक रक्कम या योजनेद्वारे देण्याचे आश्वासन देतात. परिणामी, सामाजिक कल्याणापेक्षा राजकीय स्पर्धा अधिक तीव्र होत असल्याचे दिसते. याचा परिणाम असा होतो, की राज्यांच्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा नियमित रोख हस्तांतरणावर खर्च होऊ लागतो. भविष्यात ही स्पर्धा आणखी वाढल्यास वित्तीय शिस्त राखणे। अधिक कठीण होईल. या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम लाभार्थींची डिजिटल आणि बहुपातळी पडताळणी अनिवार्य केली पाहिजे. प्राप्तिकर, मालमत्ता, सरकारी नोकरी, इतर योजनांमधील लाभयांचा डेटा एकत्रित करून पात्रता निश्चित करणे आवश्यक आहे. अपात्र लाभार्थींना त्वरित वगळण्याची पारदर्शक यंत्रणा असावी. दुसरे म्हणजे अशा योजनांचे दरवर्षी स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक लेखापरीक्षण झाले पाहिजे. लाभार्थींच्या जीवनमानात! प्रत्यक्ष सुधारणा झाली का, याचे मोजमाप झाले पाहिजे. तिसरे म्हणजे या योजनांना कौशल्य प्रशिक्षण,स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाशी जोडले पाहिजे. महिलांना। कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे हेच खरे सक्षमीकरण ठरेल. 'कॅग'ने उपस्थित केलेले प्रश्न केवळ लेखापरीक्षणापुरते मर्यादित नाहीत, तर राज्याच्या वित्तीय आरोग्याशी, सार्वजनिक पैशाच्या जबाबदार वापराशी आणि भविष्यातील विकासाशी संबंधित आहेत. लोककल्याणकारी योजना आणि आर्थिक शिस्त यांचा समतोल राखणे ही कोणत्याही सरकारपुढील सर्वात मोठी परीक्षा असते.

# सरकारची वागणूक-तेव्हाची आणि आताची

**२० जुलै चा हा ताजा घटनाक्रम पाहिल्यावर या सरकारच्या आणि त्याच्या समर्थकांच्या कोडगेपणाची, निर्लज्जतेची, हिंसकतेची, बेपर्वाईची, खोटारडेपणाची, मग्रुरीची किती आणि कशी निंदा करावी हेच कळत नाही.**



२० जुलैला विद्यार्थ्यांनी संसदेवर काढलेल्या मोर्चाला भारत सरकार आणि दिल्ली पोलीस ज्या पद्धतीने सामोरे गेले, त्या घडामोडी युट्यूब वर पाहत असताना सहजच मला १९७४-७५ चा कालखंड आठवला. १९७४ साली मी बिहारमध्ये सुरु असलेल्या विद्यार्थी आंदोलनात भाग घेण्यासाठी तीन-चार महिने राहिलो होतो. बिहारच्या बहुतेक सर्व जिल्ह्यांमध्ये त्याकाळात मी फिरून आलो. आताचा झारखंड देखील त्यावेळी बिहारचा हिस्सा होता. जयप्रकाश नारायण (जे.पी.) यांच्या सभा जिल्ह्याच्या ठिकाणी होत असत. त्या सभांना लाखांच्या संख्येत गर्दी जमत असे. मुख्यमंत्र्याने राजीनामा द्यावा इथून झालेली सुरुवात विधानसभा भंग करा या मागणी पर्यंत पोहोचली होती. त्या आंदोलनात देखील विद्यार्थी व युवकांचाच पुढाकार होता. आंदोलनाचे नेतृत्व करण्याची गळ त्यांनी जे. पींना घातली होती. पाटण्याच्या मुख्यालयातून माझे मित्र कुमार प्रशांत एक साप्ताहिक बुलेटीन वृत्तपत्राच्या स्वरुपात प्रसिद्ध करायचे. त्या बुलेटीनचे गठे जे. पींच्या सभेपूर्वी त्या त्या जिल्ह्यात पोहोचविण्याचे काम त्यांनी मला दिले होते. म्हणून मला इतके फिरता आले. राज्यात काँग्रेसचे सरकार होते. मला एकदाही एकाही पोलिसाने हटकल्याचे आठवत नाही. किंबहुना त्या पूर्ण प्रवासात मला फारसा पोलीस बंदोबस्त देखील सभांच्या ठिकाणी आढळला नाही. जे. पींच्या भाषणापूर्वी स्टेजवर नागार्जुन हे प्रसिद्ध हिंदी कवी त्यांची एक कविता म्हणून दाखवायचे. त्या कवितेची पहिलीच ओळ होती :-

इंदुजी, इंदुजी, तुम्हाला काय झाले, तुम्ही तुमच्या वडिलांना विसरलात का?

इंदिरा गांधी, अब्दुल गफूर (तेव्हाचे मुख्यमंत्री), केंद्र सरकार यांच्या विरुद्ध जोरदार नारेबाजी होत असे. परंतु सभा मोडण्याचा किंवा जमलेल्या लोकांना पांगविण्याचा, येण्यापासून अडविण्याचा प्रयत्न पोलिसांतर्फे झाल्याचे दिसले नाही. बिहार आंदोलनाच्या अगदी सुरुवातीला विद्यार्थी जेव्हा विधानसभेवर मोर्चा घेऊन गेले, तेव्हा मात्र लाठीचार्ज झाल्याचे वाचले होते.

२५ जुन १९७५ पासून आणीबाणी जाहीर झाली. एक सायक्लोस्टाईल मशीन घरी आणून मी अमरावतीला माझ्या पर्यंत गुप्तपणे पोहोचणाऱ्या पत्रकांच्या शंभर-एक प्रती त्यावर छापून परिचितांमध्ये वितरीत करण्याचे काम करत होतो. पोलिसांची माझ्यावर नजर असेल असे देखील वाटत नव्हते. परंतु १ सप्टेंबर ला आमच्या शेजारी असलेले जनसंघाचे नेते साताप्पा कोल्हे यांच्या ओट्यावर बसून त्यांच्याशी दुपारी गप्पा करत असताना एक मध्यमवयीन मनुष्य सायकलवरून बाजूने गेला व थोड्या वेळाने परतून उलट्या दिशेने गेला. तेव्हा साताप्पांनी मला सांगितले की हा गुप्त पोलीस आहे आणि बहुतेक तुझाच पत्ता काढत आहे. त्यांच्या सांगण्यावरून मी लगेच ते सायक्लोस्टाईल मशीन घरातून काढून गल्लीबोळातून मातृभूमी च्या कार्यालयात नेऊन दिले आणि घरी परत येत नाही तोच दारात पोलिसांची जीप आली. त्यातून एक इंस्पेक्टर उतरले नाही अत्यंत सभ्यपणे त्यांनी मला माझे नाव-गाव विचारले. मी नाव सांगितल्यावर मला कलेक्टर साहेबांच्या भेटीसाठी त्यांच्या सोबत यावे लागेल असे त्यांनी सांगितले.

कलेक्टर ऑफिसच्या बाजूला गुन्हे विभागाची शाखा होती. तिथे जाताना रस्त्यात त्या इंस्पेक्टरने सौजन्याने विचारले, चहा घेता की कॉफी ? मी चहा म्हटल्यानंतर त्यांनी एका बंगल्यासमोर गाडी थांबविली आणि आतून थर्मास भरून चहा आणला. त्यांच्या कार्यालयात नेऊन त्यांनी मला खुर्चीत बसायला सांगितले आणि थर्मास व कप माझ्यासमोर ठेऊन ते निघून गेले. सुमारे तीन तासांनी ते परत आले आणि ड्रॉवर मधून एक अंतर्देशीय पत्र काढून माझ्या पुढे ठेवले. ते बंद होते. मी ते उघडून वाचावे अशी त्यांची इच्छा होती. पत्र उघडल्यावर लक्षात आले की माझ्या बाहेरगावच्या मित्राने मला लिहिलेले ते पत्र असून त्यात गुप्तपणे कोण-कोणत्या कारवाया आपण करू शकतो या बद्दल सूचना होत्या. पत्रावरचे नाव व पत्ता माझाच आहे अशी माझ्याकडून सौम्यपणे कबुली घेऊन आणीबाणीबद्दल माझे काय मत आहे, असे त्या इंस्पेक्टरने विचारले. लाखो लोकांप्रमाणे मी सुद्धा आणीबाणीविरुद्ध आहे हे सांगितल्यावर त्यांनी पुन्हा मला चहाचा दुसरा थर्मास आणून दिला आणि निघून गेले. पुन्हा एक तासानंतर ते परत आले आणि घरून कपड्यांची बॅग बोलावून घेतो असे सांगून त्यांनी माझ्या हाती प्रतिबंधक स्थानबद्धतेचा मिसा कायद्याअंतर्गत कलेक्टरच्या सहीचा वॉरंट थोपवला. त्यांच्या माणसांनी माझ्या घरून माझी कपड्यांची बॅग आणेपर्यंत एका पोलीस व्हॅनची व्यवस्था करण्यात आली. त्या व्हॅनमध्ये चार पोलीस आणि एक सब-इंस्पेक्टर देऊन माझी रवानगी नागपूरच्या सेन्ट्रल जेलमध्ये रातोरात करण्यात आली. रस्त्यात एका गावी गाडी थांबवून सर्वांनी चहा घेतला, मलाही दिला. माझे वय तेव्हा २४ होते. पण भीती वाटत नव्हती त्याचे मुख्य कारण बहुदा पोलिसांची सभ्य वागणूक असावी.

नागपूरच्या तुरुंगात आधीच अनेक मिसाबंदी होते त्यात माझी भर पडली आणि पुढेही अनेकांना आणण्यात आले. लवकरच आम्हाला प्रथमवर्गाचे स्थानबद्ध कैदी म्हणून पलंग, गादी, मच्छरदाणी, वैद्यकीय तपासणी इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या. माझ्यासोबतचे बहुसंख्य कैदी जनसंघाचे किंवा रा.स्व. संघाचे पुढारी आणि कार्यकर्ते होते. जेलच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची आमच्यासोबत असलेली वागणूक कायम सौजन्यपूर्ण राहायची. व्हॉलीबॉल, त्याची नेट व ग्राउंड आम्हाला उपलब्ध करून देण्यात आले. आपापल्या बराकीत फक्त रात्री कुलूपबंद ठेवले जायचे बाकी दिवसभर आम्ही मोकळे असायचो. कारागृहाचे अधिक्षक स्वतः अधून मधून आमच्यासोबत बसून राजकारण सोडून इतर विषयांवर गप्पा करायचे. जेलची लायब्ररी चांगली होती. त्यातून वाचायला पुस्तके आणता येत होती. बाहेरून देखील पुस्तके मागवता येत होती. ट्रांझिस्टर वापरण्याची मुभा देखील यथावकाश मिळाली. त्यावर आम्ही बी.बी.सी. च्या बातम्या आणि चित्रपट संगीत ऐकायचो. नाशिक, येरवडा इत्यादी तुरुंगांमधून देखील अशीच माहिती मिळत होती. आता जे सरकार मध्ये आहेत आणि सरकारचे समर्थक आहेत त्यातल्या अनेकांनी माझ्याप्रमाणेच हे लाभ व वागणूक अनुभवली आहे.

परंतु २० जुलै चा हा ताजा भयंकर घटनाक्रम पाहिल्यावर या सरकारच्या आणि त्याच्या समर्थकांच्या कोडगेपणाची, निर्लज्जतेची, हिंसकतेची, बेपर्वाईची, खोटारडेपणाची, मग्रुरीची किती आणि कशी निंदा करावी हेच कळत नाही.

**किशोर देशपांडे**

# आरोग्य व्यवस्थेचे व्यापारीकरण

सर्वप्रथम दिल्लीत जंतरमंतरवर आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी/तरुणांवर हिंसक हल्ले करणाऱ्या, केंद्र सरकारच्या अखत्यारीतील दिल्ली पोलिसांचा जाहीर निषेध!आणि हॅट्स ऑफ टू यू विद्यार्थी/विद्यार्थिनींनो/तरुणांनो! या साऱ्या लाठ्या काठ्या,बळजोरी सहन केल्याबद्दल. नीट पेपरफुटीसाठी संबंधित केंद्रीय मंत्री म्हणून श्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आणि इतर मागण्या लावून धराच. पण सुरू झालेला हा संघर्ष,तयार झालेली ही ऊर्जा, व्यवस्थात्मक बदलाकडे नेण्याची देखील तेवढीच गरज आहे. कारण तुमच्या प्रश्नांची मुळे येथपर्यंत जाऊन भिडतात.

आजच्या शिक्षण व्यवस्थेत जनकेंद्री बदल होऊ शकले तर तुम्ही आणि विद्यार्थ्यांच्या पुढील पिढ्या लाभार्थी असणार आहात.दुसरा तुमचा ताबडतोबीचा फायदा म्हणजे सामान्य लोकांसठी मागण्या लावून धरल्यात तर तुम्हाला आज मिळालेला जनाधार,आता आणि भविष्यात, काही पटींनी वाढू शकतो. ही लढाऊ अल्टिमेटली राजकीय आहे. खरेतर देशाच्या राजकीय अर्थव्यवस्थेच्या जवळपास प्रत्येक उपक्षेत्राशी संबंधित धोरणे जनकेंद्री बनवण्यासाठी जनआंदोलनांचा हस्तक्षेप जरुरी आहे. कारण राज्यकर्त्यांना तीच भाषा कळते. पण ही पोस्ट फक्त वैद्यकीय क्षेत्रापुरती मर्यादित.

गाभ्यातील प्रश्न वैद्यकीय महाविद्यालयातील कमी उपलब्ध जागांपर्यंत जाऊन भिडतो.त्यामुळे विद्यार्थ्यांवर स्पर्धेचा प्रचंड ताण येतो.पेपर फुटीनंतर २० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या त्यामुळेच. किती गंभीर आहे स्पर्धा परीक्षांतून येणाऱ्या ताणाचा प्रश्न आपल्या देशातील प्रती दहा हजार लोकसंख्या मागे डॉक्टरांची संख्या इतर देशांच्या तुलनेत (संदर्भ जागतिक आरोग्य संघटना)

**समाजवादी क्युबा-** ९५

**विकसित राष्ट्रे-** अमेरिका २६; ब्रिटन ३२; जर्मनी ४१; युरोपियन युनियन ६०

**ब्रिक्स समूह-** रशिया ४०;ब्राझील;२१;चीन २४; दक्षिण आफ्रिका ९ आणि भारत.

डॉक्टर किंवा आरोग्यसेवा केव्हा लागतात. आजारी पडल्यावर. माणसे आजारी का पडतात, सार्वजनिक आरोग्य, पब्लिक हेल्थ, पाणी, हवा इत्यादी, आहाराची गुणवत्ता, लहानपणापासून तयार झालेली रोगप्रतिकार शक्ती इत्यादी. उघड आहे की,भारतासारख्या देशात,विकसित देशांच्या तुलनेत माणसे आजारी जास्त वेळा पडणार.म्हणजे मग आपल्या देशात डॉक्टरांची दर हजारी उपलब्धता, विकसित देशांच्या तुलनेत,जास्त हवी की नको? आणि भारताचे आकडे बघा.

गेल्या काही वर्षाची आकडेवारी बघितली की दिसते की सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील (जी महाविद्यालय सरकारी इस्पितळांशी निगडित असतात) वैद्यकीय प्रवेशाच्या जागांपेक्षा खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील जागा सातत्याने वाढत आहेत. सध्या सरकारी ६५,००० तर खाजगी ७५,००० अशी आकडेवारी आहे.

या जीवघेण्या स्पर्धेचा संबंध आरोग्य व्यवस्थेच्या अतिरेकी व्यापारीकरणाशी आहे.तोच धागा पुढे खोऱ्याने पैसे कमावणाऱ्या, तुमच्यासाठी महागड्या, खाजगी ट्युशन्सशी आहे.त्याचा संबंध नीट मधील पेपर फुटीशी आहे. सार्वजनिक स्रोतातून नवीन अद्ययावत सार्वजनिक इस्पितळे आणि वैद्यकीय महाविद्यालय बांधली गेली पाहिजेत. त्यातून वैद्यकीय महाविद्यालयातील जागा वाढल्या पाहिजेत. वैद्यकीय शास्त्रात एवढी प्रगती झाली आहे की इस्पितळात अनेक प्रगत तंत्रज्ञानावर आधारित वैद्यकीय उपकरणे असावी लागतात. नाहीतर फक्त इमारती उभ्या असतात. हे सारे भांडवल सघन आहे. त्याला भांडवल लागणार. यासाठी केंद्र सरकार,राज्य सरकारे,नगरपालिकांनी अर्थसंकल्पात असणाऱ्या तरतुदी काही पटींनी वाढवाव्या लागतील. आज भारत जीडीपीच्या जेमतेम दोन टक्के एकूण आरोग्यावर खर्च करतो.

अस्तित्वात असणाऱ्या शासकीय इस्पितळांची काय दुरावस्था आहे हे समजण्यासाठी कोणी स्वतः डॉक्टर असण्याची गरज नाही.त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि केंद्र सरकार सारा भर मेडिकल विमा काढण्यावर देत आहे. भारतासारख्या देशाला हे मॉडेल सयुक्तिक नाही. सरकारी आरोग्य सेवांच्या, पायाभूत सुविधा यांची गुणवत्ता काही पटींनी सुधारली तर खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा धंदा कमी होईल हे उघड गुपित आहे.

आपल्या नफ्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकणारे, आरोग्य क्षेत्रात आलेले कॉर्पोरेट/वित्त भांडवल, शासनाच्या आरोग्य क्षेत्रसबंधीत धोरणांवर प्रभाव पाडत नसेल, असे थोडेच आहे.तुमचे प्रश्न खरे,ज्वलंत आहेतच. पण ते एका अमानवी व्यापक राजकीय अर्थव्यवस्थेतून येतात.त्याला आज ना उद्या तुम्हाला हात घालवा लागेल. नाहीतर नियमितपणे पुढच्या विद्यार्थ्यांच्या पिढ्यांना देखील आपल्या मागण्यांसाठी आंदोलने करावी लागतील. कॉन्टेक्सट,प्रश्न,मागण्या बदलतील. पण त्या एकाच झाडाच्या विविध फांद्या असतील.

**संजीव चांदोरकर**

# आपसूकचे हसू

जंतर मंतर आंदोलनाचा चेहरा ना सोनम वांगचुक आहेत ना अभिजित दीपके. या दोघांच्या भूमिकेबद्दल माझ्या मनात शंका आहे. पण या आंदोलनाचा खरा चेहरा आहे तो आहे जेंझी तरुणांचा याबद्दल मात्र माझ्या मनात काडीचीही शंका नाही.

ही मुले देशभरातून तिथे जाऊन सामील होताहेत. देशभरात इतर ठिकाणीही जोरदार आंदोलने सुरु आहेत. आणि मुख्य माध्यमांनी त्याबद्दलच्या बातम्या कितीही दाबायच्या ठरवल्या तरी आता स्वतंत्र पत्रकार आणि खुद्द मुले यांनी लोकांना आहे ते दाखवले आहे.

बरे या मुलांचे काय करावे ते सरकारला कळेल असे वाटत नाही. कारण ते सरकारची मस्त टर उडवताहेत, मिम्स करताहेत. पोलिसांसाठी टाळ्या वाजवताहेत,त्यांना वारा घालताहेत,त्यांना निडरपणे प्रश्न विचारताहेत. जेंझी मुलांची विनोदबुद्धी अफलातून आहे. त्यांनी केलेली पोस्टर्स आणि मिम्स हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो.

मुळात ही पिढी सध्या निर्णायकी परिस्थितीत आहे. सरकारने महिनाभर दुर्लक्ष केले,विरोधी पक्षांची हवी तेव्हा साथ मिळाली नाही. तरीही ही मुले सध्या तरी एकजुटीने उभी आहेत.त्यांना अजून बळ मिळायला हवे. देशातल्या शिक्षण व्यवस्थेचा झालेला बट्ट्याबोळ नीट करण्याची त्यांची मागणी चुकीची अजिबात नाही. तिथे इतर मागण्या होणार नाहीत, इतर विषयांवर चर्चा होणार नाही असे कसे होईल? ते तर होणारच.

ज्या लोकांनी या आंदोलनाला पाठिंबा दिलाय त्यांच्याबद्दल घाणेरडे बोलणे, त्यांच्याबद्दल विखारी कमेंट्स करणे हे आता आपल्याला नवीन राहिलेले नाही. ज्यांनी आंदोलनाला पाठिंबा दिलाय त्यांना कापून काढा अशी एक कमेंट वाचली. धन्य वाटले. ज्यांना आयुष्यात काही जमत नाही ते लोक कायमच यशस्वी लोकांबद्दल असूया बाळगून असतात.

अशा कमेंट करणाऱ्यांमध्ये कुठल्या आडनावांचे लोक असतील हे सांगायची गरजच नाही. यांची मुले परदेशात शिकणार, तिथे स्थायिक होणार आणि हे इतरांना शहाणपणा शिकवणार! यात्रा करणारे, जपतप करणारे, लोकांना मनःशांती शिकवणारे, काशीला नियमित जाणारे, नियमित तीर्थयात्रा करणारे लोक यात आहेत. यांचे हे करणे निष्फळ आहे. बरे ज्या धर्माचे रक्षण यांना करायचे आहे तो हिंदू धर्म लोकांशी असे वागायला सांगत नाही. संस्कृतीचे रक्षण अशाने होत असते अशी त्यांची समजूत तर मस्तच! अज्ञात राहण्याची एक सोय सोशल मीडियाने करून दिलेली आहे तिचा भरपूर वापर हे लोक करताहेत.

कालपासून आंदोलक मुलांच्या असंख्य रिल्स बघितल्या आणि चेहऱ्यावर आपसूक हसू आले. मुले ज्या पद्धतीने या आंदोलनात वावरताहेत ते बघून वसंत आबाजी डहाके यांची एक कविता आठवली..

**मुलं हसताहेत..**

शाळेतली मुलं बागेत येऊन प्रचंड हसताहेत
मुलांच्या हसण्याचा आवाज आत वाढत चाललाय
शेजारच्या पोलीस स्टेशनातला शिपाई चकित होऊन पाहतोय
मुले आपली हसताहेत सारखी कार्यकर्ते घाबरेघुबरे होऊन आपापल्या नेत्यांकडे धावत जाऊन सांगताहेत की मुले हसताहेत
नेताजी, मुलं हसताहेत
पत्रकार दबत दबत कानोसा घेताहेत..
कुजबुजताहेत आणि कळवताहेत मुख्य कचेरीकडे की मुलं हसताहेत
कारणं आणि प्रतिक्रियांचा शोध सुरु आहे..
प्रादेशिक सरकारं चिंताक्रांत झालेली आहेत आणि केंद्र सरकारकडे मदतीसाठी चकरा घालताहेत..
कुणी तरी निवृत्त अधिकारी वर्तमानपत्रात लिहून चौकशीची मागणी करतोय की मुलं का हसताहेत..
सुपरस्टारचे सिनेमे असलेली थिएटर ओस पडली आहेत..
पोस्टरवरच्या चंद्रमुखीचे चेहरे सुकलेले आहेत..
पब्लिक चाललंय सार्वजनिक बागेकडे की मुलं हसताहेत म्हणे!
मुलं हसताहेत, भयंकर हसताहेत..
शहरात जमावबंदी आणि शांतताभंग विरोधी कलमे जारी झालेली आहेत
तरी मुलं हसताहेत..
सार्वजनिक बागेत फुलपाखरांमागे धावत मुलं हसताहेत, सारखी हसताहेत..
हे चांगले नाही,
दूरवरचा विचार करणारा एक माणूस म्हणाला
आणि त्याने फर्मान काढले की, सार्वजनिक बाग उध्वस्त करून टाका
उध्वस्त बागेकडे पाहात मुलं हसताहेत
बंदूकवाल्या शिपायांकडे बघून मुले हसताहेत
मुलं भयंकर हसताहेत...

**-सायली राजाध्यक्ष**

# समाजाची खालावलेली नितीमत्ता!

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या झालेल्या प्रगतीमुळे वाहतूक आणि दळणवळण यामध्ये झपाट्याने गतीमानता आली आहे. भारतीय रेल्वे ही जगात दुसऱ्या क्रमांकाची रेल्वे आहे.पूर्वी लांबच्या प्रवासाला जाताना बरोबर वळकटी घेऊन जावी लागत असे .त्यानंतर हांतरुण -पांघरूण नेण्यासाठी 'होल्डऑल' ची सोय झाली. आता तर वातानुकुलीत डब्यातून झोपण्यासाठी चादर, उशी, ब्लँकेट सर्व काही मिळते. खाणे पिणे मोबाईल चार्ज करण्याची सोय अशा सगळ्याच सुखसोई आहेत त्याविषयी यंत्रणेचे आभार मानायला हवेत .पण प्रवासीच दिलेली अंथरूण पांघरूण पळवतात असे रेल्वे प्रशासनाने म्हंटले आहे; सहकार्य करण्याच्या ऐवजी यंत्रणेला अडचणीत आणणे हे उपकाराची फेड अपकाराने करणे अशासारखे आहे.सध्या माणसाची नीतिमत्ता इतकी घसरली आहे की अपघात झाल्यावर एखादी व्यक्ती मृत झाली असेल तर त्या व्यक्तीचे दागिने पैसे पळवून नेले जातात. एखादा तेलाचा टँकर किंवा खाद्य वस्तूंचा साठा असलेला टँकर उलटला तर सहाय्य करणे तर दूरच पण माल पळवला जातो. एखादी अयोग्य घटना घडत असताना ते थांबवण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी काहीजण व्हिडिओ शूटिंग करत राहतात याला काय म्हणावे! ऑनलाइन व्यवहाराची सोय आहे पण फसवणूकीचे धोकेही तितकेच वाढले आहेत. त्यामुळे समाज स्वास्थ्यासाठी केवळ भौतिक प्रगती पुरेशी नाही. माणसाने नितीमानता जोपासायला हवी हेच त्रिवार सत्य आहे.

**संध्या काटदरे**

शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# दिल्ली लाठीचार्ज निषेध: 'महाराष्ट्र बंद'ला यवतमाळचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रशासनाला जाब,विविध पक्ष-संघटनांची एकजूट,शांततापूर्ण सहकार्यासाठी यवतमाळ पोलिसांचे आभार**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** दिल्ली येथे न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित अमानुष लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या 'महाराष्ट्र बंद'च्या हाकेला गुरुवारी (दि. २३) यवतमाळ जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या आंदोलनात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यासह विविध समविचारी



राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, कामगार, शेतकरी, व्यापारी संघटना, कर्मचारी संघटना, युवक, महिला आणि संविधानवादी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा तीव्र निषेध व्यक्त करत केंद्र सरकारने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. उपस्थित विद्यार्थी व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी ही आपल्या भावना व्यक्त करत शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारण्याची भूमिका मांडली. यावेळी बोलताना डॉ. नीरज वाघमारे म्हणाले,लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करून त्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न हा संविधान, लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर झालेला गंभीर आघात आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर लाठीचा नव्हे, तर संवादाचा मार्ग स्वीकारला गेला पाहिजे. आंदोलनात दिल्लीतील घटनेत जखमी झालेल्या तसेच उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आलेल्या विद्यार्थिनीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दिल्लीत आंदोलनात सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांनीही प्रत्यक्ष अनुभव कथन करत त्या दिवशी घडलेल्या घटनांची माहिती उपस्थितांसमोर मांडली. यानंतर डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि जबाबदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. दरम्यान, दिल्लीतील पोलिस कारवाईचा निषेध नोंदवित असतानाच आंदोलकांनी यवतमाळ पोलिसांचे शांततापूर्ण आंदोलनासाठी केलेल्या सहकार्याबद्दल व योग्य सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

# बेघर महिलांचे जागा व घरकुलाच्या मागणीसाठी आमरण उपोषण..!

**नगरपरिषद प्रशासनाविरोधात भर पावसात महिलांचा एल्गार**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २३ :** शहरातील प्रभाग क्रमांक ५ व ६ मधील बेघर, भूमिहीन व निराधार महिलांनी घरकुल योजनेसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी गुरुवार (दि. २३ जुलै) पासून आमरण उपोषण सुरू केले. गणेश वार्ड, सुभाष वार्ड व भोईपुरा परिसरातील महिलांनी सामाजिक कार्यकर्ते राहुल पडघणे यांच्या मार्गदर्शनाखाली २०१७ पासून नगरपरिषद, लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला; मात्र कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याचा आरोप त्यांनी केला.

महिलांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाने लेखी आश्वासन



दिल्यानंतरही दोन महिने उलटून गेले तरी घरकुल व नमुना 'ड' संदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नाही. नगरपरिषदेने संबंधित जागेवर शासनाचा प्रस्तावित प्रकल्प असल्याचे कारण देत जागा देण्यास असमर्थता दर्शविली. मात्र, २०१७-१८ मध्ये घरकुलासाठी प्रत्येकी ₹५० स्वीकारून पावत्या दिल्यानंतरही घरकुले न देता नागरिकांची फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

# महिला उद्योजिकांना व्यासपीठ ! उमरखेडमध्ये माहेश्वरी महिला संगठनातर्फे हस्तकला व उद्यमिता प्रदर्शन !!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २३ :** महिलांमधील उद्योजकता, हस्तकला आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्यासाठी माहेश्वरी महिला संगठन यांच्या वतीने मंगळवार, दि. २१ जुलै रोजी स्व .गो सो सारडा राजस्थानी भवन येथे सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत महिला हस्तकला व उद्यमिता प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन यवतमाळ जिल्हा अध्यक्ष विजयानंदजी भूतडा तसेच राजस्थानी मंडळाचे अध्यक्ष राजकुमारजी भंडारी यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला उद्योजिका व नागरिकांची उपस्थिती होती. प्रदर्शनामध्ये महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या विविध हस्तकला



**महिला सक्षमीकरणाला चालना**

**महिला हस्तकला व उद्यमिता प्रदर्शन हे केवळ वस्तूंचे प्रदर्शन नसून महिलांच्या कौशल्याला, आत्मविश्वासाला आणि आर्थिक स्वावलंबनाला बळ देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला उद्योजिकांना सहकार्य करावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.**

वस्तू, गृहउद्योगातून निर्मित उत्पादने, कलात्मक साहित्य तसेच स्वयंपूर्ण व्यवसायाशी संबंधित विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री होणार आहे. या माध्यमातून महिलांना त्यांच्या उत्पादनांचे सादरीकरण करण्याची तसेच ग्राहकांशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाली. या प्रदर्शनाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिला उद्योजिकांना प्रोत्साहन दिले, त्यांच्या कलागुणांना दाद द्यावी आणि स्वदेशी व महिला उत्पादकांच्या वस्तूंना पसंती देऊन त्यांचा उत्साह वाढवण्याचे आवाहन माहेश्वरी महिला संगठनच्या अध्यक्षा सौ. लता माहेश्वरी व सचिव सौ. कीर्ती भट्टड यांनी केले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाला मांगीलालजी जांगिड , विजयकुमार जैन, सौ निधी नितिन भुतडा, पूजा भुतडा , साधना बाहेती, स्मिता सारडा उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशवितेकरिता सरला बंग, ललिता बंग, पूजा तेला, मंगल भंडारी, सपना बाहेती व सर्व माहेश्वरी महिला मंडळाच्या महिलांनी परिश्रम घेतले

# जंतर-मंतर प्रकरणावर केळापूर काँग्रेस आक्रमक..!

**कथित लाठीचार्जचा तीव्र निषेध निष्पक्ष चौकशी,दोषींवर कारवाई व विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर निर्णय**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २३ :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांशी संबंधित मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या घटनेचा केळापूर तालुका काँग्रेस कमिटीने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या आवाजाला दडपण्यासाठी बळाचा वापर करणे हे लोकशाही मूल्यांवर आघात असल्याचा आरोप करत, संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उपविभागीय अधिकारी, केळापूर यांच्यामार्फत शासनाकडे करण्यात आली.

काँग्रेसने सादर केलेल्या निवेदनात भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला आणि विद्यार्थ्यांनाही शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार



दिला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आपल्या न्याय्य शैक्षणिक मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कथितपणे लाठीचार्ज करण्यात आल्याची घटना दुर्दैवी असून, ती लोकशाही व्यवस्थेला काळिमा फासणारी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याऐवजी दडपशाहीचे धोरण स्वीकारणे अयोग्य असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. यावेळी आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील कथित पोलिस कारवाईचीही स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. दोषी अधिकारी व संबंधितांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक व त्वरित निर्णय घ्यावा. शांततापूर्ण आंदोलन करण्याच्या घटनात्मक अधिकाराचे संरक्षण करून लोकशाही मूल्ये अबाधित ठेवावीत. हे निवेदन गुरुवार, २३ जुलै रोजी केळापूरचे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत शासनाला सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत शासनाने संवेदनशील भूमिका घेत तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा केळापूर तालुका काँग्रेस कमिटीने व्यक्त केली आहे.

# खा. राहुल गांधी यांच्या अटकेचा महागावमध्ये निषेध, तहसीलदारांना निवेदन



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २३ :** महागाव : लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा. राहुल गांधी यांना दिल्लीत अटक करण्यात आल्याच्या निषेधार्थ महागाव तालुका काँग्रेस कमिटी व युवक काँग्रेस (उमरखेड विधानसभा) यांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी महागाव येथील तहसीलदार यांना निवेदन सादर करून केंद्र सरकारच्या कथित दडपशाहीच्या विरोधात आवाज उठविण्यात आला. निवेदनाद्वारे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित करत, विरोधी पक्षाच्या नेत्यांवर होत असलेल्या कारवाईचा निषेध नोंदविला. लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्षाचा आवाज दडपण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीला घातक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या आंदोलनात महागाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील राठोड, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश कोपरकर, मा. आरीफ सुरैय्या, नितीन पाटील, युवक काँग्रेसचे इम्रान पठाण,भगवान पंडागळे,अमोल मोहकर, रितेश रोकडे यांच्यासह महागाव तालुका काँग्रेस कमिटी

# सामाजिक उपक्रमांनी स्व.अजितदादांना अभिवादन !

**वृक्षारोपण, रक्तदान शिबिर व दिवसभर अभिवादन ।**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २३ :** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकट मंगळवारी दि. २२ विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

औदुंबर वृक्ष समिती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित कार्यक्रमांना कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिक, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात वृक्षारोपणाने झाली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत औदुंबर वृक्ष समिती व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी वृक्षारोपण करून अजितदादांना अभिवादन केले. यानंतर छ शिवाजी महाराज चौक



येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अजितदादांच्या प्रतिमेला अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याच ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात अनेक युवक व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.


शहरातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनीही उपस्थित राहून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर तालंकर, ज्येष्ठ नेते गुणवंत सूर्यवंशी, महिला तालुकाध्यक्ष वनिता चव्हाण, शहराध्यक्ष दामोदर इंगोले, युवा तालुकाध्यक्ष बबलू जाधव, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष शाहरुख पठाण, युवा शहराध्यक्ष संतोष सूर्यवंशी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका व शहरातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अजितदादांनी समाजहितासाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजसेवा व लोककल्याणाचे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# विद्यार्थ्यांच्या संघर्षाला झरी जामणी काँग्रेसचा पाठिंबा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २३ :** जंतर मंतर वर दिल्लीत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ, झरी जामणी तालुका काँग्रेस कडून तहसीलदार मार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना एक निवेदन सादर केले.

काँग्रेस नेत्यांनी मागणी केली की, केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, त्यांना न्याय द्यावा आणि सुरू असलेले आंदोलन लोकशाही पद्धतीने गांभीर्याने घ्यावे. तालुका काँग्रेस कमीटीचे अध्यक्ष संदीप बुरेंवार यांच्या नेतृत्वाखालील या निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित मुद्द्यांवर केंद्र सरकारचे मौन लोकशाही



व्यवस्थेसाठी चिंताजनक आहे. जर तरुणांच्या आवाजाकडे दुर्लक्ष करणे सुरूच राहिले, तर देशभरातील असंतोष आणखी वाढू शकतो.सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करताना ते म्हणाले की, सरकारने विद्यार्थ्यांचे हक्क आणि भविष्याशी संबंधित मुद्द्यांबाबत संवेदनशील असले पाहिजे. त्यांनी हे निवेदन तात्काळ राष्ट्रपती आणि संबंधित केंद्रीय मंत्रालयाला पाठवण्याची मागणीही केली. यावेळी झरी तालुका सचिव सुरेंद्र गेदाम, सोशल मीडिया तालुका अध्यक्ष गणेश बेळेकर, आऊटरीच सेलचे अध्यक्ष संदीप धांगले, जालेंद्र गोपेवार, शरद येल्टीवार, कुंदन थावरी, रजनीकांत आसमवार, दत्ता बडगेवार, पिसाराम आत्राम, जलपत कुडमेथे यांच्यासह काँग्रेसच्या विविध सेलचे अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घाटंजीत 'समाधान शिबिराला' विक्रमी गर्दी..!

**आ. राजू तोडसाम यांचा प्रशासनाला खडसावणारा इशारा**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. २३ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मुरली (ता. घाटंजी) येथील सुपुनाथ मंगल कार्यालयात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' आणि भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भर पावसातही घाटंजी, आर्णी व पांढरकवडा तालुक्यांतील हजारो नागरिकांनी उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला. महसूल, आरोग्य, शिक्षण, आदिवासी विकास, ग्रामपंचायत, नगरपंचायत आदी विभागांनी एकाच छताखाली सेवा उपलब्ध करून दिल्या. नागरिकांच्या अर्ज, तक्रारी व विविध प्रकरणांवर संबंधित विभागांनी तत्परतेने कार्यवाही



**प्रशासनाला आ. तोडसाम यांचे स्पष्ट शब्द**

**समाधान शिबिरात आलेल्या प्रत्येक लाभार्थ्याच्या समस्येचे कायदेशीर व वेळेत निराकरण झालेच पाहिजे. नागरिकांना हेलपाटे मारायला लावणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आमदार राजू तोडसाम यांनी दिला. शिबिरादरम्यान प्राप्त झालेल्या विविध तक्रारींवर त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत कार्यपद्धतीत सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.**

केली. रक्तदान शिबिरालाही मोठा प्रतिसाद मिळाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिल्यामुळे परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली. प्रतिकूल हवामान असूनही नागरिकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावल्याने शिबिर यशस्वी ठरल्याचे प्रशासनाने सांगितले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी व भाजप कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# विदर्भाच्या पंढरीत आषाढी एकादशीचा भव्य सोहळा..!

**श्री ज्ञानेश्वर संस्थानात जय्यत तयारी**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २३ :** आषाढी एकादशी निमित्त शनिवार, २५ जुलै रोजी पुसद येथील श्री ज्ञानेश्वर संस्थानात विठुरायाच्या दर्शन महोत्सवाची जय्यत तयारी पूर्ण झाली असून, यंदाही हजारो भाविकांच्या उपस्थितीची अपेक्षा आहे. मागील वर्षी सुमारे ६० हजार भाविकांनी विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले होते.

पंढरपूरला जाता न आलेल्या भाविकांसाठी पुसदची ही "विदर्भाची पंढरी" श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र ठरत आहे. पहाटे ३ वाजता पंचामृत महापूजेने महोत्सवाची सुरुवात होणार असून, नगराध्यक्षा मोहिनी इंद्रनील नाईक व माजी मंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते महापूजा पार पडणार आहे.



त्यानंतर महाआरती, सामूहिक ज्ञानेश्वरी पारायण, दिवसभर भजन-भावगीतांचा कार्यक्रम आणि रात्री हरिभक्त परायण गणेश महाराज धर्माळे यांचे कीर्तन होणार आहे.भाविकांच्या सोयीसाठी मोफत बससेवा, स्वतंत्र पार्किंग, चप्पल स्टँड, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअरद्वारे थेट दर्शन, प्रसाद व चहाची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली राहणार असून १,६०० सेवेकरी सेवेत तैनात असतील. याशिवाय मोफत आरोग्य शिबिर, रक्तदान व देहदान नोंदणी, तसेच एसआयआर जनगणना मार्गदर्शन केंद्रही उभारण्यात आले आहे. पोलीस, नगर परिषद, महसूल विभाग, महावितरण व स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विठुरायाच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री ज्ञानेश्वर संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

**Shri. Babasaheb Deshmukh Parwekar Mahavidyalaya,**

Pandharkawada Dist. Yavatmal

**WANTED**
**(For the Session २०२६-२०२७)**
**Walk-in Interview -**

Applications are invited for appointments of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under :-

Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes

**(As Per Regulation No. २/२०२०, and its para-११, G.R. Dated १७-१०-२०२२)**

| Sr. No | Subject/Course | Total No. of Contributory post |
|---|---|---|
| १ | Commerce | ०३ |

**Eligibility:** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation २०१८ (University Direction No. ०८/२०१९ & १४/२०१९ ) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, dt. १४-११-२०१८. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said G. R.

Note:
१) Submit your Application a/w all documents on or before Interview.
२) Remain present in the college office on २९/०७/२०२६ at ११-३० am for an Interview.

**Dr. Rahul S. Khandare**
Principal
Shri. B. D. Parwekar Mahavidyalaya
Pandharkawada

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# एकाच तारखेला एकाचवेळी नगरपरिषदमध्ये दोन सभा

## नगरसेवकांची तारांबळ उडविण्याचे कर्मचाऱ्यांचे कटकारस्थान

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी मध्ये तारतम्य नसल्याने २८ जुलै २०२६ मंगळवार रोजी सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष यांनी तर पाणीपुरवठा सभापती यांनी ही विषय समितीची बैठक नप सभागृहात आयोजित केल्यामुळे नगरसेवकांसमोर कुठल्या सभेत उपस्थित राहून, जनतेच्या समस्या सोडवायच्या हा संभ्रम निर्माण झाला आहे.

चांदूररेल्वे नगरपरिषद कार्यालयात कर्मचारी, मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, सभापती सोबत कुठलेही तारतम्य नसल्याचे चित्र सध्यातरी दिसून येते आहे. २८ जुलै २०२६ मंगळवार रोजी दुपारी १२ वाजता नगरपरिषद सभागृहात सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांनी आयोजित केली तर याच दिवशी पाणीपुरवठा सभापती प्राविण्य देशमुख यांनी सुध्दा पाणी पुरवठा समिती ची बैठक नप सभागृहात आयोजित केली. या नगरपरिषद कार्यालयात सभा घेण्यासाठी एकच सभागृह असून वेगवेगळ्या दोन सभा एकाच दिवशी १२ वाजता कशा घेतल्या जातील व पाणीपुरवठा समितीत सदस्य असलेले नगरसेवक कुठल्या सभेत हजर राहतील? असा प्रश्न संबंधित नगरसेवका पुढे उपस्थित झालाआहे. दोन्ही सभा ह्या महत्वपूर्ण असून नगरपरिषद मुख्याधिकारी व कर्मचारी तसेच सभागृहातील लोकप्रतिनिधी मध्ये तारतम्य नसल्याचे निदर्शनास येत असल्याची चर्चा नगरसेवक करीत आहे.




■ सर्वसाधारण सभा ही मुख्यतः विकास कामासाठी सर्व नगरसेवकांसाठी आयोजित करण्यात येते. अध्यक्ष ही सुचना मुख्याधिकाऱ्या मार्फत कर्मचाऱ्यांना करतात. तसेच सभेचे आयोजन होते. समित्यांचे अनेक विषय एखाद्या वेळेस एकत्रित झाले असेल तरी त्यासाठी मागेपुढे सभा करता येईल किंवा सभागृह बदलून घेता येईल आणि जर एखाद्या कर्मचाऱ्यांने हेतू पुरस्सर केला असेल तर संबंधित कर्मचाऱ्यावर मुख्याधिकारी कडून माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल.

**-नगराध्यक्ष डॉ.प्रियंका विश्वकर्मा**

### ■ कुठल्या सभेत उपस्थित राहावे हा संभ्रम-नगरसेविका पूनम कोकाटे


२८ जुलै मंगळवार रोजी १२ वाजता कुठल्या सभेत उपस्थित राहून जनतेच्या समस्या सोडवायच्या असा संभ्रम निर्माण झाला. सर्वसाधारण सभा व पाणीपुरवठा समितीची बैठक ही तीतकीच आवश्यक आहे. पण एकाच सभागृहात दोन वेगवेगळ्या सभा कशा घेतल्या जातील असा प्रश्न उपस्थित होतो तरी कर्मचाऱ्यांनी सभेची तारीख ठरविण्या आधी संबंधित सभापती, नगराध्यक्ष यांना विश्वासात घेतले पाहिजे.

### ■ पाणीपुरवठा समितीच्या सभेची सूचना पत्र १७ जुलैचे-सभापती देशमुख

पाणीपुरवठा समितीच्या सभेचे सूचना पत्र १७ जुलै २०२६ रोजी विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहे व सर्वसाधारण सभेचे सूचना पत्र २१ जुलै २०२६ रोजी.. यावरूनच स्पष्ट होते की कोणती सभा आधी घेण्याचे ठरविण्यात आले. पाणीपुरवठा समितीच्या सभेची तारीख व वेळ आधीच ठरवण्यात आलेली आहे आणि ठरल्याप्रमाणे ती घेण्याचे नियोजन सुद्धा करण्यात आलेले असताना प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे हा प्रसंग ओढवलेला आहे.

## संक्षिप्त

### विद्यापीठात टिळक जयंती साजरी



**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधार टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सी.ए. पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम, अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याबद्दल माहिती अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.

### रुख्मीणी मातेच्या पालखीचे स्वागत



**कुऱ्हा-** विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर श्री विठ्ठल रूख्मीणी संस्थांची कौंडण्यपूर ते पंढरपूर आषाढी पायदळ दिंडी सोहळा गेल्या ४३२ वर्षापासून सुरू असलेल्या आई रूख्मीणी मातेची तिर्थक्षेत्र पंढरपूर येथील रूख्मीणी मठ येथे दुपारी १२ वा.आगमन होताच पायदळ दिंडीचे भव्य दिव्य मठा मधील आई रूख्मीणी मंदिराची सजावट करुन रांगोळ्या, फुलांनी सुशोभित सजविण्यात आले श्री विठ्ठल रूख्मीणी संस्थानचे विश्वस्त हिम्मतराव टाकोने व सौ.व श्री अशोक पवार तसेच अकोला येथील माऊली नगरामधिल रविंद्रजी अंधारे दरवर्षी चे अभिषेक व अन्नदाते आदी भाविक भक्तांच्या उपस्थितीत स्वागत दिंडी प्रमुख तथा संस्थानचे सचिव सदानंद साधू यांचे स्वागत व दिंडी चालक ह.भ.प.पंकज महाराज महल्ले दिंडी प्रमुख सुरेश चव्हाण (विश्वस्त) विनेकरी विठोबा बागडे व सर्व वारकरी यांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाला मारडा येथील सेवावृत्त मुख्याध्यापिका तथा वारकरी शांताबाई दोंडगे,कुसुम पवार, सेवावृत्त पीएसआय प्रल्हाद पवार (अमरावती),सुर्यकांत पवार, बाबुलाल मोरे (अकोला) सर्व वारकरी महिला पुरुष यांच्या सहभागाने स्वागत करण्यात आले.

### अध्यात्म सातत्य अबाधित ठेवण्याची गरज-प्रा.भारसाकळे



**दर्यापूर-** हरिपाठ , काकडा आरती तथा भागवत व इतरही सर्वच धर्मांचे धार्मिक कार्य हे आपत्या महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यापाड्यात आवर्जून सातात्याने साजरे होतात . हे कार्य व परंपरा कायम व सातत्यपूर्ण राहली तर सर्व ग्रामवासी उच्च विचारांनी तथा पवित्र वातावरणात त्यांचे व्यवसाय व दैनंदिन कार्य पूर्तता करून गुण्यागोविंदाने नांदू शकतात असे भावपूर्ण प्रतिपादन बेलोरा गावाचे माजी सरपंच प्रा . गजानन भारसाकळे यांनी केले.आषाढी एकदशी निमित्याने दर्यापूर तालुक्यातील बेलोरा येथील हरीपाठ मंडळाला गावातील नागरीक तथा गाडगेबाबा गोरक्षण संस्था माहुली (धांडे) संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब नामदेवराव भारसाकळे यांनी भजन साहित्य खरेदी साठी आर्थिक योगदान हरीपाठ मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांना सूपूर्त केले.बेलोरा येथील हनुमान मंदीरात हरीपाठा दरम्यान हा कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी विनावादक संतोष रानगट यांचेसह दैनंदीन हरिपाठ उपक्रमातील गावातील महिला वर्गाची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.कार्यक्रमात साहेबरावजी तराळ, रोहन फेरन, विनोद भारसाकळे, आशिष ठाकरे यांनी सहकार्य केले.

### विभागीय आयुक्तालयात टिळकांना अभिवादन

**अमरावती-** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्तालय कार्यालयात आज अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी लोकमान्य टिळक



यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी उपायुक्त संतोष कवडे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर समीर पाटील

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

तालुक्यातील सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती नांदगाव खंडेश्वर या संस्थेतर्फे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रतिनिधी पाठविण्यासाठी मतदान प्रक्रिया राबविण्यात आली असता संस्थेचे संचालक समीर पाटील यांची बहुमताने निवड झाली.

संस्थेतर्फे बँकेवर प्रतिनिधी म्हणून जाण्याकरता संस्थेचे दोन संचालक इच्छुक होते.त्यामुळे गुप्त मतदानाची प्रक्रिया राबविण्यात आली तेव्हा संचालक समीर पाटील यांना ८ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी स्मिता सावदे यांना ६ मते मिळाली. त्यामुळे समीर पाटील यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रतिनिधी म्हणून बहुमताने निवड झाली. तेव्हा संस्थेचे अध्यक्ष परीक्षित ढेकेकर यांनी संस्थेच्या



वतीने समीर पाटील यांचे हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच उपस्थित संचालक व मान्यवराकडून सुद्धा अभिनंदन करण्यात आले. निवड प्रक्रियेच्या वेळी खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष परीक्षेत ढेकेकर, उपाध्यक्ष भालचंद्र रोहनेकर, संचालक मनोहर चोरे, विजय पाटेकर,बळीराम वाट, प्रभाकर काळमेघ, संजय देवतळे, गजानन ढवळे, समीर पाटील, सुरेंद्र खापरी, पुडलिक रिठे, दिनेश गिरी,स्मिता सावदे, वैशाली रिठे संचालकाची उपस्थिती होती.

## डॉ. तुषार वानखडे यांचे निधन

**अमरावती/का.प्र.**



जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर येथील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तुषार वानखडे यांचे हैदराबाद येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.डॉ. तुषार वानखडे हे अत्यंत अभ्यासू, मनमिळाऊ, त्यांचे अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्यावर बुलढाणा येथे अंतिमसंस्कार करण्यात आले.

# हज यात्रा २०२७ च्या अर्जासाठी मुदतवाढ द्या

## खा.वानखडे यांच्यासह चार खासदारांची केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**

हज यात्रा २०२७ साठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली असली, तरी देशातील अनेक मुस्लिम बांधवांना विविध तांत्रिक, प्रशासकीय तसेच वैयक्तिक कारणांमुळे अद्याप अर्ज सादर करता आलेला नाही. त्यामुळे हजारो इच्छुक भाविक हज यात्रेपासून वंचित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी किमान एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी खासदार बळवंत वानखडे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि खासदार रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्री मा. किरेन रिजिजू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



हज यात्रा ही मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र आणि आयुष्यातील महत्त्वाची धार्मिक यात्रा आहे. केवळ अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यामुळे कोणताही पात्र भाविक या धार्मिक कर्तव्यापासून वंचित राहू नये. त्यामुळे केंद्र सरकारने या विषयाकडे संवेदनशीलतेने पाहून ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम मुदतीत किमान एक आठवड्याची वाढ करावी. या मुदतवाढीमुळे देशभरातील हजारो इच्छुक मुस्लिम बांधवांना अर्ज सादर करण्याची संधी मिळेल आणि अधिकाधिक भाविकांना हज यात्रेत सहभागी होता येईल, असेही खासदारांनी अल्पसंख्यांक कार्य मंत्री मा. किरेन रिजिजू सांगण्यात आले.यावेळी केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्री किरेन रिजिजू या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

## तलाठ्याची कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

**चांदूरबाजार/वार्ताहर**



तलाठी हा महसूल प्रशासनाचा कणा व गावातील शेवटचा घटक. त्यामुळे तलाठी हा प्रशासनाच्याच नव्हे तर, नागरिकांच्या ही सदैव नजरेच्या टप्प्यात असतो.त्यामुळे महसूल प्रशासनाच्या कामाचा आवाका पाहता,तलाठ्यांचा साहित्याशी संपर्क येणे दुरापास्तच. मात्र चांदूरबाजार तालुक्यातील एका तलाठ्याने,हा साहित्य कलेचा छंद जोपासला. तलाठ्यांच्या या साहित्य छंदाचे मोल विद्यापिठाने जाणले.तालुक्यातील या तलाठ्याची 'खापराच्या पाटीवर' या कवितेचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे.ही बाब महसूल प्रशासनाच्या शिरोपेचात मानाचा तुरा रोवणारी ठरली आहे.

सदर साहित्य लेखक व कवी हे मागिल १२ वर्षा पासून, अमरावती जिल्ह्यात तलाठी म्हणून कार्यरत आहेत.महसूल विभागातील या साहित्यिक कवीचे नाव किशोर जर्हाड असे आहे. तलाठी कवी जर्हाड यांचे 'मातीचा गंध' व 'पेरण', हे दोन कविता संग्रह चांगलेच गाजले आहेत.त्याच्या 'पेरण' या कविता संग्रहातील 'खापराच्या पाटीवर' या कवितेचा , डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे. ही कविता बी.ए.तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या,अभ्यासासाठी ठेवण्यात आली आहे.कवी जर्हाड हे अमरावतीच्या, परिवर्तन प्रबोधिनीचे आजिव सदस्य आहेत.त्यांचे शब्द मेळ , शब्दानंद, शब्द ब्रम्ह,शब्द शिल्प इत्यादी कविता संग्रह ही प्रसिध्द आहेत.जर्हाड यांना साहित्य क्षेत्रातीले पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच अनेक राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे सुत्रसंचलन ही त्यांनी केले आहे.तर शेष मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही त्यांनी भूषविले आहे.आज ही आपला कार्यभार सांभाळून कविता लेखन,गझल लेखन, ललित लेखन,रेखाटन व चित्रकलेचा छंद जोपासतात.विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात कवितेचा समावेश झाल्या बद्दल महसूल विभागासह, प्राचार्य डॉ.शोभा रोकडे,प्रा.डॉ.सुखदेव ढाकणे,प्रा.डॉ.अशोक हजारे,प्रा.डॉ.लक्ष्मण महाडिक,प्रा.प्रशांत मोरे,खलील मोमीन,शिवा प्रधान, ॲड.निता कचवे, गीतकार बाबासाहेब सौदागर, कांचन उल्हे, विशाल मोहोड, विशाल कन्हेरकर,परेश धर्माळे , नितीन भट, संदीप देशमुख,आरती नागापूरे व आबासाहेब कडू इत्यादी मान्यवरांनी जर्हाड यांचे अभिनंदन केले.

# भर पावसात शेकडो युवकांचा मोर्चा धडकला तहसील कार्यालयावर

## विद्यार्थ्यावरील लाठी हल्ल्याचा केला निषेध

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नीट पेपर फुटी प्रकरणातील दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी दिल्लीतील जंतर मंतर येथे शांततेच्या मार्गाने होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला केंद्र सरकारने पोलिसीबळाचा वापर करून विद्यार्थ्यावर लाठीहल्ला केला. या घटनेच्या निषेधार्थ स्थानिक युवक कृती समितीच्या वतीने तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढून केंद्र सरकारच्या विरोधात प्रचंड नारेबाजी करण्यात आली.

नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर,शिवसेना उबाठाचे प्रकाश मारोटकर काँग्रेसचे अमोल धवसे,एस एफ आय चे राजगुरू शिंदे यांच्या संयुक्त नेतृत्वात शेकडो युवकाचा मोर्चा भर पावसात तहसील कार्यालयात धडकून युवक कृती समितीच्या वतीने तहसीलदार यांचे मार्फत राष्ट्रपती यांना मागणीचे निवेदन पाठवण्यात आले.तरुणांनी तिरंगा महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले शहीद भगतसिंग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर हातात घेऊन लॉन्ग मार्च काढून नायब तहसीलदार देशपांडे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी निवेदन देताना नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर,बाळासाहेब राणे,डॉ प्रमोद कठाळे माकपचे श्याम शिंदे, शेख मोसिन, काँग्रेसचे शेख हरून, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रेम शिंदे, न.प. सभापती वासुदेव लोखंडे, कांता लोमटे, मो रियाज, निलेश इखार, नितीन दुधे, किशोर शिंदे, सुरज अंभोरे, वैष्णवी देवळे, सपना वानखडे, गौरी मोकळेकर, अभिषेक चवाळे, तुषार लायबर, शेख मोनू शेख अझहर, सुमित गुरमुळे, ऋषिकेश चांदुरकर, मयूर सोनोने, यश मारबदे, सुजल चव्हाण, भागवत लाहे, मनोज ढोके, गुणवंत चांदूरकर, भास्कर काळे, विशाल शिंदे, भावेश भांबुरकर, शुभम रावेकर, सुमित लोमटे, अक्षय हिवराळे यांचे सह शेकडो युवक उपस्थित होते






पोलीस आयुक्त वाहतूक अमरावती शहरातर्फे 'हेल्मेटची सवय लावा, सुरक्षीत आयुष्य जगा' याबाबत जनजागृती करण्यात येत असून आज २४ जुलैपासून सर्वत्र हेल्मेटची सक्ती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेली जनजागृती रॅली.

# धारणी-चिखलदऱ्यात शासकीय बांधकामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

## मस्टर क्लर्कअभावी देखरेख व्यवस्था कमकुवत

**मेळघाट/प्रतिनिधी**

धारणी आणि चिखलदरा तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर रस्ते, शासकीय इमारती, दुरुस्ती आणि विविध विकासकामे सुरू असतात. मात्र या कामांवर प्रत्यक्ष देखरेख ठेवणाऱ्या मस्टर क्लर्कची कमतरता असल्याने शासकीय बांधकामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

एकेकाळी प्रत्येक कनिष्ठ अथवा सहाय्यक अभियंत्याच्या अधिपत्याखाली मस्टर क्लर्क कार्यरत असत.संबंधित अभियंत्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध कामांच्या ठिकाणी जाऊन कामाची पाहणी करणे, मजुरांची हजेरी नोंदविणे आणि प्रत्यक्ष कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे, अशी महत्त्वाची जबाबदारी मस्टर क्लर्क पार पाडत होते. त्यामुळे अभियंता प्रत्येक वेळी कामाच्या ठिकाणी उपस्थित नसला तरी कामावर विभागाची देखरेख कायम राहत होती.मात्र सध्या धारणी-चिखलदरा परिसरात अनेक अभियंते कार्यरत असतानाही त्यांच्या सहाय्यासाठी पुरेशा प्रमाणात मस्टर क्लर्क उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. दुर्गम आणि विस्तीर्ण मेळघाट परिसरात एकाच वेळी अनेक ठिकाणी विकासकामे सुरू असतात. अशा परिस्थितीत एका अभियंत्याला प्रत्येक कामाच्या ठिकाणी नियमित उपस्थित राहणे शक्य होत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष देखरेखीतील ही पोकळी कामाच्या गुणवत्तेवर परिणाम करणारी ठरत असल्याची चर्चा आहे.

पूर्वी मस्टर क्लर्क नियमितपणे कामांच्या ठिकाणी जाऊन पाहणी करत असल्याने कामातील त्रुटी वेळीच निदर्शनास येत होत्या. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांच्या दर्जाचे कौतुकही केले जात होते. मात्र सध्याच्या परिस्थितीत मस्टर क्लर्कची पदे रिक्त असल्याने किंवा आवश्यक नियुक्त्या न झाल्याने प्रत्यक्ष देखरेख करणारी यंत्रणा कमकुवत झाल्याचे दिसून येत आहे.विशेषतः रस्त्यांच्या कामांबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. नवीन रस्ते तयार झाल्यानंतर सुरुवातीला ते चांगले दिसतात; मात्र काही ठिकाणी अवघ्या एक-दोन महिन्यांतच रस्त्यांची खडी उखडणे, पृष्ठभाग खराब होणे आणि रस्त्यांची दुरवस्था सुरू होणे अशा तक्रारी समोर येत आहेत. लाखो-कोट्यवधी रुपयांचा शासकीय निधी खर्च करून उभारण्यात येणारी कामे अल्पावधीत खराब होत असतील, तर संबंधित कामांच्या गुणवत्तेची तपासणी आणि प्रभावी देखरेख होणे आवश्यक आहे.

धारणी आणि चिखलदरा हे भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण आणि दुर्गम तालुके आहेत. एका अभियंत्याकडे अनेक कामांची जबाबदारी असल्यास प्रत्येक ठिकाणी सतत उपस्थित राहणे व्यावहारिकदृष्ट्या कठीण आहे. त्यामुळे अभियंत्यांच्या सहाय्यासाठी प्रत्यक्ष कामांवर लक्ष ठेवणाऱ्या मस्टर क्लर्कची आवश्यकता अधिक महत्त्वाची ठरते.शासनाने प्रत्येक सहाय्यक अथवा कनिष्ठ अभियंत्याच्या कार्यक्षेत्रासाठी आवश्यकतेनुसार मस्टर क्लर्कची नियुक्ती करावी, रिक्त पदे तातडीने भरावीत आणि धारणी-चिखलदरा परिसरातील सुरू असलेल्या शासकीय विकासकामांवर प्रभावी देखरेख व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

मेळघाटसारख्या दुर्गम भागाच्या विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र हा निधी खर्च करून उभारण्यात येणारी कामे टिकाऊ आणि दर्जेदार असणेही तितकेच आवश्यक आहे. प्रत्यक्ष देखरेखीअभावी कामांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असेल, तर त्याची दखल शासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे.आता धारणी-चिखलदरा परिसरातील मस्टर क्लर्कच्या रिक्त पदांबाबत शासन आणि प्रशासन कोणती भूमिका घेते आणि शासकीय बांधकामांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रत्यक्ष देखरेख व्यवस्था मजबूत करते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# लोकशाहीतील प्रश्नांना उत्तर हवे दडपशाही नव्हे !



**युवकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून किंवा त्यांना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय मानून समस्या सुटणार नाहीत. त्यांना ऐकून घेणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि त्यांच्या भविष्याविषयी विश्वास निर्माण करणे ही कोणत्याही लोकाभिमुख शासनाची खरी ओळख आहे.**

✍ **प्रा. डॉ. प्रशांत विघे**

लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा दिवस नाही; ती प्रत्येक नागरिकाच्या आवाजाचा सन्मान करणारी जीवनपद्धती आहे. एखादा विद्यार्थी रस्त्यावर उतरतो, एखादा युवक हातात फलक घेऊन न्यायाची मागणी करतो किंवा एखादा नागरिक सरकारला प्रश्न विचारतो, तेव्हा तो लोकशाहीविरोधात नव्हे, तर लोकशाहीवरील आपल्या विश्वासाची साक्ष देत असतो. पण त्या आवाजाला उत्तर संवादाने मिळण्याऐवजी दडपशाहीने मिळू लागले, तर लोकशाहीचा आत्माच जखमी होतो. दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपरफुटी आणि कथित परीक्षा गैरव्यवहारांविरोधात २८ जून २०२६ पासून सुरू झालेल्या आंदोलनाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या बेमुदत उपोषणापासून सुरू झालेल्या या आंदोलनाने लाखो विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता व्यक्त केली. जंतर-मंतर ते संसद मोर्चा, आंदोलक आणि पोलिस यांच्यातील संघर्ष, त्यानंतरचे आरोप-प्रत्यारोप आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ केलेले आंदोलन या सर्व घटनांनी एक मूलभूत प्रश्न पुन्हा समोर आणला आहे. नागरिकांच्या प्रश्नांना सरकार संवादातून उत्तर देणार की शक्तीच्या वापरातून? विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा ते सत्ता उलथवण्यासाठी नव्हे; तर आपले भविष्य वाचवण्यासाठी उतरतात. त्यांच्या हातात दगड नसतात, तर स्वप्ने असतात. त्यांच्या डोळ्यांत संतापापेक्षा अधिक असते ती अन्यायाविरुद्ध न्यायाची अपेक्षा. शिक्षण आणि रोजगार हे केवळ धोरणांचे विषय नाहीत; ते प्रत्येक कुटुंबाच्या आशा-आकांक्षांशी जोडलेले असतात. अशा वेळी सरकारकडून अपेक्षा असते ती विश्वासाची, संवादाची आणि पारदर्शकतेची परंतु अस होण्याऐवजी आंदोलनादरम्यान पोलिसांकडून लाठीचार्ज, अश्रुधुराचा वापर आणि आंदोलकांना ताब्यात घेतल्याच्या बातम्या समोर आल्या.

दुसरीकडे, पोलिसांनी दगडफेक झाल्याचा आणि अनेक कर्मचारी जखमी झाल्याचा दावा केला. सत्य नेमके काय आहे, हे निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीतूनच स्पष्ट होऊ शकते. जर आंदोलन हिंसक झाले असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे; जर शांततामय आंदोलनावर अनावश्यक बळाचा वापर झाला असेल, तर त्याचीही तितकीच कठोर चौकशी झाली पाहिजे. लोकशाहीत शक्तीचा वापर हा शेवटचा पर्याय असतो; पहिला पर्याय नेहमी संवादाचाच असतो.या आंदोलनात विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन केले. या घटनेवर राजकीय मतभेद असू शकतात; परंतु संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे मूलभूत कर्तव्य म्हणजे जनतेच्या प्रश्नांना आवाज देणे, सरकारला जाब विचारणे आणि सत्तेला उत्तरदायी ठेवणे. विरोधी पक्षाचा आवाज दाबला गेला, तर लोकशाहीतील संतुलनच धोक्यात येते.

लोकशाहीत सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट, टीका ही लोकशाहीला अधिक सक्षम करणारी शक्ती आहे. सशक्त विरोधी पक्ष, स्वतंत्र प्रसारमाध्यमे, सक्रिय न्यायव्यवस्था आणि जागरूक नागरिक हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. यांपैकी कोणताही स्तंभ कमकुवत झाला, तर लोकशाहीचा संपूर्ण पाया हादरू शकतो. म्हणून सरकारने टीकेला वैर म्हणून नव्हे, तर लोकांचा अभिप्राय म्हणून स्वीकारले पाहिजे.नीट परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील कथित अनियमिततेमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतरही जर परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहत असेल, तर तो केवळ एका विद्यार्थ्याचा पराभव नसतो; तो संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वासाचा पराभव असतो. हा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी सरकारने पारदर्शक चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित परीक्षा प्रणाली आणि विद्यार्थ्यांशी सातत्यपूर्ण संवाद यांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

लोकशाहीची खरी ताकद पोलिसांच्या लाठ्यांमध्ये नसते; ती नागरिकांच्या विश्वासात असते. कायदा-सुव्यवस्था राखणे सरकारचे कर्तव्य आहे; परंतु नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करणे हेही तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे. संवादाऐवजी संघर्ष, उत्तराऐवजी मौन आणि विश्वासाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला, तर लोकशाहीचा आत्माच क्षीण होतो.

आज भारतासमोर उभे असलेले आव्हान केवळ एका आंदोलनाचे नाही; ते लोकशाही संस्कृती अधिक परिपक्व करण्याचे आहे. युवकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून किंवा त्यांना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय मानून समस्या सुटणार नाहीत. त्यांना ऐकून घेणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि त्यांच्या भविष्याविषयी विश्वास निर्माण करणे ही कोणत्याही लोकाभिमुख शासनाची खरी ओळख आहे.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततामय आंदोलन आणि सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला आहे. या अधिकारांचे रक्षण करणे ही केवळ न्यायालये किंवा विरोधी पक्षांची जबाबदारी नाही; ती सर्वप्रथम सत्ताधाऱ्यांची घटनात्मक जबाबदारी आहे.आज देशाला संघर्षापेक्षा संवादाची गरज आहे. दडपशाहीपेक्षा उत्तरदायित्वाची गरज आहे. आरोप-प्रत्यारोपांपेक्षा विश्वास पुनर्स्थापित करण्याची गरज आहे. कारण लोकशाही सत्ता टिकवून ठेवण्याने महान होत नाही; ती नागरिकांचा विश्वास जिंकून महान बनते. हा विश्वास जपण्यासाठी सरकार, विरोधी पक्ष, विद्यार्थी, माध्यमे आणि प्रत्येक नागरिकाने संविधानाच्या मूल्यांप्रती निष्ठा, संवादाची संस्कृती, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. तेव्हाच भारतीय लोकशाही अधिक सशक्त, संवेदनशील आणि खऱ्या अर्थाने जनाभिमुख बनेल हे मात्र निश्चित!

सिनेट सदस्य, संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ, अमरावती
मो. ९३२६८७७७४९

# आषाढी वारी एकतेचे प्रतीक!

✍ **प्रदीप मोरे**

हिंदू धर्मातील धार्मिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या सर्वात महत्त्वाच्या एकादशींपैकी एक असलेल्या आषाढी एकादशीचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसा अवघा महाराष्ट्र पांडुरंगाच्या भक्तीने न्हाऊन निघाला असून 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या जयघोषाने जागोजागी आसमंत दुमदुमून गेला आहे. आषाढी वारी ही केवळ एक धार्मिक यात्रा नसून ती आपल्या महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचे एक सुंदर प्रतीक आहे. ऊन, वारा, पाऊस कशाचीही पर्वा न करता लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे पायी मार्गक्रमण करतात. शिस्त, सेवाभाव आणि परस्परांवरील प्रेम शिकवणाऱ्या या वारीत श्रीमंत-गरीब, जाती-पातीचे सर्व भेद गळून पडतात आणि मागे उरतात ते फक्त पाठीवर विठूनामाची पताका, हातात टाळ आणि गळ्यात तुळशीची माळ घेऊन पंढरीच्या दिशेने आनंदयात्रा करणारे विठुरायाचे लाडके वारकरी! अनेक भाविकांना प्रत्यक्ष वारीत जाण्याचा योग येत नसला तरी टीव्ही, वृत्तपत्रे व सोशल मीडियासारख्या विविध प्रसारमाध्यमांतून सातत्याने होणाऱ्या वारी दर्शनामुळे एक वेगळाच आध्यात्मिक आनंद मिळतो. रिंगण सोहळा, संतांच्या पालख्या आणि वारकऱ्यांचा उत्साह घरबसल्या डोळ्यांत साठवता येतो. याबद्दल सर्व प्रसारमाध्यमांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

# अमेरिकेतील गोल्डन गेट ब्रिजवर झळकला मराठमोळा साज

## *अमरावतीच्या पूजाने जपली नऊवारीची शान*

अमरावतीची कन्या आणि सध्या कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे वास्तव्यास असलेल्या डिजिटल कंटेंट क्रिएटर पूजा देशमुख यांनी अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या गोल्डन गेट ब्रिजवर पारंपरिक मराठी नऊवारी साडी परिधान करून केलेल्या फोटोशूटमधून मराठी संस्कृतीचा अभिमान जगासमोर मांडला आहे.

अमेरिकेत वास्तव्यास असूनही मराठी संस्कृती, परंपरा, सण-उत्सव आणि भारतीय जीवनशैली यांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी पूजा देशमुख सातत्याने मराठी भाषेत सोशल मीडियावर कंटेंट तयार करतात. अवघ्या सात महिन्यांत त्यांनी Instagram वर १८००० हून अधिक फॉलोअर्स मिळवले असून त्यांच्या व्हिडिओंना लाखो व्ह्यूज मिळत आहेत.गोल्डन गेट ब्रिजवर नऊवारी साडीत केलेल्या फोटोशूटने अनेक विदेशी पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले. अनेकांनी पारंपरिक मराठी वेशभूषेबद्दल उत्सुकता व्यक्त करत तिचे कौतुक केले.'आपण जगात कुठेही राहत असलो तरी आपल्या संस्कृतीची ओळख अभिमानाने जपली पाहिजे. नऊवारी साडी ही केवळ वेशभूषा नसून ती आपल्या परंपरेचा आणि मराठी अस्मितेचा अभिमान आहे,' असे पूजा देशमुख यांनी सांगितले.

या फोटोशूटला सोशल मीडियावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेकांनी 'परदेशातही मराठी संस्कृतीचा झेंडा उंचावला' अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. अमरावतीची ही कन्या डिजिटल माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे कार्य करत असल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**छायाचित्र: कॅलिफोर्नियातील गोल्डन गेट ब्रिजवर पारंपरिक नऊवारी साडीत पूजा देशमुख आणि आरती देशमुख .**

## देख भाई देख ..!

पडद्या मागील राजकारण
नेहमी असते धोक्याचं

मग ते वांगचुक असो
की प्रकरण पक्ष फोडीचं!

कधी असते मस्ती
कधी असते सत्ती


ऐनकेन प्रकारे स्वतःची
करुन घेती ईच्छापुर्ती..!

दान पेट्यांवर दरोडा
पेपर फुटीला उधाण
धकधकतोय ज्वालामुखी

वेळीच व्हायला
हवे सावधान..!

**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# आषाढीच्या वारीतून विश्वकल्याणाचा संदेश देणारे पसायदान




✍ **रमा देशमुख**

आषाढी एकादशी म्हणजे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक संस्कृतीचा एक अत्यंत महत्त्वाचा दिवस. या दिवसाची चाहूल लागली की संपूर्ण महाराष्ट्राला पंढरीच्या वारीचे वेध लागतात. टाळ-मृदंगाचा गजर, मुखी विठ्ठलाचे नामस्मरण, भगव्या पताका,संतांच्या अभंगांनी दुमदुमणारे भक्तिमय वातावरण लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने चालत जातात आणि आपल्या लाडक्या विठुरायाच्या चरणी नतमस्तक होतात.आषाढीची वारी ही केवळ पंढरपूरला जाणारी यात्रा नाही, तर ती भक्ती, श्रद्धा, प्रेम, सेवा आणि एकात्मतेचा महान सोहळा आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज संत जनाबाई तसेच इतर संतांनी चालवलेला वारसा आजही लाखो लोकांना प्रेरणा देतो.याच संतपरंपरेतील संत ज्ञानेश्वर महाराजांनी दिलेले पसायदान म्हणजे संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना आहे.आषाढी एकादशीच्या निमित्ताने जेव्हा आपण विठ्ठलनामाचा गजर करतो,संतांचे अभंग म्हणतो आणि वारकरी संप्रदायाच्या या महान परंपरेचे स्मरण करतो,तेव्हा पसायदानातील विश्वकल्याणाचा संदेशही तितक्याच भावनेने समजून घेणे गरजेचे आहे.ज्ञानेश्वर महाराजांचे पसायदान म्हणजे भगवद्गीतेच्या १८ अध्यायांतील ७०० श्लोकांचा आणि सुमारे ९००० ओव्यांचा काढलेला भावार्थ आहे.'पसाय' म्हणजे प्रसाद.हा प्रसाद त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी विश्वात्मक देवाजवळ मागितला. म्हणूनच पसायदान ही केवळ एक प्रार्थना नाही, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा आणि आदर्श समाजनिर्मितीचा ठेवा आहे

'आता विश्वात्मके देवे' असे म्हणत माऊली विश्वात्मक देवाकडे साकडे घालतात. या प्रार्थनेत त्यांनी सर्वप्रथम मागितले..'जे खळांची व्यंकटी सांडो'दुष्ट प्रवृत्तींचा नाश व्हावा, पण माणसाचा नव्हे; माणसातील वाईट वृत्ती बदलाव्यात, अशी करुणामय भावना या ओळीत व्यक्त होते. आजच्या काळातही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. व्यक्तीला वाईट ठरवून दूर करण्याऐवजी त्याच्यातील वाईट प्रवृत्ती दूर व्हाव्यात, त्याच्या मनात चांगुलपणा निर्माण व्हावा, अशी माऊलींची व्यापक आणि मानवतावादी दृष्टी आहे.पुढे 'तया सत्कर्मी रती वाढो' असे सांगून, चांगल्या कर्मांमध्ये गोडी वाढावी, अशी प्रार्थना केली आहे. कारण सद्कर्मांची आवड वाढली की दुष्कर्म आपोआप कमी होतात, हे माऊली अधोरेखित करतात. समाजात चांगुलपणा वाढवण्यासाठी केवळ वाईट गोष्टींचा विरोध पुरेसा नसतो; तर चांगल्या विचारांची आणि चांगल्या कर्मांची आवड निर्माण होणे आवश्यक असते.

'भुता परस्परे जडो' या शब्दांत सर्व जीवांमध्ये परस्पर प्रेम,आपुलकी व मैत्री निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.आजच्या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे.स्वार्थ, स्पर्धा आणि मतभेद वाढत असताना माऊलींचा हा संदेश आपल्याला परस्पर प्रेम, सहकार्य आणि एकात्मतेची आठवण करून देतो.आषाढीच्या वारीत या एकात्मतेचा अनुभव प्रत्यक्ष जाणवतो. विविध जाती, भाषा, वय आणि सामाजिक स्तरातील लोक एकाच भगव्या पताकेखाली एकत्र येतात. पुढे माऊली म्हणतात 'दुरितांचे तिमिर जाओ, विश्वस्वधर्म सूर्ये पाहो' या ओळीतून अज्ञान, पाप आणि वाईट प्रवृत्तींचा अंधार दूर होऊन स्वधर्माच्या सूर्यप्रकाशाने जग उजळावे, अशी इच्छा प्रकट होते. अज्ञानाचा अंधार दूर झाला, विवेक जागृत झाला आणि प्रत्येकाने आपले कर्तव्य व धर्म जाणून आचरण केले, तर समाजात निश्चितच प्रकाश निर्माण होऊ शकतो.'जो जे वांछील तो ते लाहो प्राणी जात' म्हणत प्रत्येक प्राण्याच्या योग्य इच्छा पूर्ण व्हाव्यात, अशी माऊलींची भावना आहे. प्रत्येक जीवाला सुख, समाधान आणि सुरक्षित जीवन लाभावे, ही या प्रार्थनेमागील व्यापक भावना आहे.तर 'वर्षत सकळ मंगळी, ईश्वरनिष्ठांची मांदिआळी' या ओळीतून संपूर्ण जगात कल्याण आणि मांगल्याचा वर्षाव करणारे ईश्वरनिष्ठ समाज निर्माण व्हावा, अशी प्रार्थना केली आहे. ईश्वरनिष्ठ व्यक्ती म्हणजे केवळ धार्मिक विधी करणारी व्यक्ती नव्हे, तर सत्य, प्रेम, करुणा, सेवा आणि सदाचार यांचा आचरण करणारी व्यक्ती होय. अशा व्यक्तींची मांदियाळी निर्माण झाली, तर समाजात निश्चितच सकारात्मक परिवर्तन घडू शकते.

पसायदानात माऊली कल्पवृक्ष, चिंतामणी, अमृत, चंद्र व सूर्य यांची रूपके वापरून आदर्श समाजाचे चित्र रेखाटतातजिथे लोक एकमेकांची चिंता दूर करणारे, मधुर बोलणारे, तेजस्वी पण तापहीन, आणि परस्परांचे सज्जन व सोयरे असतात. अशा समाजात द्वेषाला, मत्सराला आणि वैराला स्थान नसते. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्याच्या सुखात आपले सुख पाहते आणि दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होते.शेवटी 'किंबहुना सर्व सुखी पूर्ण होणे' असे म्हणत तीनही लोकांत सुखी व परिपूर्ण समाज निर्माण व्हावा, अशी सर्वसमावेशक अपेक्षा व्यक्त केली आहे. माऊलींच्या पसायदानाची हीच सर्वात मोठी विशेषता आहे की, त्यात केवळ स्वतःच्या सुखाची किंवा स्वतःच्या कुटुंबाच्या कल्याणाची मागणी नाही. संपूर्ण समाज, सर्व जीव आणि संपूर्ण विश्व सुखी व्हावे, अशी व्यापक प्रार्थना आहे.आषाढी एकादशीच्या निमित्ताने आपण पंढरीच्या विठ्ठलाचे स्मरण करतो, संतांच्या पालख्यांना नमन करतो आणि भक्तीच्या या महान परंपरेचा अनुभव घेतो. मात्र या भक्तीचा खरा अर्थ आपल्या आचरणात उतरवणेही तितकेच आवश्यक आहे. आपल्या मनातील दुरितांचा अंधार दूर करणे, सत्कर्मांची आवड वाढवणे, इतरांशी प्रेमाने वागणे, गरजूंना मदत करणे आणि सर्वांच्या कल्याणाची भावना मनात ठेवणेहीच माऊलींच्या पसायदानाला खरी आदरांजली ठरेल.आषाढीची वारी आपल्याला पंढरीच्या दिशेने घेऊन जाते; पण पसायदान आपल्याला अंतर्मनाच्या दिशेने घेऊन जाते.

वारीच्या पावलांमध्ये भक्ती आहे, विठ्ठलनामात श्रद्धा आहे आणि पसायदानाच्या प्रत्येक ओळीत संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची भावना आहे. म्हणूनच या आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वावर आपण विठ्ठलाकडे केवळ स्वतःसाठी काही मागण्याऐवजी माऊलींच्या शब्दांत संपूर्ण विश्वाच्या सुखाची प्रार्थना करूया.

# आषाढी एकादशी विठुरायाचे पंढरपूर आणि वारी

✍ **माधवी पत्की**

आषाढी एकादशी म्हटले की डोळ्यासमोर येते ती पंढरपूरची वारी. आषाढ महिन्याच्या शुक्लपक्षातील एकादशीला 'देवशयनी एकादशी' म्हणतात. या एकादशीपासून देवनिद्रा घेतात म्हणून देवशयनी एकादशी म्हणतात. हे विष्णू व्रत आहे. या दिवशी उपास करून तुळशी मंजिरी वाहून विष्णुपूजन करायचे असते.



याच एकादशीच्या निमित्ताने महाराष्ट्राचे आदि दैवत पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्त वारी करतात. युगे अठ्ठावीस विटेवरी उभा असणाऱ्या विठ्ठलासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भक्त, वारकरी त्याच्या ओढीने तहानभूक विसरून वारीने पंढरपूरला जातात.

अदृश्य असणाऱ्या भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर. वैकुंठाच्या आधीपासूनच पंढरपूर अस्तित्वात आले .त्यामुळे पृथ्वीवरील सर्वात पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. नामदेव महाराज आपल्या अभंगात सांगतात 'जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर'. पंढरपुरात विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे.

वारकरी संप्रदायाचे मूळ नवनाथ संप्रदायात आहे. गहिनीनाथांचे शिष्य संत निवृत्तीनाथ आणि त्यांचे शिष्य श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची निर्मिती करून भागवत धर्माची भगवी पताका रोवली आणि समाजात भागवत धर्माचा प्रसार, प्रचार करण्यासाठी नाम दिंडीची अर्थात पंढरीच्या वारीची प्रथा चालू केली. त्यांच्या नंतरच्या संतांनी आणि भक्तांनी ही प्रथा आजतागायत चालू ठेवली, नव्हे त्या नाम दिंडीचे, वारीचे एका मोठ्या भक्ती सागरात रूपांतर झाले.

विठुरायाच्या नाम गजरात निघणाऱ्या पंढरपूरच्या वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांचे तन-मन-धन सर्वकाही देवाच्या चरणी अर्पण होत असते.या वारीत स्त्री-पुरुष,लहान मुले, वृद्ध यांचा सहभाग असतो. विठुरायाला भेटण्याची ओढ एवढी तीव्र असते की पायी चालण्याचा थकवा त्यांना जाणवतच नाही. स्वतःतील 'मी' पणा सोडून 'विठ्ठलमय' होणे म्हणजे काय! ते वारीकडे बघितल्यावर लक्षात येते. इतके चैतन्य या विठ्ठल भक्तीने त्यांच्यात आलेले असते. आळंदी आणि देहू येथील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वैभवच.ती शिस्तबद्ध वारी, ते भजन-कीर्तन,तो ध्यास,ते रिंगण हे एकदा तरी याची डोळा बघावे.तो भक्तीचा महासागर पाहून आपण त्यात कधी चिंब भिजतो, हे कळत देखील नाही.

संत नामदेव महाराज म्हणतात,'पृथ्वीवरील एकाही तीर्थाला पंढरपूरची सर नाही'.संत चोखामेळा यांनी म्हटले की,काशीच्या पाच यात्रा, द्वारकेच्या तीन यात्रा या दोन्हींचे जेवढे पुण्य होते ते एका पंढरीच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळीचे माहेरघर असल्यानेच...

अवघी दुमदुमली पंढरी..
भगव्या पताका खांद्यावरी..
तुळशी वृंदावन डोक्यावरी..
भाव भुकेल्यांची ही वारी...

असे म्हटले जाते. ते उगाच नव्हे.पांडुरंगाच्या या वारीतील पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शिस्त.प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगव्या पताकाधारी वारकरी, मागे तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशी सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यास लयबद्ध असतो. अगदी टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने असले तरीही. ऊन पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ मृदुंगाचा गरज करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचे मूर्तिमंत प्रतिकच. कुणाच्याही चेहऱ्यावर चिंता नाही, थकवा नाही, मुक्कामाच्या ठिकाणांची, तेथील सोयी सुविधांची अपेक्षा नाही, दहा ते वीस किलोमीटर पर्यंत पायी वाट रोजचीच. रात्री मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर भोजन झाल्यावर परत भजन कीर्तन होऊन त्या दिवसाची सांगता. पुन्हा सकाळी तीच ओढ. जय जय पांडुरंग हरी..

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला जिल्हा विशेष

# विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर अकोला बंद; शहर थांबले, अत्यावश्यक सेवा मात्र सुरू

## वंचित बहुजन आघाडीच्या हाकेला जिल्ह्यात प्रतिसाद; एसटी सेवा विस्कळीत, दाणा बाजारात व्यापारी–आंदोलक आमनेसामने

■ प्रतिनिधी | अकोला ■

**दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस लाठीचार्जच्या निषेधार्थ व केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला गुरुवारी अकोला जिल्ह्यात लक्षणीय प्रतिसाद मिळाला. शहरातील प्रमुख बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये आणि अनेक व्यावसायिक प्रतिष्ठाने दिवसभर बंद राहिल्याने शहराचा वेग मंदावला. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरही बंदचा परिणाम झाला. मात्र रुग्णालये, मेडिकल, पेट्रोल पंप, भाजी बाजार यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू राहिल्याने नागरिकांची मोठी गैरसोय टळली.**



बंदच्या पार्श्वभूमीवर पहाटेपासूनच शहरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. संवेदनशील चौक, प्रमुख बाजारपेठा आणि बसस्थानक परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्यात आली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासन सतर्क होते.

### शांतता रॅलीतून व्यापाऱ्यांना आवाहन

वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातून शांतता रॅली काढत व्यापाऱ्यांना स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांवरील कथित अन्यायाच्या निषेधार्थ समाजातील सर्व घटकांनी एकजूट दाखवावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. अनेक व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली, तर काही ठिकाणी व्यापार सुरू असल्याचेही चित्र दिसून आले. आंदोलनादरम्यान शासकीय विश्रामगृह परिसरात जमलेल्या काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. मात्र पोलिसांच्या मध्यस्थीने परिस्थिती नियंत्रणात आली आणि कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

### विविध संघटनांचा पाठिंबा

या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), अखिल भारतीय छावा संघटना, सकल कुंभार समाज विकास परिषद, सम्राट अशोक प्रतिष्ठान, महाराष्ट्र शेतकरी संघटना, युवा समिती अकोला जिल्हा, बौद्ध समाज संघर्ष समिती, संभाजी ब्रिगेड, सैनिक फेडरेशन, भारतीय माजी सैनिक संघटना, डाटा संघटना, असंघटित कामगार संघटना यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी पाठिंबा दिला. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे आणि महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष आम्रपाली खंडारे यांच्या नेतृत्वाखाली बंदचे नियोजन करण्यात आले.

### ग्रामीण बससेवा ठप्प; प्रवाशांचे हाल

महाराष्ट्र बंदचा सर्वाधिक फटका राज्य परिवहन महामंडळाच्या ग्रामीण बससेवेला बसला. तालुक्यांमधून अकोल्याकडे येणाऱ्या सकाळच्या बहुतांश बसफेऱ्या दुपारपर्यंत बंद राहिल्या. त्यामुळे कामानिमित्त शहरात येणाऱ्या शेकडो प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अकोला बसस्थानकावर नेहमी दिसणारी प्रवाशांची गर्दी आणि बसची वर्दळ गुरुवारी लक्षणीयरीत्या कमी होती. लांब पल्ल्याच्या काही बसेस सुरू असल्या तरी ग्रामीण मार्गांवरील वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली होती. ऑटो-रिक्षा सेवा सुरू असल्याने काही नागरिकांनी पर्यायी प्रवासाचा मार्ग स्वीकारला.

### दाणा बाजारात शाब्दिक खडाजंगी

बंदच्या पार्श्वभूमीवर आंदोलनकर्ते दाणा बाजारात पोहोचले आणि व्यापाऱ्यांना दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. काही व्यापाऱ्यांनी त्यास प्रतिसाद दिला; मात्र काहींनी दुकाने सुरूच ठेवल्याने दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक वाद निर्माण झाला. 'विद्यार्थ्यांप्रती आमची सहानुभूती आहे; पण दुकान बंद ठेवल्याने प्रश्न सुटणार आहे का?' असा प्रश्न काही व्यापाऱ्यांनी उपस्थित केला. त्यावर आंदोलनकर्त्यांनी, 'हा केवळ राजकीय नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या न्यायाचा प्रश्न आहे. प्रतीकात्मक बंदला पाठिंबा द्या,' असे सांगत व्यापाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले. काही काळ वातावरण तापले असले तरी पोलिसांच्या उपस्थितीत वाद निवळला.

### शहराचा वेग मंदावला; जीवनावश्यक सेवा कायम

बंदमुळे शहरातील शैक्षणिक संस्था, बाजारपेठा आणि सार्वजनिक वाहतुकीवर परिणाम झाला. मात्र रुग्णालये, औषधांची दुकाने, पेट्रोल पंप, दूध वितरण, भाजी बाजार यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू राहिल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधातून पुकारलेल्या या बंदने अकोल्यात राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले.

बंदला अनेक संघटनांचा पाठिंबा मिळाल्याने आंदोलनाची व्याप्ती वाढली, तर कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यात पोलिस यंत्रणेला यश आले. महाराष्ट्र बंदच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापल्याचे चित्र अकोल्यात पाहायला मिळाले.


## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११२३/२०२६ — प्रोसेस नं.९२८६/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २१/०७/२०२६

**अर्जदार :** १. नरेंद्र तेजराव मुरूमकार, रा. जुने गावठाण शिवर, पोस्ट ऑफिस जवळ, अकोला. २. शिधुताई तेजराव मुरूमकार, रा. जुने गावठाण शिवर, पोस्ट ऑफिस जवळ, अकोला. ३. भाग्यश्री अरविंद वैराळे, रा. कातखेड उमरा, पो. उमरा, ता. जि. अकोला. ४. अश्विनी तेजराव मुरूमकार, रा. जुने गावठाण शिवर, पोस्ट ऑफिस जवळ, ५. दिपाली तेजराव मुरूमकार, रा. जुने गावठाण शिवर, पोस्ट ऑफिस जवळ, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तेजराव किसनराव मुरूमकार
**पत्ता :-** रा. शिवर अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तेजराव किसनराव मुरूमकार यांचे दि. १५/०५/२०२६ रोजी सर्पण हॉस्पीटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/१८९/२०२६
ज्योती गजानन चांदुरकर लग्नानंतर ज्योती विजय बहिर्डे वि. निल
पुढिल तारिख : २१-०९-२०२६

**अर्जदार :** १. ज्योती गजानन चांदुरकर (लग्नाआधीचे नाव) वय अं ४८वर्ष धंदा घरकाम ज्योती विजय बहिरडे (लग्ना नंतरचे नाव) रा. १९ नं. शाळेजवळ महाकाली नगर, लोकमान्य नगर, जुने शहर अकोला ता.जि. अकोला २. संगिता गजानन चांदुरकर (लग्नाआधीचे नाव) वय अं ४५वर्ष धंदा घरकाम संगिता रमेश कौसकर (लग्ना नंतरचे नाव) रा. रौंदळा. ता. अकोट जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत शशिकलाबाई गजानन लोकमान्य चांदुरकर ही दिनांक २७.०७.२०१७ रोजी रा. रा. १९ नं. शाळेजवळ महाकाली नगर, नगर, जुने शहर अकोला ता.जि. अकोलायेथे मरण पावली. तसेच मयत दिलीप गजानन चांदुरकर हे दिनांक १०.१०.२०२४ रोजी मरण पावले. मयत गजानन पुंजाजी चांदुरकर हे दिनांक ०५.०८. २०१२ रोजी रा. हाता ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मय्यत शशिकलाबाई गजानन चांदुरकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय,निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीला मार्फत दिनांक २१/०९/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २१.०७.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना ह्या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार सचिन विठ्ठलराव साखरकर आणी वर्षा सचिन साखरकर, रा राऊत वाडी, अकोला, ता. जी. अकोला यांनी श्रीराम बिल्ड्कोन तर्फे भागीदार १. अभय प्रभाकर बिजवे २. सचिन सुहास कोकाटे ३. आदित्य अभय बिजवे यांच्याशी त्यांच्या मालकीचे व ताब्यातील खालील वर्णनाचा प्लॉट विकत घेण्याचा सौदा केला आहे ज्याचे वर्णन खालीलप्रमाण आहे : मौजे उमरी चे कक्षेतील प्लॉट क्र. ८, शेत सर्वे क्र. ८+१३, (७/१२ प्रमाणे भूमापन क्र. ८/१३/अ/८,) ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३१६० स्क्रे फुट, (२९३ स्के मीटर) ज्यास चतु:सिमा - पुर्वेस - सर्विस लेन पश्चिमेस - सरकारी रस्ता उत्तरेस - पाठक यांचे घर व दक्षिणेस – श्री. हिंगे यांचे घर येणेप्रमाणे वरील वर्णनाची मिळकत त्यात येणार्या सर्व तदंगभुत वस्तुसह, झाडाझुडपांसह, दगडमातीसह, वहिवाटीच्या संपुर्ण हक्कासह व सर्व अधिकारासह आमचे पक्षकार यांनी विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. वरील स्थावर कोणाचाही

कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, ताबा, इसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आमच्याकडे लेखी कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वरील वर्णनाच्या मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणताही व कसल्याही प्रकारचा उजर किंवा वाद चालणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

अकोला
दि. २२/०७/२०२६

**पक्षकाराकरिता अधिवक्ता**
**( ॲड. अजय वा. गोडे )**
मो. ९४२०७१२०८८, ९१७५९३८२४२


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, विलास मनोहर अनासाने रा. मु. रामदासपेठ अकोला, ता., जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की त्यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. ५२१३ /२००२ दिनांक १८/१२/२००२ या क्रमाकाचे मूळ खरेदी खत क्षेरोक्स काढनेकारिता स्टेशन रोड अकोला येथे गेले असता तेथील परिसरा मध्ये दि. ११/०६/२०२६ ला कुठेतरी गहाळ झाले आहे. या बाबत ची तक्रार विलास मनोहर अनासाने यांनी पो. स्टेशन रामदास पेठ येथे दि. ०१/०७/२०२६ रोजी दिली आहे. विलास मनोहर अनासाने यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- नझुल प्लॉट क्र. ५, नझुल शीट क्र. ६२ - बी, कसबे - अकोला, ता. जी. अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ ४४९.६७ चौ. मीटर, ज्याचे चातुर्सिमा – पूर्वेस - सरकारी रस्ता, पश्चीमेस - भिकुलाल नंदलाल माधानी यांचे घर, उत्तरेस- सरकारी रस्ता, दक्षिणेस - सर्विस लेन या वर्णनाची मालमत्ता विलास मनोहर अनासाने यांचे मालकीची आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून विलास मनोहर अनासाने हे पूनावाला फाईनकॉर्प ली. कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :- २३/०७/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क. २३ – ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, ता. जि. अकोला,
मो.क्र. ९१७५९३८२४२.

## जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे प्रदीप तुकाराम मांगुळकर, रा. नया अंदुरा, ता. बाळापुर, जि. अकोला यांच्या मालकीचे व ताब्यातील मालमत्ता जिचे वर्णन - मौजे कारंजा रमजानपुर ग्रामपंचायत हद्दीतील, ता. बाळापुर, जि. अकोला येथील प्लॉट क्र. १७, गट क्र. ३०३, ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३९३ सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ ३९२.०० चौ.मिटर पैकी २५४.०० चौ.मिटर प्लॉट व त्यावरील बांधकामासहीत ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस अमोल साबळे यांची जागा; पश्चिमेस – रस्ता ; उत्तरेस - सरदार व ईतर यांची जागा; दक्षिणेस - सैवाल यांची जागा या प्रकारे आहेत. वर नमूद मालमत्ता आमचे पक्षकार यांनी अमोल महादेवराव साबळे व अमोल आनंद वानखडे यांचे कडून नोंदणीकृत खरेदीखत क्र. २३१०/२०१८ दि. ११/१२/२०१८ नुसार खरेदी केली आहे. सदर मालमत्तेचे खरेदीखत करतेवेळी आमचे पक्षकार यांनी वर नमूद मालमत्तेचे यापूर्वीचे मालक अमोल महादेवराव साबळे यांनी वर नमुद २५४.०० चौ. मिटर प्लॉट पैकी १०८.०० चौ.मिटर प्लॉट खरेदी करतांना रविंद्र जनार्दन घंगाळे यांचेकडून करून घेतलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. ९५४/२०१४ दि. ३०/०४/२०१४ व अमोल आनंद वानखडे यांनी वर नमुद २५४.०० चौ. मिटर प्लॉट पैकी १४६.०० चौ.मिटर प्लॉट खरेदी करतांना रविंद्र जनार्दन घंगाळे यांचेकडून करून घेतलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. ९५३/२०१४ दि. ३०/०४/२०१४ ताब्यात घेतले होते. सदर मुळ खरेदीखत हे आमचे पक्षकार यांचे ताब्यातुन आजरोजी गहाळ झालेले आहे. अनेक ठिकाणी शोध घेऊनही सदर दस्तऐवज सापडले नाहीत. वर नमुद मालमत्ता तसेच गहाळ झालेले वर नमुद मुळ खरेदीखत कोण्याही बँकेकडे, वित्तीय कंपनी अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोजा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास किंवा इतर कोणतीही भानगड असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता हि बिनबोजा, बिनभानगडीचे असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कुणाची काहीही हरकत आमचे पक्षकारावर लागु व बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर गहाळ झालेले मुळ खरेदीखत कुणासही सापडले असता त्यांनी खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. २२/०७/२०२६.

**ॲड. सा. दा. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव
मो. ९७३०८२९९२८

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**एन. एस. बारी यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/१५६/२०२६
समिउल्ला खान न्याझदार खान वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. समिउल्ला खान न्याजदार खान वय अं ६८वर्ष धंदा मजुरी रा. अमन नगर, पारस ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत न्याजदार खान महेबूब खान तसेच मयत हे दिनांक २७.०१.२००६ रोजी रा पारस ता.बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. सुभान बी न्याजदार खान ही दिनांक २७.०९.२०१७ मरण पावली. वरील नमुद अर्जदार हे मय्यत न्याजदार खान महेबूब खान व मयत सुभान बी न्याजदार खान यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक १२/०८/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईले. करीता आज दिनांक २९.०६.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०६६/२०२६ — प्रोसेस नं.९१३३/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ — दिनांक : १८/०७/२०२६

**अर्जदार :** अर्जदार :- १. राजु त्र्यंबक मोहोड मो. क्र. ९१५८२२८१२२ २. ईश्वर त्र्यंबक मोहोड दोघे रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : त्र्यंबक संपत मोहोड
**पत्ता :-** रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत त्र्यंबक संपत मोहोड यांचे दि. १८/०६/२०२६ रोजी राहत्या घरी, डोंगरगाव, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# अकोटमध्ये बंदला संमिश्र, मुंडगावात शंभर टक्के प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोट ■



### वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र बंदचे शहर-ग्रामीण भागात वेगवेगळे चित्र; देवरी फाट्यावर रस्तारोको, पोलिसांचा चोख बंदोबस्त

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला अकोट तालुक्यात संमिश्र प्रतिसाद मिळाला. अकोट शहरात सकाळच्या सत्रात काही काळ बाजारपेठा बंद राहिल्या; मात्र दुपारनंतर बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने सुरू झाल्याने जनजीवन पूर्वपदावर आले. दुसरीकडे ग्रामीण भागात बंदला अधिक उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः मुंडगाव येथे व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत बंदला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

अकोट शहरात सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र आले. घोषणाबाजी करत व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सुरुवातीला अनेक व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली. मात्र दुपारनंतर बहुतांश दुकाने सुरू झाल्याने बाजारपेठेत पुन्हा वर्दळ वाढली आणि खरेदी-विक्री नियमित सुरू झाली. शहरातील शाळा व महाविद्यालयांचे कामकाजही दोन्ही सत्रांत सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले.

ग्रामीण भागात मात्र बंदचा प्रभाव अधिक जाणवला. देवरी फाटा येथे आंदोलनकर्त्यांनी रस्तारोको आंदोलन केल्याने अकोट–अकोला मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. पोलिसांनी हस्तक्षेप करून वाहतूक सुरळीत केली. तसेच वरूळ-जऊळका, अडगाव खुर्द, कुटासा, सावरा आदी गावांमध्येही व्यापाऱ्यांनी बंदला प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली.

### मुंडगावात उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंडगाव येथे बंदला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला. दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बंदमध्ये लहान चहाच्या टपऱ्यांपासून भाजीपाला विक्रेते, पानटपऱ्या तसेच किराणा व कापड व्यावसायिकांनीही स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांना शांततेच्या मार्गाने बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने गावातील मुख्य बाजारपेठ दिवसभर बंद राहिली. काही शैक्षणिक संस्थाही बंद असल्याचे दिसून आले. पालकांनी विद्यार्थ्यांना शाळेतून परत बोलावल्याची माहितीही समोर आली. नेहमी गजबजलेला मुख्य चौक दिवसभर ओस पडल्याचे चित्र होते. काही विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदवत घोषणाबाजी केली. तसेच नीट परीक्षा प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

बंदच्या पार्श्वभूमीवर अकोट शहरासह तालुक्यात पोलिसांनी विशेष बंदोबस्त तैनात केला होता. संवेदनशील ठिकाणी फिक्स पॉइंट बंदोबस्त ठेवण्यात आला होता, तर पेट्रोलिंग पथकांकडून दिवसभर परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात आले. मुंडगाव परिसरात हिवरखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बंदोबस्त सांभाळला. एकूणच शहरात बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला असला, तरी ग्रामीण भागात विशेषतः मुंडगावसह अनेक गावांमध्ये बंदला अधिक उत्स्फूर्त आणि प्रभावी प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र बंदला मूर्तिजापुरात प्रतिसाद

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटी प्रकरणाविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ?ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला गुरुवारी मूर्तिजापूर शहरात चांगला प्रतिसाद मिळाला. व्यापारी, लहान व्यावसायिक, विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग नोंदविला. तुरळक घटना वगळता बंद शांततेत पार पडला.



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून मोर्चाला प्रारंभ झाला. मोर्चात वंचित बहुजन आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी, युवक आघाडी, बौद्ध महासभा, सम्यक विद्यार्थी आंदोलन तसेच शिवसेना (उबाठा) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मोर्चा रेल्वे स्टेशन, पोळा चौक, जयस्तंभ चौक, मुख्य बाजारपेठ, भगतसिंग चौक, राष्ट्रीय महामार्ग मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचला. दरम्यान, बसस्थानकासमोर एसटी बस रोखून आंदोलकांनी ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातही काही काळ ठिय्या आंदोलन करण्यात आले. त्यामुळे काही वेळ वाहतुकीवर परिणाम झाला. परिस्थिती लक्षात घेऊन राज्य परिवहन महामंडळाने काही काळ शहरातील एसटी बससेवा तात्पुरती स्थगित ठेवली. बंदला व्यापाऱ्यांनी पूर्वीच पाठिंबा जाहीर केल्याने शहरातील बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने बंद होती. मात्र, काही ठिकाणी दुकाने सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मोर्चातील काही संतप्त कार्यकर्त्यांनी एका-दोन दुकानांमध्ये तोडफोड केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आणि प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचले. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. संबंधित पक्षांमध्ये सामोपचाराने चर्चा झाल्यानंतर वाद मिटविण्यात आला. त्यामुळे पुढील अनुचित प्रकार टळला आणि बंद शांततेत पार पडला.

# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज विरोधात हिवरखेड कडकडीत बंद

**हिवरखेड :** दिल्ली येथे जंतर मंतर वर सुरु असलेल्या आंदोलनात आंदोलक विध्यार्थ्यांवर केलेल्या अमानुष लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी २३ जुलै रोजी पुकारलेल्या महाराष्ट्र बंद आवाहनाला हिवरखेड येथे अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अगदी छोट्या छोट्या चहाच्या टपऱ्या, भाजीपाला विक्रेते, पानपट्टी पासून तर मोठमोठया किराणा व कापड



दुकानदारांनी सुद्धा या बंद मध्ये सहभागी होऊन जंतर मंतर वरील जखमी विध्यार्थ्यां प्रति आपल्या संवेदना या बंदच्या माध्यमातून व्यक्त केल्या. वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक नेते सुनिल इंगळे, नरेश बांगर, पुरुषोत्तम राजनकार यांच्यासह त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी सर्व व्यापारी बंधूना शांततापूर्ण व नम्रपणे निवेदन देऊन या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते त्याला हिवरखेड येथील सर्व व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बंद ठेऊन प्रतिसाद दिला. या बंदचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक शैक्षणिक संस्था सुद्धा बंद होत्या. पालकांनी शाळेतून आपल्या पाल्याला परत बोलावले. हिवरखेडच्या नेहमी गजबजलेल्या असलेल्या मुख्य बाजारपेठेत शुकशुकाट दिसत होता. काही विध्यार्थी व विध्यार्थिनींनी जंतर मंतर वर विध्यार्थ्यांना झालेल्या मारहाणी बाबत तीव्र शब्दात आपला संताप व्यक्त करून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी निट पेपर फुटीची जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा अशी मागणी करत इन्कलाब जिंदाबादच्या घोषणा दिल्या. बंद दरम्यान ठाणेदार सचिन पाटील यांनी सगळीकडे चोख बंदोबस्त ठेवला.


## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे विनोद मधुकर जाधव यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन:** मौजे - पांगरताटी वसाली, नमुना ८ मालमत्ता क्रं. १९/२ याचे एकूण क्षेत्रफळ ३२६ चौ. फुट., सिटी सर्वे क्रं. १०९ नुसार एकूण क्षेत्रफळ ४३.२४ चौ. मीटर. ता. पातुर जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे विनोद मधुकर जाधव यांना वारसाने - वडिलोपार्जित मिळालेली आहे. तसेच वरील नमूद मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण-बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता Piramal Finance ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार रीतसर खरेदी खत नोंदणीकृत करून सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना देत आहे.

ठिकाण- तालुका पातुर आणि जिल्हा अकोला
दि. २३/०७/२०२६

**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५

# तीन दिवसांतच 'पेट्रोल बचती'चा फुगा फुटला

## मंत्र्यांच्या ताफ्यात पुन्हा गाड्यांची भर , पालकमंत्री यांच्या ताफ्यातील वाहनांची कपातही पूर्ववत

**वर्धा/ रवींद्र लाखे**

राज्य सरकारने पेट्रोल बचत, सरकारी खर्चात कपात आणि काटकसरीचा संदेश देण्यासाठी मंत्र्यांच्या ताफ्यातील शासकीय वाहनांची संख्या कमी करण्याचा निर्णय नुकताच घेतला होता. या निर्णयानुसार अनेक मंत्र्यांप्रमाणेच वर्धा येथील पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्याही कमी करण्यात आली होती. मात्र अवघ्या तीन दिवसांतच पुन्हा पूर्वीप्रमाणे वाहनांची व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून येत असल्याने सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पेट्रोल बचतीचा संदेश देत सरकारने हा निर्णय मोठ्या गाजावाजात जाहीर केला. मात्र इतक्या कमी कालावधीतच वाहनांचा ताफा पुन्हा पूर्ववत झाल्याने हा निर्णय केवळ प्रसिद्धीपुरता होता का, अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. सरकारी खर्चात बचत करण्याचा दावा करणाऱ्या सरकारने तीन दिवसांतच माघार का घेतली, याबाबत कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही

एका बाजूला सामान्य नागरिकांना इंधन बचतीचे धडे दिले जात आहेत. महागाईमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडले असताना काटकसर करण्याचे आवाहन केले जाते. दुसऱ्या बाजूला मंत्र्यांच्या ताफ्यात पुन्हा वाहनांची वाढ



झाल्याने सरकारच्या कृती आणि घोषणांमध्ये विसंगती असल्याची भावना व्यक्त होत आहे

विशेष म्हणजे, वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या ताफ्यातील वाहनांची कपातही या निर्णयांतर्गत करण्यात आली होती.

मात्र तीन दिवसांतच ती पूर्ववत झाल्याने वर्धा जिल्ह्यातही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू आहे. 'जर वाहनांची कपात तात्पुरतीच करायची होती, तर निर्णय घेण्यामागचा नेमका उद्देश काय होता?' असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

सरकारने या निर्णयामागील वस्तुस्थिती स्पष्ट करून वाहनांची संख्या पुन्हा का वाढविण्यात आली, याचे कारण जाहीर करावे, अशी मागणी होत आहे. अन्यथा 'जनतेसाठी काटकसर आणि मंत्र्यांसाठी पुन्हा ऐशआराम' अशी टीका अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

**जनतेला उपदेश, स्वतः पाषाण**

पेट्रोल वाचवा, काटकसर करा, सरकारी खर्च कमी करा, असा उपदेश सरकारकडून सातत्याने जनतेला केला जातो. महागाईच्या झळा सहन करणाऱ्या नागरिकांना बचतीचे धडे दिले जातात.

मात्र हेच तत्त्व मंत्र्यांच्या बाबतीत लागू होताना दिसत नाही, अशी चर्चा रंगली आहे.

मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करून सरकारने काटकसरीचा संदेश दिला. पण अवघ्या तीन दिवसांतच ताफे पुन्हा पूर्ववत झाल्याचे चित्र समोर आल्याने हा निर्णय केवळ दिखावा होता का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जर काटकसर इतकीच तात्पुरती होती, तर घोषणांचा गाजावाजा कशासाठी, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

जनतेसाठी बचतीचा उपदेश आणि सत्ताधाऱ्यांसाठी अपवाद, अशी भावना आता अधिक तीव्र होत आहे.

सरकारने एक सांगायचे आणि दुसरेच वागायचे, ही दुटप्पी भूमिका लोकांच्या नजरेतून सुटलेली नाही. त्यामुळे आता नागरिकांच्या तोंडी एकच वाक्य ऐकू येत आहे. जनतेला उपदेश... आणि स्वतः पाषाण.

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ सिंदीत सर्वपक्षीय मोर्चा



**सिंदी रेल्वे/ जनमाध्यम**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज आणि अश्रुधुराच्या वापराच्या निषेधार्थ सिंदी शहरात सर्वपक्षीय शांतता मोर्चा काढण्यात आला. बाजार चौकातून निघालेल्या मोर्चात विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. तानाशाही नाही चालणार, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.मोर्चेकऱ्यांनी पोलिस ठाण्यात जाऊन ठाणेदार नरेंद्र निस्वादे यांना दोन निवेदने सादर केली. पहिल्या निवेदनात जंतर-मंतर येथील घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या अधिकाराचे संरक्षण करावे तसेच त्यांना न्याय द्यावा,अशी मागणी करण्यात आली.

दुसऱ्या निवेदनात वर्धा जिल्ह्यातील रोठा येथील अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार व हत्येप्रकरणी जलदगतीने तपास पूर्ण करून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवावा, आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी आणि पीडित कुटुंबाला शासनाने सर्वतोपरी मदत करावी, अशी मागणी करण्यात आली.या मोर्चात ॲड. झाडे,नगरसेवक देवतळे,अजय कलोडे,शरद तळवेकर, गंगाधर कलोडे,तुषार हिंगणेकर,ज्बोरकर,बोंबले,ज्योत्स्ना तडस, दुर्गा बेलखोडे, अमोल बोंगाडे,गुल्लू भन्साली,मुन्ना शुक्ला, कैलास पालीवाल, मोहन सुरकार,मुन्ना पालीवाल, गुड्डू कुरेशी,बबलू खान,रामेश्वर घंगारे,अवी मुठाळ,राणा,बंटी बेलखोडे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक,समाजसेवक व विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले.

# उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून 'विकसित महाराष्ट्र'च्या ध्येयाला बळ - मुख्यमंत्री

**मुंबई/ जनमाध्यम**

राज्य शासनाच्या सर्वसमावेशक विकासाच्या धोरणाला उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रभावी साथ लाभत असून, शासन आणि उद्योग क्षेत्राच्या भागीदारीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होत असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अशा उपक्रमांमुळे 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या ध्येयाला बळ मिळेल, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की,उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून आरोग्य, पोषण, जलसुरक्षा, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि शालेय पायाभूत सुविधांमध्ये सातत्याने काम होत असून,ग्रामीण नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत. मोंडेलेज इंडियाच्या 'शुभ आरंभ' उपक्रमांतर्गत गेल्या १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ आणि खेड तालुक्यातील ६० गावांमध्ये विविध विकासकामे राबविण्यात आली आहेत.

या उपक्रमांतर्गत ५० हेल्थ अँड वेलनेस सेंटरचे आधुनिकीकरण करण्यात आले असून, सुमारे ३.२ लाख नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे. ॲनिमिया मुक्त भारत अभियानांतर्गत हजारो महिलांची तपासणी करून उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांना विशेष उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आली.ग्रामीण क्रीडा विकासासाठी 'स्पोर्ट्स फॉर एक्सलन्स' उपक्रमातून सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, मुलींचा सहभाग जवळपास ५० टक्के आहे. शाळांमध्ये आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा, स्वच्छतागृहे, संरक्षक भिंती आणि सौरऊर्जा प्रकल्प उभारून मूलभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात आली आहे.

# देवाभाऊंच्या वाढदिवसानिमित्त ५६वृक्षांची लागवड

**सिंदी रेल्वे/ जनमाध्यम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष सिंदी शहर मंडळाच्या वतीने वृक्षारोपणाचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. प्रभाग क्रमांक ७ मधील नगर परिषद बालोद्यानासह शहरातील विविध ठिकाणी विविध प्रजातींची ५६ वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष राणी कलोडे यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. भाजपाचे शहराध्यक्ष अमोल गवळी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या



## पर्यावरण संवर्धनाचा संदेश

वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबविण्याची परंपरा कायम ठेवण्यात आल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला ओमप्रकाश राठी, सुधाकर घवघवे, स्नेहल कलोडे, नगर परिषद उपाध्यक्ष अकिल शेख, गटनेते प्रवीण मडावी, सभापती योगिता जांभूतकर, राजश्री बोरीकर, नगरसेविका ऐश्वर्या गवळी, इंदुताई कस्तुरे, चेतना बडवाईक, भाजपा महामंत्री मोहम्मद इम्रान, गणेश काळबांडे तसेच रामेश्वर घंगारे, दत्तू काळबांडे, विनायक सोनटक्के, किशोर बोरकर, अक्षय डफ, आकाश गवळी, किरण गवळी, दीक्षा काळबांडे, अविनाश गवळी यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर वृक्षांच्या संवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्पही उपस्थितांनी केला.


## उपवनसंरक्षक, वर्धा वनविभाग, वर्धा यांचे कार्यालय

पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या पाटीमागे, सिव्हील लाईन वर्धा, दुरध्वनी क्रं ०७१५२ - २४०१७०
Email Id-dyefwardha@mahaforest.gov.in/ dyefwardha@gmail.com

जा.क्र.. कक्ष- ३/योजना/ १००९/२०२६-२७ — वर्धा दिनांक २३/०७/२०२६

### सन २०२६-२७ ई-निविदा जाहिरात क्रं (२)

महाराष्ट्र शासनाचे सा.बा. विभागाचे पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडुन ''ब'' विवरणपत्रा प्रमाणे ई-निविदा प्रपत्रात उपवनसंरक्षक वर्धा वनविभाग, वर्धा यांचे अधिनस्त वनपरिक्षेत्रातील खालील प्रमाणे असलेल्या कामाच्या टक्केवारी ई-निविदा पध्दतीच्या माध्यमातुन ई-निविदा आमंत्रीत करित आहेत. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदासह दिनांक २५/०७/२०२६ पासून ते ०१/०८/२०२६ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

| अ. क्रं | जिल्हा | विभाग | वनपरिक्षेत्र | कामाचे नाव | कामांची किंमत | कंत्राटदार चा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | वनविभाग वर्धा | वर्धा | वनपरिक्षेत्र वर्धा, मौजा सेलुकाटे, सर्व्हे क्रं १६३/२ येथील आंबा रोपे लागवड पुर्व पावसाळी रोपवन क्षेत्रात Fix Knot Fencing उभारणे कामाबाबत | १५४७७०४ | खुला वर्ग |
| २ | वर्धा | वनविभाग वर्धा | वर्धा | वनपरिक्षेत्र वर्धा, मौजा सेलुकाटे, सर्व्हे क्रं १६३/२ येथील मिश्र रोपे लागवड पुर्व पावसाळी रोपवन क्षेत्रात Fix Knot Fencing उभारणे कामाबाबत | १५४७७०४ | |
| ३ | वर्धा | वनविभाग वर्धा | वर्धा | वनपरिक्षेत्र वर्धा, मौजा आलोडी, सर्व्हे क्रं ७१ येथील पुर्व पावसाळी रोपवन क्षेत्रात Fix Knot Fencing उभारणे कामाबाबत | १२५५८०५ | |
| | एकूण | | | | ४३५१२१३ | |

### -: ई-निविदा प्रसिध्दीचा तपशिल :-

| अ.क्रं | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन निविदा प्रसिद्ध करणे | २५/०७/२०२६ | दुपारी ३.०० वा. |
| २. | ऑनलाईन निविदा सादर करणे | २५/०७/२०२६ | दुपारी ३.०० वा. पासुन |
| ३. | ऑनलाईन निविदा बंद होण्याची तारीख | ०१/०८/२०२६ | दुपारी ३.०० वा |
| ४. | ऑनलाईन निविदा उघडणे | ०३/०८/२०२६ | दुपारी ३.०० वा |

उपवनसंरक्षक वर्धा
वनविभाग, वर्धा

क्र. जिमाका-वर्धा/ ८४/२०२६-२७


# वेगाच्या बेफिकीरीने घरांचे दिवे विझतात



## जीवन वाचवण्यासाठी वाहतूक नियम पाळा;रियाज खान यांचे चालकांना आवाहन

**वर्धा/ जनमाध्यम**

रस्त्यावरचा एक क्षणाचा निष्काळजीपणा संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो. अपघात टाळण्यासाठी प्रत्येक चालकाने वाहतूक नियमांचे पालन करणे हीच काळाची गरज असल्याचा भावनिक संदेश परिवहन समितीच्या वतीने आयोजित जनजागृती कार्यशाळेत देण्यात आला.

केसरीमल कन्या शाळा,वर्धा येथे ऑटो रिक्षा, व्हॅन व स्कूल बस चालक-मालकांसाठी आयोजित कार्यशाळेत वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, वाहन वेगाने चालवण्याची घाई करू नका.

आपले जीवन अनमोल आहे. हा मानव जन्म पुन्हा नाही. वेग, निष्काळजीपणा आणि नियमांकडे दुर्लक्ष यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असल्याचे सांगत त्यांनी सुरक्षित वाहनचालनेचे महत्त्व पटवून दिले.

वर्धा जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या आदेशानुसार ही कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी चालकांना वाहतूक नियमांचे पालन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आणि अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवास मिळावा यासाठी चालकांनी कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये, तसेच अमली पदार्थांपासून कायम दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या घनिष्ठा बुरुटकर होत्या.

परिवहन समितीचे सदस्य बाळू उमाटे यांच्यासह सुमारे ३५ ते ४० ऑटो रिक्षा, व्हॅन व स्कूल बस चालक-मालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गीता यांनी केले.




## महागडी दुचाकी चोरट्याने पळविली

**वर्धा -** शहरातील लक्ष्मीनगर परिसरात भरदिवसा महागडी दुचाकी चोरीला गेल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागपूर येथील प्रल्हाद गजभे यांच्या नावावर नोंद असलेली एमएच-४९ बीए-७८२३ क्रमांकाची दुचाकी डॉ. गणेश प्रल्हाद जवादे हे वर्ध्यात वापरत होते. त्यांच्या बेद ले-आऊट येथील निवासस्थानाच्या आवारातून अज्ञात चोरट्याने ही दुचाकी लंपास केली. चोरीचा प्रकार लक्षात येताच परिसरात शोधाशोध करण्यात आली; मात्र वाहनाचा मागमूस लागला नाही. याप्रकरणी डॉ. जवादे यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिस तपास सुरू असून वाहनचोरांच्या वाढत्या धाडसामुळे नागरिकांनी वाहनांच्या सुरक्षेबाबत अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

## शेतीच्या वादातून पुतण्याकडून हल्ला

**आष्टी -** शेतीच्या मालकीच्या वादाने नातेवाईकांतील तणाव टोकाला पोहोचल्याची घटना आष्टी तालुक्यातील बेलोरा येथे घडली. शेतीच्या वाटणीवरून झालेल्या वादातून पुतण्याने काकाला लाकडी दांड्याने मारहाण करून जखमी केल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली आहे. जखमी हुशेन शहा रहीम शहा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, घरासमोरील झाडाखाली बसले असताना शौकत शहा याने अधिक शेती घेतल्याचा आरोप करत वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करून लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात हुशेन शहा जखमी झाले. तक्रारीच्या आधारे आष्टी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. शेतीच्या वादातून रक्ताच्या नात्यांमध्ये निर्माण झालेली कटुता पुन्हा एकदा समोर आली आहे.

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

**वडनेर -** येथील संविधान चौकात भरधाव ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. या अपघातामुळे काही काळ परिसरात वाहतूक विस्कळीत झाली होती. जखमी रविंद्र दिवे यांना स्थानिकांच्या मदतीने तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर ट्रक चालकाविरुद्ध संताप व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. जखमीच्या तक्रारीवरून टीएन-६० बीएक्स-६३२९ क्रमांकाच्या ट्रक चालकाविरुद्ध वडनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचे नेमके कारण तपासले जात असून भरधाव वाहनचालकांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## दारूसाठी पैसे न दिल्यास तिघांकडून मारहाण

**वर्धा -** जिल्ह्यात दारूबंदी असतानाही अवैध दारू विक्रीमुळे गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. जुनापाणी चौक परिसरात दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या किरकोळ कारणावरून तिघांनी एका मजुराला काठी व बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. श्याम सुधाकर सोनवणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आधी पैशांवरून वाद झाला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अनिल पाटील, मम्या डोंगरे व संजय डोंगरे यांनी त्यांना घरासमोर अडवून बेदम मारहाण केली. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रामनगर पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दारूबंदीच्या अंमलबजावणीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## हुंड्यासाठी रुसला नवरदेव

**वर्धा -** हुंड्याच्या हव्यासापोटी ऐन लग्नाच्या दिवशी नवरदेवाने मंडपात न येत विवाह मोडल्याची धक्कादायक घटना हिंगणघाट येथे उघडकीस आली आहे. मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून नवरदेव राहुल थुटे आणि त्याचा भाऊ अरविंद थुटे यांच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, साक्षगंधानंतर दोघांनी १० लाख रुपये रोख आणि ८० ग्रॅम सोन्याची मागणी केली. वधूपक्षाने असमर्थता दर्शविल्यानंतर विवाहाला नकार देण्यात आला. लग्नाची सर्व तयारी पूर्ण असूनही नवरदेव वऱ्हाडासह मंडपात पोहोचलाच नाही. या प्रकारामुळे वधूपक्षाला आर्थिक व मानसिक मोठा धक्का बसला असून पोलिसांनी हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## क्षुल्लक कारणावरून हल्ला

**वर्धा -** सावंगी (मेघे) येथील तक्षशिलानगर परिसरात क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर थेट मारहाणीत झाले. किरकोळ बाचाबाचीदरम्यान एका व्यक्तीने लाकडी बॅटने हल्ला करून हर्षल भोजराज बन्सोड यांना जखमी केल्याची घटना समोर आली आहे. जखमींनी सावंगी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदविली. त्यानुसार लल्ला बोंमले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन तपास सुरू केला असून वादाचे नेमके कारण शोधले जात आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २३७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल-** atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# वंचित आघाडीच्या बंदला दर्यापूरात उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यार्थ्यांसह शेकडो नागरिकांची उपस्थिती

**खल्लार/प्रतिनिधीः-** दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस अत्याचाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने दिलेल्या महाराष्ट्र बंदला दर्यापूर शहरात गुरुवारी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वंचित बहुजन आघाडीचे अमरावती (पश्चिम )जिल्हाध्यक्ष संजय चोरपगार यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडले. शहरातील नागरिक, विद्यार्थी, महिला, युवक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आंदोलनाला भक्कम पाठिंबा दिला.



बंदच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच दर्यापूर शहरातील मुख्य बाजारपेठ, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच विविध व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या होत्या. शहरातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदला प्रतिसाद दिल्याने संपूर्ण शहरात बंद यशस्वी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.आंदोलनाची सुरुवात गांधी चौक येथून करण्यात आली. हातात संविधान, लोकशाही आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांसंदर्भातील फलक घेत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत शहरातून भव्य मोर्चा काढला. मोर्चामध्ये युवक, महिला, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांचीही उपस्थिती होती. 'जय भीम, जय संविधान', 'विद्यार्थ्यांवरील अन्याय बंद करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.मोर्चादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी दर्यापूर पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी संपूर्ण मोर्चावर बारकाईने लक्ष ठेवत शांततेत आंदोलन पार पाडण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. ांततापूर्ण मार्गाने निघालेल्या या मोर्चाची सांगता तहसिल कार्यालय येथे करण्यात आली. यावेळी शासनाच्या नावाने तहसिल प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांवरील कथित अत्याचाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संविधान आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

> दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय हा केवळ विद्यार्थ्यांवरील हल्ला नसून तो संविधान, लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर झालेला आघात आहे. वंचित बहुजन आघाडी अन्यायाविरोधातील लढा सातत्याने लढत राहील. दर्यापूरच्या नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी, युवकांनी, विद्यार्थ्यांनी आणि सर्व समाजघटकांनी महाराष्ट्र बंदला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी जनतेची जागरूकता दर्शवणारा आहे. शांततेच्या मार्गाने झालेल्या या आंदोलनात सहभागी झालेल्या प्रत्येक नागरिकाचे आभार अन्यायाविरोधातील आमचा संघर्ष यापुढेही अधिक ताकदीने सुरू राहील.
>
> -संजय चोरपगार,अमरावती जिल्हाध्यक्ष (पश्चिम),
> वंचित बहुजन आघाडी

# भाजप महिला मोर्चाचा अभिनव उपक्रम देवाभाऊ कृषी माऊली सोहळा

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवस निमित्त आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे लोकप्रिय, जनसेवक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, महाराष्ट्र भाजप महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून दि. २२ जुलै २०२६ रोजी अमरावती येथे मोर्शी ग्रामीण जिल्हा भाजपा महिला मोर्चाच्या वतीने महिला मोर्चा प्रभारी आरती राजेश वानखडे यांचे नेतृत्वात 'देवाभाऊ माऊली सन्मान सोहळा' उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमामध्ये अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील एकल महिला तसेच आपल्या कष्ट, जिद्द आणि अथक परिश्रमांच्या बळावर शेती सांभाळत कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पार पाडणाऱ्या शेतकरी महिला भगिनींचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना कृषी किट प्रदान करण्यात आले.

यावेळी माती परीक्षण व आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शन प्रा. जितेंद्र दुर्गे यांनी केले.तसेच



आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विनम्र श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.

या कार्यक्रमास तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे, नवनियुक्त विधान परिषद आमदार प्रवीण पोटे, महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवाणी, धामणगाव रेल्वे नगर परिषदेच्या नगराध्यक्षा अर्चना रोटे (अडसड), सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वसुधा बोंडे, छाया दंडाळे, सुनील वऱ्हाडे, विवेक गुल्हाने, नगरसेवक चेतन पवार तसेच भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हा, तालुका व शहरातील सर्व पदाधिकारी, तालुका अध्यक्षा, जिल्हा कार्यकर्त्या, सामाजिक कार्यकर्त्या वर्षा वऱ्हाडे व मनीषा गुल्हाने यांची मान्यवर उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन प्रा. शीतल गणोरकर यांनी केले, तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोर्शी जिल्हा ग्रामीण च्या अध्यक्षा अनिता तिखिले व मेळघाट ग्रामीण अध्यक्षा प्रियंका मालठाणे यांचे सह त्यांचे शक्ती महिला भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोलाचे सहकार्य केले.

# विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदगावात डाव्या आघाडीची जोरदार निदर्शने

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचाराच्या निषेधार्थ तसेच विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी डावी आघाडी व वंचित बहूजन आघाडीचे वतीने नांदगाव शहरात जोरदार निदर्शने करण्यात आली. वंचित व भारतीय कम्युनिस्ट पक्ष , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला समर्थन देत मोर्चा काढून तहसीलदार यांना निवेदन दिले.

यावेळी डाव्या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोर्चा काढून विद्यार्थ्यांवरील लाठीचाराचा तीव्र निषेध केला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने सकारात्मक चर्चा करून तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना आपल्या मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार असून, त्यांच्या या अधिकारांचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली.

मोर्चातील बसस्थानक परिसरात डाव्या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात आणि विद्यार्थ्यांवरील दडपशाहीच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांवरील लाठी हल्ल्याचा निषेध असो, भारतीय संविधान जिंदाबाद, भाजप हटाव देश बचाव, शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्या अशा घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर डाव्या आघाडीच्या शिष्टमंडळाने तहसीलदार यांच्यामार्फत राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले.




निवेदन देतेवेळी भाकपचे जिल्हा सचिव कॉ. सुनिल मेटकर, तालुका सचिव कॉ. संतोष सुरजुसे , माकपचे तालुका सचिव कॉ .श्याम शिंदे, वंचितचे तालुका अध्यक्ष रोशण गाडेकर, भाकपचे विनोद तरेकर, नारायणराव भगवे ,संजय मंडवधरे ,जया मंडवधरे, हरिदास देशमुख, हरिदास राजगिरे ,माधव ढोके ,अरुणभाई शिंदे, ज्ञानेश्वरराव शिंदें, विनोद वैदय , प्रशांत कुर्जेकर, मोरेश्वर वंजारी , दादाराव दादरवाडे, प्रज्वल ढोके ,यश वैद्य, रोशन वैद्य ,यश वैरागडे ,कार्तिक राजकुळे ,दिप सावळे ,हर्षद गाढवे , नदीम शेख, राजगुरू शिंदे , मोहसिन शेख, विजय मंडवधरे , श्रीकृष्ण वैद्य, संतोष बागडे ,सचिन मेटकर, एकनाथ मेटकर, बबलु गावनर, अविनाश गावनर, उमेश गावनेर ,चंद्रशेखर भांबुरकर, अशोक केसरखाने ,रितेश कठाने , रामदास मते ,रुस्तम भाई ,भाष्कर कुमरे, शहशाह, दिनेश बावणे ,प्रणय मेश्राम ,जयकिरण इंगोले ,विशाल राऊत ईत्यादींसह डाव्या आघाडीचे पदाधिकारी, विद्यार्थी, युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आ.यावलकर यांच्या रक्तदानाने मुख्यमंत्री यांचा वाढदिवस साजरा

**मोर्शी/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्ष मोर्शी वरुड मतदार संघ,उपजिल्हा रुग्णालय मोर्शी,लाईफ लाईन ब्लड बँक नागपूर तथा रक्तदाता संघ मोर्शीच्या वतीने आज दि.२२ जुलै रोजी पार पडलेल्या रक्तदान शिबिरात शेकडो कार्यकर्त्यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.सर्वप्रथम मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी रक्तदान करून रक्तदान शिबिराची सुरुवात करण्यात आली. जिल्ह्यात अपघात घडल्यास वेळेवर रक्त उपलब्ध होत नसल्यास रुग्णाला प्राणास मुकावे लागते ही गंभीर समस्या लक्षात घेऊन तथा आपल्या एका रक्तदानामुळे एखाद्याला नवजीवन मिळू शकते.हा उद्देश समोर ठेवून आमदार चंदू यावलकर यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.रक्त संकलनासाठी उपजिल्हा रुग्णालय मोर्शीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार, डॉ.मेघा झामडे, डॉ.संगीता जैन,डॉ. गिरीश धोटे,डॉ.दिलीप टिंगने, रितेश कुकडे, कविता इंगोले,युसुफ शेख, योगेश महाजन, श्रीकांत गोहाड, सुवर्णा श्रीराव,सुधीर वाघ, अमोल राजस,प्रकाश पांडे, डॉ.प्रेरणा वानखेडे,सुजित वानखेडे,प्रवीण पावडे, अमोल झाडे,साक्षी मिश्रा उपस्थित होते. रक्तदान शिबिराला मोर्शी रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,कोषाध्यक्ष डॉ.प्रमोद पोतदार, कार्याध्यक्ष तथा जयदेवा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष मिलिंद ढोले,सचिव गजानन हिरुळकर, सहसचिव अजय पाटील यासह मोर्शी वरूड तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी,नगरसेवक नगरसेविका,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अमरावती जिल्हा महिला सहकारी बॅंक लि., अमरावती
### जवाहर रोड, अमरावती
### र.नं. ए.टी.आय/बी.एन.के./१७०

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना**

**(फक्त सभासदांकरीता)**

सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, अमरावती जिल्हा महिला सहकारी बॅंकेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०७.०८.२०२६ शक्रवार रोजी दुपारी २.०० वाजता अग्रसेन भवन, रॅलीज प्लॉट, अमरावती येथे खालील विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यासाठी संपन्न होणार आहे.

तरी बॅंकेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय -**

१) दि.१२.०९.२०२५ रोजी झालेल्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
२) बॅंकेच्या दि.३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल वाचून त्यास मंजूरी देणे
३) बॅंकेच्या दि.३१ मार्च २०२६ अखेरचा नफातोटा, ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे
४) बॅंकेच्या सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व सन २०२५-२६ मधील मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे
५) बॅंकेच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षकांचा अंकेक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे
६) बॅंकेचे आर्थिक वर्ष २०२६-२७ करीता वैधानिक लेखापरिक्षणासाठी सनदी लेखा परिक्षकाची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे
७) बॅंकेच्या सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत व समवर्ती लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे
८) बॅंकेचे बुडीत व संशयीत थकित कर्जांना वसुलीचे अधिकार अबाधित ठेवून निर्लेखित करणेकरीता मंजुरात प्रदान करणेबाबत विचार करणे
९) एकरकमी कर्ज परतफेड प्रकरणांना मान्यता प्रदान करणे
१०) वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करुन मान्यता देणे
११) मा.अध्यक्षांचे परवानगीने वळेवर येणारे विषय

**अमरावती**
**दिनांक २२.०७.२०२६**

**संचालक मंडळाचे आदेशावरुन**
**(श्री.ऋषिकेश एस.भामोदकर)**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सभासदांना नम्र विनंती विशेष सुचना -**

१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच विषयांवर त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) अहवाल, नफातोटा पत्रक, ताळेबंद व सभेच्या सुचनेमधील इतर बाबीबाबत सभेमध्ये प्रश्न विचारावयाचे असल्यास सभासदांनी दि.२९.०७.२०२६ पुर्वी बॅंकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी विचारणा करावी. वेळेवर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक असणार नाही
३) बॅंकेच्या सभासदांकरीता मुख्यालय व शाखांमध्ये नोटीस बोर्डवर वरील विषयातील पत्रके उपलब्ध आहेत.
४) सर्व सन्माननीय सभासदांना विनंती करण्यात येते की, आपला मोबाईल नंबर व ई-मेल आयडीची नोंद बॅंकेकडे करावी म्हणजे बॅंकेला डिजिटल वार्षिक अहवाल पाठविता येईल.
५) आपण आपल्या वारसाची नोंद करुन घ्यावी अथवा लेखी कळवावे.
६) आपला पत्ता बदलला असल्यास बॅंकेस ताबडतोब कळवावे.



## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**



## नावात बदल

**लग्नाआधीचे नांव -**
**सोनाली ज्ञानेश्वर रंगारी**
**लग्नानंतर नांव -**
**सोनाली संघपाल ढबाले**
**पतीचे नांव -**
**संघपाल धर्मपाल ढबाले**
**रा. : भिमटेकडी, उत्तमनगर अमरावती**
**मो.नं.:- ७७५६०१४४०९**



## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.४७९/२०२६ ने.ता.२५.०८.२०२६

**अर्जदार -** १. **श्री विनायकराव गजाननराव उकडे**
वय ७४ वर्षे, धंदा - शेती
रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **सौ.इंदु धनराज राऊत**, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.डोंगरयावली, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे वडिल नामे **गजानन महादेव उकंडे** हे **दिनांक ३०/०४/२००१ रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती** येथे मरण पावलेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे **अनुसया गजानन उकंडे** ही **दिनांक १२/०८/२००५** रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक २२.०७.२०२६**

शिक्का
आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी



## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१३१७/२०२६**
**श्रीमती इंदु अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील ता.१८.०८.२०२६**

**अर्जदार -** १. **इंदु सुभाषराव ठाकरे**
वय ६९ वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **विक्रम सुभाषराव ठाकरे**
वय ५१ वर्षे, धंदा-शेती
३. **सारंग सुभाषराव ठाकरे**
वय ४९ वर्षे, व्यवसाय - शेती
सर्व रा.व्हिएमव्ही रोड, विद्युत नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुभाषराव अंबादास ठाकरे** हे **दिनांक ०९.०४.२०१८ अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **इंदू अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती इंदू अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती



## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
**आर.एम.जे.सी.क्र.४८१/२०२६** **ने.ता.२७.०८.२०२६**

**अर्जदार -**
१) श्री.प्रल्हाद केशवराव कानफाडे, वय ६८ वर्षे, धंदा-शेती
रा.गुजरी बाजार, अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
२) मंदा रमेशराव गतफणे, वय ६९ वर्षे, धंदा- घरकाम
रा.काटपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
३) चंदा मोरेश्वर तायवाडे, वय ५३ वर्षे, धंदा- घरकाम
रा.वाघोली, पो.काटपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४) गजानन केशवराव कानफाडे मयताचे वारस
४अ) श्रीमती तारा गजानन कानफाडे, वय ५० वर्षे, धंदा-घरकाम
४ब) अंकिता गजानन कानफाडे, वय २९ वर्षे, धंदा-घरकाम
दोघेही रा.५०५, गणेश रेसिडेन्सी, डायमंड स्कुलजवळ, सपना सिनेमा, सरखेज, पो.सरखेज, जि.अहमदाबाद (गुजरात)
४क) पटेल रागीनी धवलकुमार, वय ३० वर्षे, धंदा- घरकाम
रा.बी./५१ सुर्य किरण सोसायटी, वातवा, पी.डी.पांडे कॉलज रोड वातवा, पो.वातवा, जि.अहमदाबाद (गुजरात)

**-- विरुध्द --**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ३ चे वडिल तर अर्जदार नं. ४ (अ) चे सासरे तर अर्जदार नं.४ (ब,क) चे आजोबा नामे **केशवराव तुकारामजी कानफाडे** हे **दिनांक १०/०२/१९८२** रोजी त्यांचे राहते घरी अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक :- २२/०७/२०२६**

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी



## मा.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२१२/२०२६** **ने.ता.१७.०८.२०२६**

**१. मधुकर हरीराम गायगोले**
**२. श्रीराम हरीराम गायगोले**
**३. अशोक हरीराम गायगोले**
**४. वनमाला सुधाकर गायगोले**
**४-अ निलेश सुधाकर गायगोले**
**४-ब सचिन सुधाकर गायगोले**
सर्व रा. लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **मयत तुडसाबाई @ कौसल्या हरीराम @ हरिराम गायगोले** यांचा **मृत्यू दि.२९.११.२०००** मध्ये लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.मयताचे पती नामे **हरीराम @ हरिभाऊ लक्ष्मण गायगोले** यांचा **मृत्यू दि.११.१२.२०११** मध्ये **लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ते ३ ही मुले असून अर्जदार क्र.४ ही सुन व अर्जदार क्र.४-अ व ४-ब हे नातु आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २२ जुलै २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर



## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.ए.बी.कट्टे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१४८१/२०२६**
**महेशकुमार व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.०४.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार -**
१. **श्री. महेशकुमार जानकीप्रसाद गुप्ता**
**एस/ओ जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता**
वय ६७ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.सक्करसाथ बालाजी मंदिराच्या मागे, अमरावती
२. **उमेश कुमार गुप्ता, एस/ओ जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता,**
वय ६६ वर्षे, व्यवसाय- व्यापारी
रा. मनू गॅरेज गली, वल्लभ नगर वॉर्ड सागर मध्यप्रदेश
३. **कविता गुप्ता, डब्ल्यू/ओ विनोद गुप्ता,**
वय ६४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.लल्ला कसाई गली, भगत सिंह वॉर्ड सागर मध्यप्रदेश
४. **रमेश जानकीप्रसाद गुप्ता,** एस/ओ.जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता
वय ६२ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.सक्करसाथ बालाजी मंदिराच्या मागे, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत जानकीप्रसाद लक्ष्मणप्रसाद गुप्ता आणि आशारानी जानकीप्रसाद गुप्ता** हे अनुक्रमे दिनांक १४.०१.२०१३ आणि दि.२९.१२.२०२५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **महेशकुमार व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **महेशकुमार व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती



## मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.२१४/२०२६ ने.ता. १७.०८.२०२६

**अर्जदार :** १. विलास श्रीधर ताडे
२. भारती श्रीधर ताडे
दोन्ही रा.मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. विजया नंदकिशोर नागापुरे,
रा.गजानन नगर, डाबकी रोड, अकोला, ता.जि.अकोला

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **श्रीधर मनाजी ताडे** यांचा मृत्यू दि.**२२.१०.२००९** रोजी मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.तसेच मयताची पत्नी नामे **कृष्णाबाई श्रीधर ताडे** यांचा मृत्यू दि. **३०.१२.२०२०** रोजी मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२२ जुलै २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर



## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४१९/२०२६
**सीमा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Seema Parveen Arif Khan, Age 32 Yrs. Occu.: Household
2. Adyan Khan Arif Khan, Age 09 Yrs. Occu.: Education
3. Umar Khan Arif Khan, Age 04 Yrs. Occu.: Education
4. Kamar Sultana Hamidulla Khan, Age 68 Yrs. Occu.: Nil
All R/o Near Unique English School, Paradise Colony, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **आरिफ खान हमीदुल्ला खान** हे दिनांक 03.06.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सीमा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सीमा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३१६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जंतर-मंतर लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ अचलपुरात आंदोलन


## केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

दिल्ली येथे जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनकारी विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीहल्ला केल्याचा निषेध नोंदवित केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी जुळ्या शहरात विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला. अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन दिल्यानंतर मोर्चाचा समारोप करण्यात आला. परतवाडा शहरातील जयस्तंभ चौकामध्ये भर पावसातही विद्यार्थी एकत्र जमले. तेथून घोषणाबाजी देत आणि हातातील फलक उंचावत लक्कड बाजार मार्गे एलआयसी चौकातून मोर्चा अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालयात पोहोचला. या ठिकाणी प्रहार पक्षाचे माजी नगरसेवक बल्लू जवंजाळ यांनी मोर्चाला संबोधित केले. नीट परीक्षा पेपर फुटीमुळे आणि परीक्षा रद्द झाल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झाले. त्यातूनच आलेल्या मानसिक तणावामुळे २२ परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांनी या प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर आंदोलनकर्त्या लाखो विद्यार्थ्यांनी केली आहे. या आंदोलनकर्त्यांवर दिल्ली पोलिसांनी अमानुषपणे लाठीचार्ज केल्यामुळे शेकडो विद्यार्थी जखमी झाले आहे. एकट्या धर्मेंद्र प्रधान यांना वाचविण्यासाठी केवळ अहंकारामुळे २२ विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांकडे केंद्र सरकार जाणीवपूर्वक डोळेझाक करीत आहे. ही लोकशाहीची विटंबना आहे, असे याप्रसंगी प्रहार पक्षाचे माजी नगरसेवक बल्लूभाऊ जवंजाळ म्हणाले. या सर्व निर्माण झालेल्या विद्यमान परिस्थितीला जबाबदार असलेल्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, असे याप्रसंगी माजी नगरसेवक बल्लूभाऊ जवंजाळ म्हणाले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. यावेळी माणिक देशपांडे, यश घुलक्षे, भूषण घडेकर, मिलिंद तट्टे आदी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



## संक्षिप्त



### मनपात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती साजरी

**अमरावती-** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत झाला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, नगरसेवक ॲड.प्रशांत देशपांडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### सलीम खान पठाण यांचा वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप


**चांदूर रेल्वे-** तालुक्यात सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय असलेले सामाजिक न्याय विभागाच्या बार्टीचे समतादूत सलीम खान खलील खान पठाण यांनी आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा केला.वाढदिवसानिमित्त त्यांनी स्थानिक ग्रामीण रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करून त्यांना शुभेच्छांसह लवकर बरे होण्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. या उपक्रमामुळे रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले.यावेळी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, चांदूर रेल्वे वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राजीव अंबापूरे, पत्रकार प्रकाश रंगारी, विश्वजित घोडेस्वार डॉ. महेश गुल्हाने नितिन ढोके तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यातून वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

### अंजनगाव सुर्जीत तीन बकऱ्या चोरीला

**अमरावती-** अंजनगाव सुर्जी शहरातील नवगज्जी प्लॉट परिसरातून अज्ञात चोरट्याने तीन बकऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुशाहिद खान मुस्तफा खान (वय २९, व्यवसाय – मजुरी, रा. नवगज्जी प्लॉट, अंजनगाव सुर्जी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,आपल्या चार बकऱ्या तसेच शेजारी राहणारे मुजाहीद खान यांची एक बकरी घरासमोर चरण्यासाठी सोडली होती. यावेळी अज्ञात चोरट्याने दोन बकऱ्या १५ हजार व १० हजार रुपये तसेच मुजाहीद खान यांची १२ हजार रुपये किमतीची एक बकरी अशी एकूण ३७ हजार रुपयांच्या तीन बकऱ्या चोरून नेल्या.या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### स्प्रिंकलर व वायर चोरीचा संशय

**अमरावती-** चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोविंदा अशोक तळोकार (वय २५, रा. आदर्श कॉलनी, चांदूर बाजार) यांच्या शेतातून स्प्रिंकलर व मीटर पेटीतील वायर असा सुमारे ७,५०० रुपयांचा माल चोरीला गेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.या प्रकरणी राज नंदू चौधरी (वय २२) व सनी नंदू चौधरी (वय २५, दोघेही रा. रिद्धपूर, ता. मोर्शी) यांच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. आरोपी व फिर्यादी यांची शेतजमीन शेजारी असल्याचे तक्रारीत नमूद आहे. चांदूर बाजार पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



### रिमझिम पावसाने पिकाला जीवदान

**तिवसा-** शेतकऱ्यांचा खरीप हंगाम महत्त्वाचा असल्याने पेरणीपूर्व हंगाम पूर्ण होताच शेतकऱ्यांना प्रतीक्षा होती ती नक्षत्र पावसाची; मात्र पाऊस लांबणार व शंभर मि. मी. पाऊस पडेपर्यंत पेरणी करू नये, असे जाहीर झाले असतानासुद्धा शेतकऱ्यांनी पेरणी केली; मात्र पाऊस न पडल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना अखेर रिमझिम पावसाने दिलासा मिळाला असल्याचे दिसून येत आहे.तालुक्यातील पेरण्या पूर्णतः आटोपल्या असून महागडे बियाणे, खत तडजोडीतून खरेदी केले; मात्र पाऊसच न पडल्याने दुबार पेरणीचे संकट ओढावले; मात्र अशातच पावसाचे रिमझिम स्वरूपी आगमन झाले. परिणामी पिकाला जीवदान मिळाले. सध्या कपाशी पिकाची डवारणी, निंदनाची वेळ आली असून शेतकरीसुद्धा मजुरांच्या शोधात असल्याचे दिसून येत आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षपूर्तीनिमित्त
# मोफत रोगनिदान व औषधोपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षपूर्तीनिमित्त सेवा, समर्पण आणि राष्ट्रभक्तीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मोफत रोगनिदान व औषधोपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये २३६ हून अधिक नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला व औषधोपचाराचा लाभ घेतला.

या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैया यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.या शिबिरात डॉ. साक्षी जिंतूरकर (एम.डी. जनरल फिजिशियन), डॉ. पल्लवी कटई (दंत रोगतज्ज्ञ) आणि डॉ. यश पाठक (नेत्ररोगतज्ज्ञ) यांनी उपस्थित राहून नागरिकांची तपासणी केली व आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनिता,ज्योत्सना सावळे, सीमा गुळधे, माधुरी काळसर्पे, वंदना बोबडे, प्रथमेश पाटील तसेच समस्त लप्पीभैया टीमने विशेष परिश्रम घेतले.या शिबिराचे प्रोजेक्ट चेअरमन डॉ. साक्षी जिंतूरकर आणि राजन आडतिया होते. त्यांच्या नियोजन व मार्गदर्शनामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी आयोजकांनी सांगितले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त समाजहिताचे असे विविध सेवा उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येणार असून, अधिकाधिक गरजू नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाईल. उपस्थित नागरिकांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल आयोजक, डॉक्टर व सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार मानले.



# आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थी अधिक सजग-प्राचार्य डॉ.संजय खेरडे

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

आधुनिक तंत्रज्ञान हे शिक्षण क्षेत्रासाठी वरदान ठरत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आजच्या काळाची अपरिहार्य गरज बनली आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी संगणक हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थी अधिक सजग, सक्षम आणि स्पर्धात्मक बनतो,’असे प्रतिपादन सिपना इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजा देशमुख होते. प्रमुख अतिथी आयटी तज्ज्ञ व संगणक कक्षाच्या देणगीदार राखी तरार उपस्थित होत्या. तसेच माजी उपशिक्षणाधिकारी पंडित पंडागडे, प्रा. डॉ. प्रवीण मळसने आणि माजी मुख्याध्यापक शालिग्राम बोन्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.राखी तरार यांनी आपल्या मामाच्या, स्वर्गीय आबासाहेब बोन्डे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शंकर विद्यालयाला आधुनिक संगणक कक्ष भेट दिल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार संस्थाध्यक्ष राजा देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.तसेच संस्थेच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. कार्यक्रमादरम्यान स्वर्गीय आबासाहेब बोन्डे यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले तसेच त्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपणही करण्यात आले. यावेळी संस्थेच्या कोषाध्यक्षा जयश्री देशमुख, सचिव नरेंद्र देशमुख यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेश वानखडे यांनी केले.संचालन डॉ.तुषार देशमुख यांनी केले,आबासाहेब बोन्डे यांचा जीवनपरिचय श्रीधर भोकसे यांनी सादर केला,तर आभार भास्कर काळे यांनी मानले.



# पावसाने हजेरी लावल्याने खरीप हंगामातील पिकांना जिवदान

**खल्लार-** गेल्या पंधरा दिवसापासून खल्लार परिसरात पावसाने दडी मारली होती. पंधरा दिवसाच्या विश्रांतीनंतर परिसरात पावसाने हजेरी लावल्याने खरीप हंगामातील पिकांना जिवदान मिळाले असून शेतकरी वर्गालाही दिलासा मिळाला आहे.परिसरात खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, तूर या पिकांची शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केल्यानंतर पावसाचा खंड पडला होता. त्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत पडला होता. काही शेतकऱ्यांनी पिकांना जिवदान मिळावे म्हणून भर पावसाळ्यात शेतातील पिकांना कुत्रिम पाणी देणे चालू केले होते.पाऊस सुरु झाल्याने कुत्रिम पाणी देणे बंद केले. हा पाऊस कापूस, सोयाबीन, तूर या पिकांना लाभदायक ठरत असून चिंतेत असलेल्या शेतकरी वर्गालासुद्धा दिलासा मिळाला आहे. तर दुसरीकडे केवळ शेतीच्या भरवश्यावर उपजिविका असणाऱ्या व शेतात काम करणाऱ्या मजूर वर्गालाही पावसामुळे काम मिळणार असून त्यांच्याही चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळत आहे.

# शेकडो नागरिकांची नेत्रतपासणी; मोफत चष्म्यांचे वाटप

## मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त आ.प्रविण पोटे पाटील यांचा लोकोपयोगी उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आ.प्रविण पोटे पाटील यांच्या वतीने आयोजित ‘सेवा दशक अभियान अंतर्गत आ.प्रवीण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोफत नेत्रतपासणी व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेकडो नागरिकांची तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून अत्याधुनिक यंत्रांच्या साहाय्याने नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांना त्यांच्या क्रमांकाचे मोफत चष्मे वितरित करण्यात आले. तसेच नेत्र आरोग्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. चष्मे मिळाल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला.

यावेळी आ.प्रवीण पोटे पाटील यांच्यासह महापौर श्रीचंद तेजवानी, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, सभागृह नेते चेतन गावंडे, महिला मोर्चा अध्यक्षा सुधा तिवारी, चेतन पवार, लवीना हर्षे, बरखा बोज्जे, कौशिक अग्रवाल, मंगेश खोंडे, सारिका तिवारी, प्रीती मकवाना, गंगा खारकर, प्रीती दुबे शीतल वाघमारे रवींद्र खांडेकर, नितीन गुडधे,ॲड. प्रशांत देशपांडे, मिलिंद बांबल, सतीश करेशिया, संजय कटारिया, सुरेंद्र बुरंगे, विक्की शर्मा, राजेश पड्डा, लखन राज यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती शहर व जिल्ह्यात सेवा दशक अंतर्गत रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, अन्नदान, वारकऱ्यांना सन्मान व जेवण तसेच विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पुढील काही दिवस हे उपक्रम सुरू राहणार आहेत.



# डॉ.नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय व आश्रित अंध कर्मशाळेचा २५ जुलैला ‘हीरक महोत्सव’

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्याचे भूषण ठरलेल्या ‘दि ब्लाईंड वेलफेअर असोसिएशन’ द्वारा संचालित डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय आणि आश्रित अंध कर्मशाळा अमरावती यांच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त संस्थेच्या वतीने ‘हीरक महोत्सव’ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, २५ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संस्था प्रशासनाने दिली आहे.

गेल्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी वाटचालीमध्ये संस्थेने दृष्टिहीन विद्यार्थी आणि दिव्यांग बांधवांच्या शिक्षण, पुनर्वसन, कौशल्य विकास तसेच त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सातत्याने उल्लेखनीय व कौतुकास्पद कार्य केले आहे. या गौरवशाली प्रवासाचे साक्षीदार होण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील सर्व नागरिक, हितचिंतक आणि देणगीदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक आणि व्यवस्थापकीय अधिक्षक यांच्यासह सर्व संस्था परिवाराने केले आहे. या हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुधीरसेठ भिवापूरकर (सुप्रसिद्ध उद्योजक), उद्घाटक आयुक्त सत्यजीत बडे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे मुख्य अतिथा सरचिटणीस पद्मश्री जनार्दनजी बोथे तसेच, प्रमुख अतिथी (CEO) सत्यम गांधी (भा.प्र.से.), विशेष अतिथा गोपाल ब्रिजमोहनजी मुंदडा,अमर बालकृष्ण इ. उपस्थित राहणार आहेत.अंध व दिव्यांग बांधवांच्या जीवनात प्रकाशाची नवी पहाट आणणाऱ्या या संस्थेच्या हीरक महोत्सवाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी नम्र विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

# चौदा वर्षांची वैदेही बारंगे झाली इंग्रजी लेखिका

**अमरावती-** आपल्या कवी, गज़लकार वडिलांच्या पावलांवर पाऊल ठेवत अमरावतीच्या वैदेही उज्वल बारंगे हिने वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी लेखिका होण्याचा सन्मान मिळविला आहे. दि ॲस्पायारिंग ऑर्थर नॅशनल रायझिंग चॅलेंज या राष्ट्रीय पुस्तकलेखन स्पर्धेत वैदेही बारंगे विजेती ठरली असून तिने आपल्या वडिलांवर ‘दि बेअरफूट व्होएज टू स्पार्कल्ड ड्रीम’ हे छोटे पुस्तक लिहिले होते. लहान मुलांना लेखनाकरता प्रोत्साहित करणाऱ्या दिल्लीतील जागतिक स्तराच्या दि ॲस्पायरिंग ओथर्स या प्रकाशन संस्थेने वैदेहीचे पुस्तक प्रकाशित केले आहे. वैदेही ही शहरातील प्रख्यात रेडिओ फ्रिक्वेन्सी लेझर सर्जन डॉ. उज्वल बारंगे आणि डॉ. वैशाली बारंगे यांची कन्या आहे. ती सध्या दहाव्या वर्गाची विद्यार्थिनी असून नारायणा विद्यालयात शिकते.ती आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य सचिन भेलकर, वर्गशिक्षक अमोल वानखडे, ग्रंथपाल स्नेहल पांडे तसेच इतर गुरूजनांना देते.



# स्व. दादासाहेब काळमेघ यांच्या २९व्या पुण्यस्मरणानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधी**

स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने स्व. दादासाहेब काळमेघ यांच्या २९व्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवार,२९ जुलै रोजी सायंकाळी ५.०० वाजता छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन प्र. देशमुख हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर (अमरावती)चे कुलगुरू प्रा. डॉ.अविनाश वा. आवलगावकर, सप्तखंजिरीवादक ह.भ.प.सत्यपाल महाराज, तरुण भारत नागपूरचे मुख्य संपादक शैलेश दि. पांडे तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुभाष त्र्यं. बेलसरे उपस्थित, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्व हितचिंतकांनी मोठ राहणार आहेत. स्व. दादासाहेब काळमेघ यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमास नागरिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे हेमंत वासुदेवराव काळमेघ यांनी केले आहे.

# धामणगाव विधानसभा मतदार यादीचे पुनरिक्षण मोहीम सुरू

## गृहभेटी दरम्यान बीएलओ ना सहकार्य करून अचूक माहिती द्यावी

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

धामणगाव विधानसभा मतदारसंघात सध्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण २०२६ चा कार्यक्रम वेगाने सुरू आहे.या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ (मतदार केंद्र अधिकारी) घरोघरी जाऊन प्रत्यक्ष गृहभेटी देत आहेत. या गृहभेटी दरम्यान नागरिकांनी बीएलओला आवश्यक व अचूक ती माहिती द्यावी, जेणेकरून कुठलाही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही.

या विशेष मोहिमेबाबत माहिती देताना २००२ च्या मतदार यादीत असलेल्या नावाशी नवीन मतदार जोडण्याचे आणि यादी अद्ययावत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले. या संदर्भात चांदूररेल्वे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी (३६ धामणगाव विधानसभा मतदारसंघ) उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे,तहसीलदार पूजा माटोडे, नायब तहसीलदार अजय बनारसे यांनी मतदारांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

पारदर्शकता आणि अचूकतेवर भर या गृहभेटींचा मुख्य उद्देश मतदार यादी संपूर्णपणे अचूक आणि दोषमुक्त करणे हा आहे.या मोहिमेमुळे मतदारसंघातील एकही पात्र नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही, तसेच कोणत्याही अपात्र व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, याची विशेष काळजी घेतली जात असल्याचे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.



voters.eci.gov.in/ ECINET App वर आपला किंवा आई-वडिलांचा तपशील शोधून ठेवा. आवश्यकतेनुसार तुमचे अलीकडील छायाचित्र अपडेट करा. तपशील नसल्यास ECI नमूद खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र तयार ठेवा. भरलेल्या गणना अर्जावर स्वाक्षरी करून एक प्रत BLO ला द्या व एक प्रत स्वतः जवळ ठेवा.

नागरिकांना आवाहन आपल्या घरी येणाऱ्या बीएलओ अधिकाऱ्यांना योग्य कागदपत्रे व माहिती देऊन सहकार्य करावे, जेणेकरून एकही पात्र मतदार नोंदणीविना राहणार नाही.

**निवासी नायब तहसिलदार नांदगाव खंडेश्वर यांचे कार्यालय**

दुरध्वनी क्रमांक ०७२२१-२२२६४४ email nandgaon.tah@gmail.com
क्रमांक/प्रस्तु-३/कावि-३६१ /२०२६ दिनांक २२/०७/२०२६

**जाहिरनामा**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणेसूचित करण्यात येते की, अर्जदार श्री. अशोक गणपत गाठे रा. नागपुर ता.जि. नागपुर यांनी मौजा गंगापुर येथिल शेत स.नं. १९/३ क्षेत्र ०.८१ हे. आर आकार रु.१.१२ चे खातेदार नामे मो. तोफीक अ.मजीद शेख यांचे नावे असून सदर जमीन गेल्या काही वर्षापासुन माझ्याच ताब्यात व वाहितीत असुन सदर व्यक्ती मय्यत आहे किंवा कसे तसेच या व्यक्तीचा शोध घेतला असता त्याचा काही पत्ता लागला नाही. तरी मौजा गंगापुर येथिल शेत स.नं. १९/३ क्षेत्र ०.८१ हे. आर आकार रु.१.१२ सदर शेती माझ्याच ताब्यात व वाहितीत असल्यामुळे सदर शेती माझ्या नावाने करून देण्याबाबत विनंती अर्ज या कार्यालयास दाखल केला आहे.

**परिशिष्ट**

| गावाचे नाव | गट नं/क्षेत्र | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| गंगापूर | मौजा गंगापूर येथिल शेत स.नं. १९/३ क्षेत्र ०.८१ हे.आर आकार रु.१.१२ | मधिल खातेदार नामे मो. तोफीक अ.मजीद शेख यांचे नाव कमी करुन अर्जदार अशोक गणपत गाठे यांच्या नावाची नोंद करुन मिळण्याबाबत. | |

वरील बाबतील ज्या कोणाला काही आक्षेप/हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून तिस (३०) दिवसाचे आत आपल्या आक्षेप हरकती लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर कराव्यात मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप / हरकतीचा विचार केला जाणार याची नोंद घ्यावी.

शिक्का

**निवासी नायब तहसिलदार,**
नांदगाव खंडेश्वर

# ४८ कोटींच्या दंडवसुलीत महसूल संहितेची पायमल्ली?

## -कलम १३, १७ आणि १८ फक्त पुस्तकातच का?

## दंड ठोठावूनही शासनाच्या तिजोरीत एक रुपयाही नाही; महसूल यंत्रणेच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** 'दंड ठोठावला... पण वसुली कुठे?' हा प्रश्न आता केवळ जनतेचाच नाही, तर महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर थेट बोट ठेवणारा ठरत आहे. अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील कथित अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणात तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड निश्चित करण्यात आला. मात्र, एवढा प्रचंड दंड ठोठावल्यानंतरही शासनाच्या तिजोरीत आजपर्यंत एक रुपयाही जमा झालेला नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे महसूल यंत्रणेने कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली की केवळ कागदी कारवाईचा देखावा उभा केला? असा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.




या संपूर्ण प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १३, १७ आणि १८ विशेष महत्त्वाची ठरतात. कलम १३ महसूल अधिकाऱ्यांवर शासनाच्या महसुलाचे संरक्षण, वसुली आणि महसूल कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सोपवते. तर कलम १७ व १८ शासनाची देय रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याचे अधिकार देतात. म्हणजेच दंड निश्चित झाल्यानंतर शासनाचे नुकसान होऊ नये, यासाठी कायद्यात स्पष्ट यंत्रणा उपलब्ध आहे.

मात्र या प्रकरणात प्रश्न असा निर्माण होतो की, कायद्याने दिलेले अधिकार प्रत्यक्षात वापरले गेले का? की नोटिसा, पत्रव्यवहार आणि अहवाल यांच्या पुढेच संपूर्ण कारवाई थांबली? कारण अंतिम परिणाम पाहिला तर शासनाला अपेक्षित महसूल मिळालेला नाही.

प्रशासनाकडून विविध टप्प्यांवर कारवाई सुरू असल्याचे सांगण्यात आले. संबंधितांच्या मालमत्तांवर सातबाऱ्यावर बोजा चढविण्यात आल्याचेही सांगण्यात आले. मात्र बोजा चढविणे आणि शासनाच्या खात्यात रक्कम जमा होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. जर महसूल संहितेनुसार उपलब्ध पुढील प्रक्रिया वेळेत पूर्ण झाल्या असत्या, तर आजही ४८ कोटींची रक्कम प्रलंबित राहिली असती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या प्रकरणात संबंधितांनी अपील दाखल केल्याचे कारणही पुढे केले जाते. मात्र अपील दाखल झाले म्हणजे वसुली आपोआप थांबते, असा कायद्यात कोणताही सर्वसाधारण नियम नाही. वसुली थांबविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाचा स्पष्ट स्थगिती आदेश आवश्यक असतो. त्यामुळे या प्रकरणात असा आदेश होता का? असल्यास त्याच्या अटी काय होत्या? आणि जर स्थगितीच नव्हती, तर महसूल संहितेनुसार उपलब्ध अधिकारांचा वापर करून पुढील वसुली प्रक्रिया का राबविण्यात आली नाही? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत.

### ■ उत्तरांची प्रतीक्षा असलेले प्रश्न

४८ कोटींच्या दंडातून शासनाला प्रत्यक्ष किती रक्कम प्राप्त झाली? कलम १३ अंतर्गत महसूल संरक्षणासाठी नेमकी कोणती परिणामकारक कारवाई झाली? कलम १७ व १८ अंतर्गत थकबाकी वसुलीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली का? अपील प्रलंबित असताना सक्षम प्राधिकरणाचा स्पष्ट स्थगिती आदेश होता का? संबंधितांच्या सर्व मालमत्तांची तपासणी करून कायदेशीर कारवाई करण्यात आली का? जप्ती, लिलाव किंवा इतर महसुली उपाययोजनांमध्ये विलंब का झाला? ४८ कोटी रुपयांचा शासन महसूल आजही प्रलंबित राहण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?

या प्रकरणात सुरुवातीला संबंधितांच्या मालमत्तांची माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर वृत्तपत्रातून काही मालमत्ता समोर आल्या आणि नाईलाजाने त्यांच्यावर बोजा नोंदविण्यात आल्याची कारवाई तहसीलदार यांनी केल्याची चर्चा अकोट मध्ये रंगली आहे. त्यामुळे मालमत्तांचा शोध घेण्यात विलंब का झाला? माहिती वेळेवर मिळाली नव्हती की उपलब्ध असूनही कारवाईला जाणीवपूर्वक उशीर झाला? यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, महसूल संहितेचा उद्देश केवळ फाईलवरील नोंदी पूर्ण करणे नसून शासनाचा महसूल प्रत्यक्षात वसूल करणे हा आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या दंडाच्या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियमित आढावा घेतला का? वसुलीसाठी वेळबद्ध कृती आराखडा तयार झाला का?

संबंधित अधिकाऱ्यांकडून जबाबदारी निश्चित करण्यात आली का? याविषयी कोणतीही स्पष्ट माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध नाही.

या प्रकरणात आदिवासी जमिनींशी संबंधित मुद्देही चर्चेत आले. जर अशा जमिनींवरील व्यवहार किंवा उत्खननाबाबत स्वतंत्र कायदेशीर प्रश्न उपस्थित झाले असतील, तर त्यासंदर्भात महसूल विभागाने कोणती चौकशी केली? संबंधित परवानग्या, नोंदी आणि अधिकारांची पडताळणी करण्यात आली का? याबाबतही अधिकृत भूमिका समोर आलेली नाही.

आजची वस्तुस्थिती अशी आहे की दंड कायम आहे, शासनाचा महसूल प्रलंबित आहे, वसुली अपूर्ण आहे आणि अनेक मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहेत. त्यामुळे हे प्रकरण केवळ एका दंडापुरते मर्यादित राहिलेले नाही; तर महसूल प्रशासनाच्या उत्तरदायित्वाची कसोटी ठरत आहे.

जनतेच्या दृष्टीने प्रश्न सरळ आहे की, कायदा सर्वांसाठी समान आहे का? जर शासनाने ४८ कोटी रुपयांचा दंड निश्चित केला असेल, तर त्याची प्रभावी वसुली करण्यासाठी महसूल यंत्रणेने उपलब्ध कायदेशीर अधिकारांचा पूर्ण वापर केला का? की प्रक्रिया सुरू असल्याच्या स्पष्टीकरणातच अनेक वर्षे निघून जाणार? या सर्व पार्श्वभूमीवर वरिष्ठ स्तरावर या प्रकरणाचा स्वतंत्र प्रशासकीय आढावा, प्रत्येक टप्प्याचे कायदेशीर परीक्षण आणि वसुली प्रक्रियेतील विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करण्याची मागणी आता अधिक जोर धरू लागली आहे. संबंधित प्रकरणी महसुलच्या अधिकाऱ्यांनी अधिकृत भूमिका जाहीर केल्यास तीही त्याच प्राधान्याने प्रकाशित करण्यात येईल हे विशेष !

# काँग्रेसच्या आंदोलनाच्या निषेधार्थ भाजयुमोची जोरदार निदर्शने



**अमरावती/प्रतिनिधीः-** पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानाबाहेर काँग्रेस पक्षाने केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो), अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने गुरुवारी रुक्मिणी नगर येथील काँग्रेस कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. भाजयुमो शहर जिल्हाध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक सहभागी झाले. आंदोलनादरम्यान 'काँग्रेस पक्ष मुर्दाबाद', 'राहुल गांधी मुर्दाबाद' तसेच 'लोकशाहीचा सन्मान करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. भाजयुमो कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानाबाहेर करण्यात आलेले आंदोलन हे लोकशाहीच्या मर्यादा आणि संवैधानिक परंपरांना धरून नसल्याचा आरोप केला. देशातील सर्वोच्च संवैधानिक पदे व संस्थांचा सन्मान राखणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची जबाबदारी असून, कोणतेही आंदोलन संविधान व कायद्याच्या चौकटीत राहूनच केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. आंदोलनादरम्यान भाजयुमोचे कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयासमोर ☞(पान २ वर)

# पेपरफुटी प्रकरणात तिवस्यात जनआक्रोश

## तिवसा शहर बंदला उस्फुर्त प्रतिसाद ; आंदोलक रस्त्यावर



**तिवसा/प्रतिनिधीः-** देशभरात विविध शैक्षणिक व भरती परीक्षामध्ये वारंवार समोर येत असलेल्या कथित पेपरफुटी घटनांमुळे निर्माण झालेल्या संतापाच्या पाश्वभूमीवर तसेच दिल्ली येथील जंतर मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाई, मारहाणीच्या निषेधार्थ तिवसा येथे सर्वपक्षीय व सर्व संघटनांच्या वतीने आज गुरुवारी एकदिवसीय कडकडीत बंद पाळून भाजपा सरकारचा निषेध व्यक्त केला. यावेळी सरकार विरोधात घोषणा देत परिसर दणानून गेला होता.यावेळी पेट्रोलपंप चौकात निषेध सभा ☞(पान २ वर)

# तलवार,कोयता,कट्यारसह आरोपी ताब्यात



## -गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे पोलीस आयुक्तांचे आदेश मिळाल्यानंतर शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आणि तलवार, कोयता आणि कट्यार सह आरोपी अब्दुल रहेमान अब्दुल हबीब (वय २२ रा. इमाम नगर) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एकूण ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.आज गुरुवार जुलैच्या पहाटे ही कार्यवाही करण्यात आली. गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की,आरोपी अब्दुल रहेमान अब्दुल हबीब (२२ रा. इमाम नगर ) हा एका प्लास्टिक पिशवीत घातक शस्त्रे घेऊन लालखडी चौकाकडून नवसारी ☞(पान २ वर)

# शालेय गणवेशाचा कंत्राट देण्याच्या नावावर ११ लाखांची फसवणूक

## -३ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शालेय गणवेशाचा मोठा सरकारी कंत्राट मिळवून देण्याच्या नावाखाली एका उद्योजकाला ११ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. पैसे परत न मागण्याची धमकीही आरोपींनी दिली. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी विविध कलमांनुसार ३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला



आहे. माहिती अनुसार तक्रारदार प्रमोद चांदूरकर हे सातुर्णा एमआयडीसी मधील रुथ इंडिया कंपनीचे संचालक आहेत. त्यांचा गणवेश आणि फ्रॉक बनवण्याचा कारखाना आहे. ७ जून ते २२ जुलै दरम्यान आरोपी फिरोज गफ्फार खान (वय ४२ रा. मील चौक, नई बस्ती, बडनेरा) , अभिजीत काळमेघे आणि अक्षय गजानन चर्जन यांनी चांदूरकरांशी संपर्क साधला.आरोपी फिरोज खान यांची ☞(पान २ वर)

# कुख्यात बादल लुंडवर एमपीडीए कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ आणि बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत सक्रिय असलेल्या बादल किशोर लुंड (वय २५, रा. मायानगर, अमरावती) या कुख्यात गुन्हेगाराला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे. सन २०२० पासून गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय असलेल्या



या आरोपी विरोधात चोरी, जबर दुखापत, मारहाण, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, दरोड्याची तयारी तसेच हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करणे यांसारखे तब्बल गंभीर स्वरूपाचे १२ गुन्हे दाखल आहेत.यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई आणि ☞(पान २ वर)

# लैंगिक अत्याचार करणाऱ्याला ४ वर्ष सश्रम कारावास

## ॲड. दिलीप तिवारी यांचा प्रभावी युक्तिवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०२२ मध्ये एका अल्पवयीन मुलीसोबत झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी मतीन अहमद खान महमूद खान (वय ५७) याला दोषी ठरवत ४ वर्ष सश्रम कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी अतिरिक्त शासकीय अभियोक्ता एड. दिलीप तिवारी यांनी प्रभावी युक्तिवाद केला.



दोषारोप पत्रानुसार ७ मे २०२२ रोजी सायंकाळी पीडित मुलगी टीव्ही पाहण्यासाठी आरोपीच्या घरी गेली होती. त्यावेळी आरोपी घरात एकटाच होता. आरोपी ने मुलीसोबत अश्लील वर्तन केल्याचा आरोप आहे. दरम्यान, पीडितेची बहीण तिला बोलावण्यासाठी ☞(पान २ वर)

# वंचितच्या बंदला अमरावतीत संमिश्र प्रतिसाद

## विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ मोर्चा

### शहरातील प्रमुख बाजारपेठ अर्धा दिवस बंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपर फुटीच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या



'महाराष्ट्र बंद' ला अमरावती शहर आणि जिल्ह्यात संमिश्र प्रतिसाद मिळाला. शहरातील प्रमुख बाजारपेठामधील काही दुकान अर्धा दिवस बंद ठेवण्यात आले. या ☞(पान २ वर)

# अकोला कारागृहात न्यायालयीन बंदीचा संशयास्पद मृत्यू

## आरोपीने विहिरीत उडी घेतल्याचा प्राथमिक अंदाज

### -सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्न, कुटुंबीयांची सखोल चौकशीची मागणी

**अकोला :** अकोला जिल्हा मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका बंदीचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. पत्नी हत्या प्रकरणातील आरोपी असलेल्या या बंदीने कारागृह परिसरातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण अधिकृत चौकशी आणि शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याने तपासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. मृताचे नाव अनिल ओंकार निंबोकार (वय ३५, रा. हिंगणी गावंडगाव, जि. अमरावती) असे आहे. ☞(पान २ वर)



# २१४ ग्रॅम एमडी ड्रगससह सराईत गुन्हेगार जेरबंद

## -५०.९९ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर गुन्हे शाखेने अंमली पदार्थांविरोधातील कारवाईत मोठे यश मिळवत २१४ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) या अमली पदार्थासह एका सराईत गुन्हेगाराला अटक केली. आरोपीकडून सुमारे ५०.९९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जीतील बियाणे घोटाळ्याची तहसीलदारांकडून गंभीर दखल

### ३०० तक्रारीनंतर प्रशासन खडबडून जागे

### तहसीलदार पुष्पा सोळंके यांची कृषी विभागाला अचानक भेट

### तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यामुळे शेतकरी संकटात सापडला असून या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. बियाणे उगवलेच नाही किंवा अत्यल्प उगवण झाल्याने हजारो हेक्टरवरील पेरणी वाया गेली आहे. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला ☞(पान २ वर)

■ 'सोयाबीन बियाण्यांच्या उगवणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने २५ शेतकऱ्यांच्या शेतातील पेरणीनंतर बियाण्यांचे नमुने गुणवत्ता तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. संबंधित नमुने प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.' - **भारती जाधव,** तालुका कृषी अधिकारी, अंजनगाव सुर्जी



# सेवानिवृत्त शिक्षिकेच्या बंद घरात चोरी

## ३० तोळे सोने, ५० हजार रोख लंपास

### -मौलाना आझाद कॉलनी येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील मौलाना आझाद कॉलनी परिसरात अज्ञात चोरट्यांनी एका बंद घराला लक्ष्य करत लाखोंच्या किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. या चोरीत सुमारे ३० तोळे सोने आणि ५० हजार रुपये रोख गेल्याची माहिती समोर आली आहे.या घटनेनंतर संपूर्ण परिसरात खळबळ ☞(पान २ वर)

